
राजकीय पक्षांसाठीं आचार-संहिता

[संकलित निबंध]


म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. १३६८




गोखले अर्थशास्त्र संस्था
समाज प्रबोधन संस्था

राजकीय पक्षांसाठीं आचार-संहिता

[संकलित निबंध]






REFBK-0012308

गोखले अर्थशास्त्र संस्था

समाज प्रबोधन संस्था

प्रकाशक : **पन्नालाल सुराणा**
चिटणीस, समाज प्रबोधन संस्था
विद्यापीठ वाडा, १२४२ सदाशिव
पुणें २

सर्व हक्क प्रकाशकांचे स्वाधीन



मूल्य रुपये २.००

मुद्रक : **हरि महादेव गद्रे**
जनवाणी प्रिंटिंग प्रेस
४५ बुधवार पेठ,
पुणें २

प्रकाशकाचें निवेदन

"राजकीय पक्षांसाठीं आचार-संहिता" या विषयाच्या वेगवेगळ्या अंगांचा विचार करणारे कांहीं निबंध पुस्तकरूपानें प्रसिद्ध करण्यास आम्हांला आनंद होत आहे. भाटघर येथें जो परिसंवाद झाला (त्याचें वृत्त शेवटीं दिलें आहे) त्यांत भाग घेणारांच्या विचारार्थ आम्ही हे निबंध मागविले होते. भाटघर परिसंवाद यशस्वी झाल्यानें लोकांचें याविषयींचें कुतूहल जागृत झालें. त्याबाबतच्या साहित्याला आमच्याकडे महाराष्ट्रांतून व महाराष्ट्राबाहेरूनहि बरीच मागणी येऊं लागली. यापैकीं कांहीं निबंध मराठींतून व कांहीं इंग्रजींत लिहिलेले होते. म्हणून आम्ही हें सर्व साहित्य मराठी व इंग्रजी दोन्ही भाषांत स्वतंत्रपणें प्रसिद्ध करण्याचें योजलें व त्याप्रमाणें ही मराठी पुस्तिका सादर करीत आहोंत.

या निबंधांचे लेखक, निबंधांचें भाषांतर करण्यांत मदत करणारे मित्र व मुद्रक या सर्वांचे आम्ही मनःपूर्वक आभारी आहोंत.

— प्रकाशक

[पूर पीडित पुण्यांत मुद्राराक्षसाच्या विनोदाला उधाण येणें स्वाभाविक आहे. तेव्हां शुद्धलेखनाच्या किरकोळ चुका वाचकांनीं उदार मनानें सुधारून घ्याव्यात अशी विनंती. ठोक चुकांसाठीं हें शुद्धिपत्र.]

शुद्धिपत्र

पान	ओळ	अशुद्ध	शुद्ध
१	२	दुर्लक्ष तर	दुर्लक्ष केलें तर
५	२१	लोकशाही निष्ठा राजकीय	लोकशाही निष्ठा रुजविणें ही सर्व राजकीय
६	१०	जाते कीं,	जाते याचें कारण इतकेंच कीं,
६	२४	मंडळींपासून	मंडळांपासून
७	४	मंडळ आहे की या	मंडळ अस्तित्वांत आहे या
७	११	"जंगल्या कायदा"	"जंगलचा कायदा"
१०	२२	महिन्यांत तरी तयार	महिन्यांत ती तयार
१२	२२	ही लोकशाही	ही प्रवृत्ति लोकशाहीला
१५	७	व पक्षाच्या	ब पक्षाच्या
३३	७	उपभोगणाच्या	उपभोगण्या
४३	१६	श्रीमान् नारायण	श्रीमन् नारायण
६२	१७	उद्देलादेखील	उपक्रमाला
६५	२३	समजांत	समाजांत
६७	१३	जमलेल्यांची निष्ठा	जमलेल्यांची अशी निष्ठा
७२	३	प्रा. गोवर्धन पाटील	प्रा. गोवर्धन पारीख
७६	१६	सुसंवाद	सुखसंवाद

अनुक्रमणिका

१. आचार-संहितेचें स्वरूप व व्याप्ति
प्रा. अ. भि. शहा १

२. राजकीय पक्षांचा निवडणुकींबाबतचा व्यवहार
श्री. एस्. एम्. जोशी ९

३. राजकीय पक्षांचा स्थानिक संस्थांबाबतचा व्यवहार
प्रा. र. वि. रानडे १६

४. राजकीय पक्षांचा स्थानिक संस्थांबाबतचा व्यवहार
प्रा. राम जोशी २३

५. केरळमधील आचार-संहिता ३१

६. आचार-संहितेची आवश्यकता
डॉ. राम मनोहर लोहिया ३८

७. राजकीय पक्षांसाठीं आचार-संहिता
मधु लिमये ५२

८. राजकीय पक्षांसाठीं आचार-संहिता—स्वरूप व मर्यादा
एस्. एम्. जोशी ५७

९. राजकीय पक्षांसाठीं आचार-संहिता करण्याची गरज
दि. के. बेडेकर ६२

१०. लोकशाही व्यवहाराची आचार-संहिता—
सर्व सेवा संघाचा ठराव ६९

११. भाटघर परिसंवादाचा संक्षिप्त वृत्तान्त व
सर्वसंमत निवेदन ७१

१२. कांहीं प्रतिक्रिया ७६

आमचे निबंध-लेखक :

१. **अ. भि. शहा** : मुंबईच्या एस्. आय. ई. एस्. कॉलेजचे प्राचार्य व गणिताचे प्राध्यापक. समाज प्रबोधन संस्थेच्या कार्यकारी मंडळाचे सभासद.

२. **एस्. एम्. जोशी** : महाराष्ट्र राज्य प्रजा समाजवादी पक्षाचे अध्यक्ष.

३. **र. वि. रानडे** : नागपूर विद्यापीठांत अर्थशास्त्राचे अध्यापक.

४. **राम जोशी** : मुंबईच्या एस्. आय. ई. एस्. कॉलेजांत राज्यशास्त्राचे प्राध्यापक. मुंबई प्रजा-समाजवादी पक्षाचे नेते.

५. **मधु लिमये** : भारतीय समाजवादी पक्षाचे नामवंत नेते.

६. **दि. के. बेडेकर** : गोखले अर्थशास्त्र संस्थेच्या "अर्थ-विज्ञान" त्रैमासिकाचे कार्यकारी संपादक. समाज प्रबोधन संस्थेच्या कार्यकारी मंडळाचे सभासद.

मराठी ग्रंथ संग्रहालय पुणे
ग्रं. क्र. 9230

आचार संहितेचें स्वरूप व व्याप्ति

प्रा. अ. भि. शहा

राजकारणाचें स्वरूप—

राजकारण हें बहुधा असें एकमेव क्षेत्र असेल कीं जेथें जनहिताकडे दुर्लक्ष तर राजकारणी माणसाच्या पदरीं हमखासपणें अपशय येतें. याचा अर्थ असा नाहीं कीं प्रत्येक राजकीय हालचाल ही जनहिताला प्रमाण मानूनच केली जाते. म्हणावयाचें आहे तें एवढेंच कीं राजकारणांत असलेली एखादी व्यक्ति कमालीची स्वयंकेंद्रित असली तरी तिला आपल्या स्वार्थावर सामाजिक ध्येयवादाचा पेहेराव चढवावा लागतो.—वकिली, वैद्यकी किंवा अध्यापन या क्षेत्रांत असें करण्याची तितकी गरज नाहीं. राजकारणाचें दुसरें वैशिष्ट्य असें कीं राजकीय पक्षामार्फत केल्या जाणाऱ्या राजकारणाचा उद्देश एकच असतो, आणि तो म्हणजे समाजांतील सर्वंकष सत्तेचें केंद्र ताब्यांत घेणें. लोकशाहींत राजकीय–सत्ता ही धर्मसंस्था किंवा सुसज्ज सेना यांसारख्या बिगर राजकीय संघटनांची मांडलिक नसते; जे राजकीयदृष्ट्या सत्तास्थानावर आरूढ झालेले असतात त्यांच्यावर घटनेनें घालून दिलेल्या बंधनांखेरीज दुसरा कोणताहि अंकुश नसतो. इतर व्यवसाय आणि राजकारण यांतला हा महत्त्वाचा फरक होय. आज राजकारण ही एक जबरदस्त शक्ति झाली आहे, समाजाचें भलें वा बुरें करण्याचें फार मोठें सामर्थ्य आजच्या राजकारणांत आहे.

इतर व्यवसायांप्रमाणें राजकारणांत चांगल्या व वाईट दोन्ही प्रवृत्तींचा आविष्कार होत असतो. आणि त्यांची तीव्रताहि विशेष असते. समाजधारणेला पोषक व विघातक दोन्ही प्रवृत्ति राजकारणांत विशेष उठून दिसतात. ध्येयवादाबरोबरच स्वार्थांधता, एकात्मकतेबरोबरच संकुचितपणा, स्वतंत्र, बंधमुक्त राहण्याच्या व्यक्त ऊर्मींबरोबरच समष्टींत मिसळून जाण्याची

अव्यक्त इच्छा; समान उद्दिष्टांच्या सिद्धीसाठीं चाललेल्या धडपडींत सहकार्य आणि वैयक्तिक वा गटांच्या स्वार्थांवरून होणारे संघर्ष–अशा सर्व प्रवृत्ति एकाच वेळीं राजकारणांत प्रकट होत असतात. मानवी स्वभावाचीं–हृद्य व त्याज्य–दोन्हीं प्रकारचीं वैशिष्ट्यें व त्यांची विविधता राजकारणांत उठून दिसते. बऱ्याच वेळा राजकारण तिरस्करणीय वाटूं लागतें; पण उदात्त हेतूसाठीं निष्ठेनें व चिकाटीनें चाललेली धडपड पाहून मन अनेक वेळा उचंबळूनहि येतें. आजच्या काळांत सांस्कृतिकदृष्ट्या अर्धविकसित असलेल्या देशांत तर याचा प्रत्यय जास्त येतो. कारण मनुष्याच्या अंतर्बाह्य जीवनांत परिवर्तन घडवून आणणें हें त्या देशांतील राजकारणाचें कार्य असतें. त्या देशांत विविध संस्था–संघटनांचें जाळें निर्माण झालेलें नसतें. त्यामुळें संवेदनशील व्यक्तींच्या ध्येयवादाला व कर्तृत्वाला प्रकट होण्यासाठीं दुसरें माध्यम नसतें. त्यामुळें आपल्या समाजाचा विकास घडवून आणण्यासाठीं राजकीय सत्ता हस्तगत करण्याखेरीज गत्यंतर नाहीं, असें त्यांना वाटूं लागतें. पण सार्वजनिक क्षेत्रांतल्या इतर कामांपेक्षां राजकारणांतलें दैनंदिन काम हें विलोभनीय असतें असें नाहीं. आणि त्यामुळें कांहींजणांचा अपेक्षाभंग होतो. त्यांच्यांतले कांहींजण असंतुष्ट आत्मे बनून सर्वच गोष्टींकडे निराशावादी दृष्टीनें पाहूं लागतात; तर कांहींजण दुटप्पी भूमिका स्वीकारतात. इतरांच्या डोळ्यांतलें कुसळ समाज–जीवनाला फार बोचतें अशी तक्रार करीत राहतात; पण स्वतःच्या डोळ्यांतलें मुसळ हा समाजाच्या सांस्कृतिक मागासलेपणाचा अपरिहार्य परिणाम आहे असें सांगत राहतात.

राजकीय पक्षांसाठीं बनवावयाच्या आचार-संहितेच्या स्वरूपाची व व्याप्तीची चर्चा करतांना वरील गोष्टी जाणीवपूर्वक लक्षांत ठेवल्या पाहिजेत. अर्थात् परिस्थितीच्या या मर्यादा आहेत व त्यामुळें आजच्या आपल्या राजकीय पक्षांत साक्षेपी व सुसंगत धोरण आणि कार्यक्षमता यांचा कांहीं अंशीं अभाव असणें स्वाभाविक असलें तरी तें समर्थनीय ठरतें असें मात्र नाहीं; कारण मनुष्य हा परिस्थितीचा सर्वथैव गुलाम असतो असें नाहीं. परिस्थिति बदलण्याचें सामर्थ्यहि त्याच्यांत असतें. अर्थात् इतर व्यवहारांप्रमाणें राजकारणहि कोणत्या सामाजिक व सांस्कृतिक पार्श्वभूमीवर चालू आहे हें समजून घेणें आवश्यक आहे. म्हणजे कांहीं

दोष दूर होण्यासाठीं समाजाचा सांस्कृतिक विकास होईपर्यंत वाट पाहणें भाग असलें तरी आजच्या परिस्थितींत सर्व सत्तास्पर्धकांनीं मान्य केल्यास कोणकोणते संकेत निर्माण करतां येतील हें समजूं शकेल. असें एक मत होईल, त्या प्रमाणांत कोणत्या गोष्टी आदर्श आहेत व कोणत्या गोष्टी स्वप्नाळू आहेत हें स्पष्ट होईल. आणि त्याचबरोबर आदर्श आणि व्यवहार यांतील अंतर कमी करण्यासहि साह्य होईल. आदर्श नीतितत्त्वांना प्रत्यक्ष व्यावहारिक कार्यक्रमांचें मूर्त स्वरूप मिळेल आणि तीं राजकीय पक्षांनीं स्वीकारल्यानें लोकांच्या दृष्टीनें त्या पक्षांना नैतिक अधिष्ठान प्राप्त झाल्यासारखें होईल. संसदीय लोकशाही यशस्वी होण्यासाठीं राजकीय पक्षांना असें नैतिक अधिष्ठान प्राप्त होण्याची आज निकड आहे.

" संसदीय लोकशाही " असा शब्दप्रयोग मुद्दाम केला आहे. आचार-संहिता तयार करण्याचा राजकीय संदर्भ तर त्यामुळें ध्यानांत येतोच; पण त्याचबरोबर पक्ष आणि सरकार यांचें अद्वैत असलेली एकपक्षीय लोकशाही, किंवा सत्तेसाठीं राजकारण ही इतिहासजमा झालेली असे मानणारी ' सर्वोदयी समाज रचना ' या दोन्हींत आचार-संहिता तयार करण्याचा प्रश्नच उद्भवत नाहीं असेंहि येथें म्हणावयाचें आहे. एकीला आचार-संहितेची गरज नाहीं; दुसरी ती घेण्यास उत्सुक नाहीं.

राजकारणाचें प्रयोजन—

राजकारणाचें स्वरूप पाहिल्यानंतर लोकशाही समाजांत त्याचें प्रयोजन काय, हें पाहणें क्रमप्राप्त ठरतें. या प्रयोजनाचे दोन मुख्य पैलू संभवतात. पहिला पैलू सर्वच सार्वजनिक हालचालींना लागू आहे; व तो म्हणजे लोकांचा ध्येयवाद. समष्टीशीं अनुबंध असण्याची गरज, सत्ता मिळविण्याची आकांक्षा, आपल्या अस्तित्वाची व वेगळेपणाची इतरांनीं जाणीव ठेवावी ही मनीषा—या व इतर मानसिक उर्मींना लोकशाहीची चौकट न मोडतां समाजहितकारी स्वरूपांत प्रकट होण्याला संधि निर्माण करून देणें हा होय. राजकारणाच्या प्रयोजनाचा दुसरा पैलू त्याच्यापुरताच मर्यादित आहे. राजकारण हें एकच असें क्षेत्र आहे कीं ज्यांत प्रत्येक नागरिक भाग घेऊं शकतो, आणि मुख्य म्हणजे तो भाग घेवो वा न घेवो, त्याच्या जीवनाच्या

सर्व बाजूंवर राजकारणाचा फार मोठा परिणाम होत असतो. वर म्हटल्याप्रमाणें व्यक्तिस्वातंत्र्याचें स्तोत्र म्हणून काम करणाऱ्या व त्याचबरोबर शासन-संस्थेकडून व्यक्तिस्वातंत्र्यावर आक्रमण होऊं लागल्यास त्याविरुद्ध संरक्षणाची फळी उभारणाऱ्या अनेकविध संस्थांचें जाळें नसलेल्या समाजांत या बाबतींत हें फारच खरें आहे. त्यामुळें सामाजिक न्यायाच्या उपासकाप्रमाणेंच सत्तापिपासूला, ध्येयवाद्याप्रमाणें स्वार्थीधाला व स्फटिकाप्रमाणें निर्मळ असणाऱ्या चारित्र्यवानाबरोबरच भाकरीच्या तुकड्यासाठीं स्वतःचा आत्मा विकणाऱ्याला राजकारणाचे विशेष आकर्षण असतें.

आचार-संहितेचा उद्देश—

आपलीं प्रामाणिक उद्दिष्टें व रास्त आकांक्षांसाठीं धडपडणाऱ्या ध्येयवादी, कर्तृत्ववान् व सत्त्वशील व्यक्तींना समाजाची चांगल्या प्रकारें सेवा करण्याची संधि मिळेल असें वातावरण निर्माण करणें व टिकविणें हा आचार-संहितेचा उद्देश आहे. हाडामासाच्या माणसांना संतमहात्मे बनविणें हा तिचा उद्देश असूं नये. समाजाला हितकर ठरेल अशा पद्धतीनें माणसांच्या नैसर्गिक इच्छा-ऊर्मींचा आविष्कार होईल असा प्रत्यन करणें हें तिचें उद्दिष्ट असलें पाहिजे. आणि इतर नीतितत्त्वांप्रमाणें राजकीय-आचार-संहितेची अंमलबजावणी सदभिरुचीला आवाहन, गुणांचें कौतुक, जनमताची भीति व कांहीं बाबतींत शासन याच मार्गांनीं झाली पाहिजे.

आचार-संहितेचें स्वरूप आणि व्याप्ति—

'आचार-संहिता' या शब्दांतच हें अभिप्रेत आहे कीं, तिचा आशय कायद्याच्या स्वरूपांत मांडतां येणार नाहीं. सहजासहजीं मान्य होऊं शकेल असा तिचा भाग निवडणूक-कायद्यांत ग्रथित करतां येईल व त्याची अंमलबजावणी निवडणूक-यंत्रणेवर आणि न्याय-यंत्रणेवर सोंपवितां येईल. पण बाकीचा जास्त महत्त्वाचा असलेला भाग कायद्याच्या भाषेंत मांडणें योग्य होणार नाहीं. एकेक पायंडा (Precedent) पडत जाईल तसतसा आचार-संहितेचा विकास होईल; लोकमत त्याबाबत जास्त-जास्त दक्ष व साक्षेपी होत जाईल. आणि आज राजकारणांत क्षम्य मानल्या जाणाऱ्या गोष्टी दहा वर्षांनीं अगदीं त्याज्य समजल्या जातील; त्यांचा अंगीकार

करणें म्हणजे स्वतःच्या पायावर दगड पाडून घेण्यासारखें होईल. उदाहरणार्थ, पक्ष व पक्षनिष्ठा बदलण्यांत कायद्यानें प्रतिबंध असूं नये. पण राजकीय कार्यकर्ते हे मतपरिवर्तनामुळें पक्ष बदलतात. त्याचप्रमाणें स्वतःच्या स्वार्थासाठीं पक्ष बदलणारांची संख्या फार मोठी आहे, ही आज वस्तुस्थिति आहे. प्रत्येकाचा काय हेतु आहे हें लोकांना सहज कळतें, पण कायद्याच्या कक्षेंत त्याचा अपहेतु सिद्ध करतां येईलच असें नाहीं; किंबहुना तें फार कठिण आहे. तरी पण राजकीय वातावरण निरोगी ठेवण्याच्या दृष्टीनें व्यक्तिगत तत्कालीन स्वार्थासाठीं पक्ष बदलण्याचे प्रकार बंद व्हावेत असा प्रयत्न करायला हवा. आणि त्यासाठीं सर्व पक्षांनीं असें ठरवायला हरकत नाहीं कीं, जी व्यक्ति किमान तीन वर्षें आपल्या पक्षाची सभासद नाहीं, तिला निवडणूक किंवा नेमणूक केल्या जाणाऱ्या जागांवर वा विधिमंडळांत पक्षाच्या वतीनें प्रवेश मिळूं देऊं नये. जो तत्त्वासाठीं पक्ष बदलतो त्याला या नियमाचे कांहीं वाटणार नाहीं, जो स्वार्थासाठीं पक्ष बदलेल त्याला यावर तक्रार करायचा अधिकार नाहीं.

याशिवाय दुसऱ्या पक्षाच्या कार्यकर्त्यांवर असभ्य–वैयक्तिक टीका करणें, मतें मिळविण्यासाठीं जातीय वा धार्मिक भावनेला आवाहन करणें, बिगर राजकीय व्यासपीठांचा राजकीय कारणांसाठीं वापर करणें, असे अनेक मुद्दे आहेत कीं, ज्यांच्याबाबत गंभीरपणें विचार करून वरील पद्धतीप्रमाणेंच सुरुवात करतां येईल. अशा वेगवेगळ्या मुद्द्यांबाबत विचार करून सर्वमान्य संकेत ठरविणें, निवडणूक-विषयक कायद्यांत काय काय सुधारणा करणें आवश्यक आहे, याबाबत सूचना करणें व लोकशाही निष्ठा राजकीय पक्षांनीं सामुदायिक जबाबदारी समजून कोणत्या गोष्टी पाळाव्यात याचा विचार करणें हें या परिसंवादाचें एक उद्दिष्ट आहे.

आचार-संहितेचें पालन कसें होईल ?

आचार-संहिता तयार झाल्यानंतर ती पाळली कशी जाईल, हा एक महत्त्वाचा प्रश्न आहे. सगळ्यांनीं कबूल केलें आहे म्हणून ती पाळली जाईलच असें नाहीं. अर्थात् याचें आश्चर्य वाटण्याचें कारण नाहीं, किंवा त्यामुळें नाउमेद होण्याचेंहि कारण नाहीं—राजकारणांत तर मुळींच नाहीं. सर्वच

नीतितत्त्वांच्याबाबत ही अडचण नेहमीं आलेली आहे. पक्षपात, वशिलेबाजी व लांचलुचपत हे भयंकर सामाजिक रोग आहेत व त्यांचें निर्मूलन अगदीं कठोरपणें केलें पाहिजे. यावर दुमत होणार नाहीं. आणि तरीहि व्यापार, उद्योग, नोकरी यांसारखे धंदे वा वकिली, वैद्यकीय, अध्यापन, वृत्तपत्र-व्यवसाय यांसारखे बुद्धिजीवि व्यवसाय — कोणीहि या रोगांपासून मुक्त नाहीं. एवढेच नव्हे तर ज्या ज्या दोषांचें दूषण राजकारणी लोकांना दिलें जातें ते सर्व दोष कमी-अधिक प्रमाणांत सर्व व्यवसायांत आहेतच. थोडक्यांत राजकारणाचें शुद्धीकरण व अध्यात्मीकरण हा प्रश्न म्हणजे आपल्या समग्र सामाजिक जीवनाची पातळी व दर्जा सुधारण्याच्या व्यापक प्रश्नाचा एक भाग आहे. राजकारणावर इतकी आग पाखडली जाते कीं, त्यांतल्या दोषांचे व उणीवांचे फार मोठे परिणाम होत असतात; आणि राजकारणांत असलेल्यांपासून तों त्यापासून शतपावलें दूर असलेल्या सर्वांना ते परिणाम भोगावे लागतात.

राजकीय देखरेख--मंडळाची गरज—

आचार–संहितेचा फार मोठा व महत्त्वाचा भाग कार्यवाहींत आणण्यांत कायद्याचा कांहीं उपयोग नाहीं. तेव्हां त्यासाठीं स्वतंत्र, सर्वसंमत व लोकायत्त मंडळच असणें योग्य होईल. आचार–संहितेचा भंग होईल त्या त्या वेळीं त्या त्या प्रकरणांची संपूर्ण चौकशी करून त्याबाबत निर्णय त्यानें दिला पाहिजे. हें मंडळ छोटें असावें, त्याच्या विभागीय शाखा असाव्यात व त्याचा अध्यक्ष अपक्ष मनुष्य असावा. आचार–संहितेला संमति देणाऱ्या प्रत्येक पक्षाचा एकेक प्रतिनिधि त्या मंडळावर असावा; आणि त्याचबरोबर वकीलवर्ग, वृत्तपत्रें, विद्यापीठें यांच्यांतील कांहीं व्यक्तीहि त्यावर असाव्यात. अर्थात् पक्षीय वा अपक्ष सर्वच सभासद समाजहितदक्ष व निस्पृह असतील अशी खबरदारी घेतली पाहिजे. नजीकच्या काळांत या मंडळांपासून दुसरा कांहीं फायदा झाला नाहीं, तरी मतदारांकडे मतें मागणाऱ्या पक्षांची राजकीय नीतिमत्ता कोणत्या तोलाची आहे हें त्यांना अजमावणें या मंडळामुळें सोपें जाईल.

राजकीय देखरेख-मंडळाची ही कल्पना अगदीं हास्यास्पद व अव्यवहार्य आहे असें मानण्याचें कारण नाहीं. अध्यापनाचा व्यवसाय वगळतां

(त्यासाठींहि अशा मंडळाची तीव्रतेनें गरज भासत आहे.) बाकीच्या सर्व बुद्धिजीवि व्यवसायांवर त्यांच्या त्यांच्या मंडळांनीं घालून दिलेल्या नियमांचें बंधन आहे. अर्थात् असें मंडळ असलें कीं त्या व्यवसायांत अपप्रकार होतच नाहींत असें नाहीं. पण असें एक देखरेख मंडळ आहे कीं या घटनेमुळेंच कांहीं लोकांवर एक प्रकारचा दबाव राहतो. असें मंडळ नसतें तर त्यांनीं आपल्या व्यवसायांत वाटेल तो धुडगूस घातला असता. तसेंच प्रत्येक व्यवसायांत कांहीं किमान नीतिमत्ता टिकविण्यांत या मंडळांना थोडेंतरी यश मिळालें आहेच, व त्यांच्या अस्तित्वामुळें संबंधित व्यवसायिकांना आपण आपापला व्यवसाय नेकीनें करीत आहोंत, असा रास्त अभिमानहि वाटतो, आणि अर्धवट स्वरूपांत का होईना, कांहींतरी व्यवस्था असणें चांगलें कीं अगदींच " जंगल्या कायदा " असणें चांगलें ?

राजकीय मंडळाचें कामकाज सरकारी यंत्रणेपासून व हस्तक्षेपांपासून संपूर्णतया स्वतंत्र असलें पाहिजे. पण त्याचबरोबर बार कौन्सिल किंवा मेडिकल कौन्सिलप्रमाणें या राजकीय मंडळालाहि कायदेशीर मान्यता असलेली बरी. तसेंच, या कल्पनेची योग्यप्रकारें चांचणी घेतां यावी या दृष्टीनें सुरुवातीला हा प्रयोग एखाद्या लहान क्षेत्रांत करून पाहावा. उदाहरणार्थ, कांहीं जिल्ह्यांपुरती व कांहीं काळापुरती मर्यादित आचार-संहिता पाळायला सर्व राजकीय पक्षांनीं तयार व्हायला हरकत नाहीं. त्यामुळें जरी समजा, पक्षांनीं मधेंच माघार घेतली तरी जे लोक संहितेचें प्रामाणिकपणानें पालन करतील त्यांचेंहि फारसें नुकसान होणार नाहीं. मर्यादित प्रयोग असल्यानें त्यांत कांहीं बिघडलें तरी राज्याच्या पातळीवरील पक्षोपपक्षांच्या बलाबलांत देखील फारसा फरक पडणार नाहीं. आणि जर तो प्रयोग यशस्वी झाला तर त्याची व्याप्ति हळूहळू सबंध देशभर वाढवितां येईल.

राजकीय देखरेख-मंडळ निर्माण केलें तरी त्याला आपलें कामकाज सुलभपणें करतां यावें यासाठीं राजकीय वादविवाद हा धोरण व कार्यक्रमांपुरताच मर्यादित असला पाहिजे. सध्यां साक्षेपी चिकित्सा व विवेकनिष्ठ युक्तिवाद यांच्या ऐवजीं व्यक्तिनिष्ठा वा गटनिष्ठा यांच्यावर राजकीय वादविवादांचें फलित अवलंबून असतें. यांचें कारण असें कीं, प्रत्यक्ष

परिस्थिति व मार्गदर्शक तत्त्वें यांच्या सहाय्यानें राजकीय वादविवाद करण्याची राजकीय पक्षांच्या कार्यकर्त्यांची व कांहीं बाबतींत तर नेत्यांचीहि पुरेशी तयारी नसते. त्यामुळें दुसऱ्याची रेवडी उडवणें, शिवीगाळ करणें किंवा संकुचित, विघटनात्मक प्रवृत्तींना आवाहन करणें हीच त्यांच्या भात्यांतलीं शस्त्रें होत. अशी व्यवस्था कायम राहिली तर राजकीय वातावरण सुधारण्याठीं निर्माण केलेली संस्थात्मक व्यवस्था फार काळ समाधानकारकपणें काम करूं शकणार नाहीं. राजकीय कार्यकर्त्यांना लोकशाहीच्या मंत्राचें व तंत्राचें डोळसपणें शिक्षण देणें हाच खरा राजकारण सुधारण्याचा मार्ग आहे. कारण पक्षकार्यकर्ते सजग व दक्ष असले आणि लोकशाहीचा स्वीकार केल्यामुळें येणाऱ्या जबाबदाऱ्यांची त्यांना जाणीव असली तर ते नेत्यांवर देखील अप्रत्यक्ष पण प्रभावी दडपण आणूं शकतील, आणि आचार-संहितेचें शब्दशः व अर्थशः पालन करायला त्यांना भाग पाडतील; एवढेंच नव्हे, तर त्यांच्यांतून हळूंहळूं असें नवें नेतृत्व तयार होईल कीं ज्यांना आचार-संहितेचा हितोपदेश करण्याची गरजच भासणार नाहीं.

(मूळ इंग्रजी निबंधाचें भाषांतर)

राजकीय पक्षांच्या निवडणुकीबाबतचा व्यवहार

श्री. एस्. एम्. जोशी

१. संसदीय लोकशाहींतील सत्ता–संपादनाचा मार्ग निवडणुकीचा होय. राजकीय पक्ष सत्ताकांक्षी असतात. पण केवळ सत्तेसाठीं सत्ता पाहिजे, आत्मगौरव व स्वार्थ साधण्यासाठीं अधिकार हातीं यावा असें कोणी मानत नाहीं. विशिष्ट राजकीय कार्यक्रम अंमलांत आणण्यासाठीं शासन-संस्थेच्या यंत्रणेवर आपलें नियंत्रण असावें अशी प्रत्येक पक्षाची भूमिका असते. राजकीय कार्यक्रम (यांत ध्येय–धोरणांचा समावेश होतो) हा जर महत्त्वाचा असेल तर सत्ता–संपादनाच्या मार्गांत—म्हणजे निवडणुकींत त्या कार्यक्रमाला बाध येईल असें कृत्य आपल्या हातून घडतां कामा नये हें प्रत्येक राजकीय पक्षानें स्वतःच मान्य केलें पाहिजे. आपला राजकीय कार्यक्रम काय असावा, त्याची पायाभूत व मार्गदर्शक तत्त्वें कोणतीं असावींत हें ठरविण्याचें संपूर्ण स्वातंत्र्य प्रत्येक पक्षाला असतें. पण एकदां अमूक एक कार्यक्रम ठरविला म्हणजे त्याला बाधक होईल असें वर्तन निवडणुकीच्या काळांत आपल्या हातून घडूं नये अशी दक्षता प्रत्येक राजकीय पक्षानें बाळगायला हवी.

२. आपल्या आजच्या सामाजिक, राजकीय व आर्थिक परिस्थितीच्या संदर्भांत कांहीं तत्त्वें सर्वांनीं पाळावींत यांवर बहुतेक राजकीय पक्षांचें तत्त्वतः एकमत आहे असें दिसतें. ज्यांचा या तत्त्वांना विरोध असेल त्यांची गोष्ट वेगळी. पण जे तत्त्वतः हीं मूल्यें मान्य करतात त्यांच्यावर तरी हें नैतिक बंधन पडतेंच कीं त्यांनीं निवडणुकांच्या वेळीं या तत्त्वांना हरताळ फांसूं नये.

३. निवडणूक लढविण्याच्या कार्यक्रमाचे दोन भाग कल्पितां येतील...

१. उमेदवारांची निवड.

२. प्रचाराचा कार्यक्रम व पद्धति.

या दोन्ही भागांबाबत वर सुचविलेली दक्षता घेणें जरूरीचें आहे. याबाबतचे कांहीं मुद्दे क्रमाक्रमानें घेतां येतील.

४. पक्षाचें तिकिट कोणाला द्यावयाचें हा प्रश्न सर्वस्वी त्या त्या पक्षाच्या अखत्यारांतला आहे. वरवर पाहतां उमेदवार–निवडीचें स्वातंत्र्य अनिर्बंध असलें तरी पक्षांतील एकी व शिस्त टिकावी, कोणाहि कार्यकर्त्याला वा सभासदाला अन्याय होऊं नये या दृष्टीनें प्रत्येक पक्ष उमेदवार–निवडीच्या कांहीं कसोट्या स्वतःपुरत्या ठरवितो. त्या कसोट्या कांटेकोरपणें पाळल्या गेल्या नाहींत तर समाजाच्या राजकीय जीवनावर अनिष्ट परिणाम होतोंच, पण मुख्य म्हणजे पक्षांतर्गत असंतोष वाढण्याची भीति असते. अर्थात् अशा प्रकारचा संभाव्य असंतोष घालविण्याची दुसरी कांहीं उपाययोजना त्या पक्षाला करतां येण्यासारखी असेल तर मग त्या कसोट्यांची फारशी फिकीर केली जात नाहीं. (बहुमत मिळण्याची आशा असलेल्या पक्षाला अशा प्रकारची तरतूद करणें सोपें जातें.) समाजाच्या राजकीय जीवनावर होणारे अनिष्ट परिणाम दूरगामी असल्यानें त्या वेळीं तरी त्यांची दखल घेतली जात नाहीं.

अंतर्गत कसोट्या त्या त्या पक्षानें ठरवावयाच्या हें खरें असलें तरी त्याबाबत निदान एक गोष्ट इतरांना सुचवितां येईल. कोणत्याहि राजकीय पक्षाच्या तिकिटावर निवडून येणाऱ्या प्रतिनिधीकडून त्या पक्षाच्या विचारप्रणालीची व कार्यक्रमाची थोडी तरी सेवा व्हावी अशी अपेक्षा असते. त्यासाठीं त्या प्रतिनिधींची त्या पक्षाच्या विचारप्रणालीवर निष्ठा असली पाहिजे. निष्ठा निर्माण व्हायला किमान किती काळ लागतो याचा सर्वसाधारण नियम सांगतां आला नाहीं तरी ३–४ महिन्यांत तरी तयार होते हें मात्र नक्कीच खरें नाहीं. तेव्हां निदान एक वर्षभर क्रियाशील सभासद असणें ही उमेदवार–निवडीची प्राथमिक कसोटी सर्व पक्षांनीं मान्य करायला हवी.

५. याच्याशीं संबंधित असलेला दुसरा विचार असा कीं, एका पक्षांत तिकिट न मिळाल्यानें जो माणूस दुसरीकडे जाईल त्याला दुसऱ्याहि पक्षांनीं तिकिट देऊं नये. ही गोष्ट विशेषतः विरोधी पक्षांना सांभाळावी लागेल. कारण काँग्रेसमध्यें तिकिट मिळविण्याचा प्रयत्न करणारांची संख्या अधिक

आहे. सगळ्यांना तिकिट मिळणें शक्यच नाहीं. तेव्हां निराश झालेले लोक इतर पक्षांकडे धांव घेण्याची शक्यता आहे. त्यांच्या जोरावर काँग्रेसला टक्कर देण्याचा मोह विरोधी पक्षांना होईल. तो त्यांनीं टाळायला हवा. असें झालें तर राजकीय संधिसाधूपणाला थोडा तरी आळा बसूं शकेल.

६. "तिकिट मागण्यापूर्वी निदान एक वर्ष सभासदत्व" ही अट जाणीवपूर्वक पाळली गेली तर त्याबरोबर दुसरीहि गोष्ट साध्य होईल. ती म्हणजे आयत्या वेळीं प्रलोभनें दाखवून अन्यपक्षीयांना वा तटस्थांना आपल्या पक्षांत ओढण्याचा प्रयत्न करतां येणार नाहीं. अर्थात् प्रलोभनें दाखवून लोक ओढणें यावर बाह्य उपाय कितीहि सुचविले तरी ते परिणामकारक ठरणार नाहींत. शब्दांच्या कचाट्यांतून सुटण्याच्या अनेक क्लुप्त्या लढवितां येतात. तेव्हां त्या त्या पक्षांनीं व विशेषतः काँग्रेसनें आत्तापासूनच जर हें धोरण स्वतः होऊन स्वीकारलें तरच त्याचा उपयोग होणार आहे. पण त्याचबरोबर किमान एक वर्षाच्या अटीनें अगदीं आयत्या वेळीं होणारी रस्सीखेच टाळण्यास मदत होऊं शकेल.

७. उमेदवार–निवडीबाबत अलीकडे जातीचा प्रश्न महत्त्वाचा होऊन बसला आहे. सगळ्याच पक्षांनीं बहुसंख्य असलेल्या जमातींतील उमेदवार निवडले तर मग प्रश्न उरत नाहीं. मग ती निवडणूक केवळ जातीच्या आधारावर लढवली जात नाहीं. पण प्रत्येक पक्षानेंहि शक्यतों जातीचा मुद्दा उमेदवार निवडीच्या दृष्टीनें गौण मानावा. बहुसंख्य जातींतील उमेदवारच निवडूं नये असें म्हणतां येणार नाहीं. पण उमेदवार हा बहुसंख्य जातींतलाच असला पाहिजे असेंहि असूं नये.

महाराष्ट्रांत अल्पसंख्य असलेली जमात एखाद्या मतदारसंघांत मात्र बहुसंख्य असेल. अशा मतदारसंघांत जर त्या जातींतला उमेदवार एक पक्ष उभा करणार असेल तर त्या पक्षानें इतरांनाहि असें सुचवावें कीं त्यांनींहि शक्यतों त्याच जातींतील उमेदवार उभा करावा. म्हणजे मग तीहि निवडणूक जातीच्या प्रश्नावर लढवली जाणार नाहीं.

८. अलीकडे निवडणूक लढविणें खर्चाची बाब होऊन बसली आहे. त्यामुळें स्वतःचा खर्च स्वतःच करून शिवाय पक्षालाहि थोडीफार मदत करूं शकेल असा उमेदवार शोधण्याकडे पक्षांचा कल झुकूं लागला आहे.

आणि त्यासाठीं मोठे सधन शेतकरी, मिलमालक, व्यापारी यांना मुद्दाम पक्षांत ओढलें जातें. कांहीं ठिकाणीं अशा व्यक्ति स्वतःचा स्वार्थ साधण्यासाठींहि मुद्दाम पक्षांकडे जातात. अशा वेळीं शक्यतों त्या त्या व्यक्तींच्या पैशाचें दडपण पक्षांवर पडणार नाहीं अशी खबरदारी घेतली जावी. तिकिटासाठीं करावयाच्या अर्जाबरोबर कांहीं रक्कम पक्षाच्या मध्यवर्ति समितीकडे अनामत ठेवण्याचें बंधन कांहीं पक्ष घालतात. ही रक्कम त्या उमेदवारानें स्वतःच्या खिशांतलीच दिली पाहिजे असें नाहीं. त्या मतदार संघांतून जमवून दिली तरी चालेल असा पक्षनेत्यांचा आदेश असतो. पण मतदारसंघांतील पक्षाचे कार्यकर्ते मात्र ही रक्कम त्या उमेदवारानें स्वतःच भरायची आहे असें समजून वागतात. यासाठीं त्या मतदारसंघांतून किमान शंभर व्यक्तींकडून एक हजार रुपये जमवून ते भरले जावेत, अशा प्रकारचें कांहींतरी बंधन असलें पाहिजे. अशा निर्बंधांतूनहि पळवाटा काढल्या जातीलच. पण कोणी पळवाट काढली आहे हें त्या पक्षाच्या कर्त्या नेत्यांना निश्चित समजूं शकतें. त्यांनीं जर ठरविलें तर ते कार्यकर्त्यांना हा निर्बंध कटाक्षानें पाळायला लावूं शकतील.

९. जात किंवा पैसा याप्रमाणें धार्मिक, सांप्रदायिक, जहागिरदारी, कारखानदारी वा तत्सम कारणांमुळें महत्त्व पावलेल्या व्यक्तींनाहि केवळ तेवढ्यासाठीं तिकिट दिलें जाऊं नये. भूतपूर्व संस्थानिक, जहागिरदार, मालगुजार यांच्याशीं त्या त्या भागांतील लोकांच्या सरंजामशाही निष्ठा निगडित झालेल्या असतात. निवडणुकींत अशा निष्ठांचा उपयोग करून घ्यायचा मोह राजकीय पक्षांना होत असतो. त्याला बळी पडणें म्हणजे पर्यायानें या जुन्या निष्ठांना वरदान देण्यासारखें आहे. ही लोकशाही विघातक ठरणारी आहे असें बहुतेक सर्व राजकीय पक्ष—निदान महाराष्ट्रांतले तरी—मान्य करतात. पण निवडणुकींच्या वेळीं मात्र हें भान कोणालाहि तितकेसें राहिलेलें दिसत नाहीं. पण सगळ्या पक्षांनीं मिळून ठरविलें तर हा मोह दूर सारणें जड जाणार नाहीं.

१०. उमेदवार—निवडीशीं प्रत्यक्ष नसला तरी अप्रत्यक्षपणें संबंधित असलेला प्रश्न म्हणजे पडेल उमेदवारांची सोय पाहण्याचा. निवडणुकींत कांहीं उमेदवार हरणारच. तेवढ्यावरून त्यांच्या सेवेला समाजानें कायमचें

मुकावें हें योग्य नाहीं. त्या कार्यकर्त्यांचा इतर मार्गांनीं उपयोग करून घेणें योग्य आहे. जिल्हा व तालुका विकास मंडळांवर त्यांना स्थान दिल्यास तें योग्यच आहे.

पण या बाबतींत पक्षपाती भूमिका असूं नये. सत्तेवर असलेल्या पक्षाच्या पडेल उमेदवारांना सोनें चिकटलेलें असतें, आणि इतर पक्षांचे पडेल उमेदवार मात्र अगदीं निरुपयोगी असतात असें मानणें चूक आहे. तेव्हां विधायक कार्यक्रमाशीं अशा उमेदवारांचा संबंध जुळवून आणतांना पक्षपाती दृष्टि न ठेवतां विरोधी पक्षाच्या पडेल उमेदवारामागेंहि जनमताचें कांहीं पाठबळ आहे हें जाणून त्याची योग्य ती कदर केली पाहिजे. त्यामुळें विरोधी पक्षातर्फे उभें राहून निवडणूक हरलों तर तो आपला राजकीय मृत्यु ठरेल अशी भीति कार्यकर्त्यांच्या मनांत राहणार नाहीं व पर्यायानें सत्ताधारी पक्षाकडेच सगळ्यांचे पाय वळण्याची अगतिकता उरणार नाहीं.

११. निवडणुकीचा दुसरा भाग प्रचाराची मोहीम. आपल्या जाहीरनाम्याच्या आधारावरच प्रचार करावा, विरोधी पक्षावर टीका करावयाची ती त्याच्या जाहीरनाम्याला व त्याच्या राजकीय चारित्र्याला अनुलक्षून. हा आदर्श सगळेजण तत्त्वतः मान्य करतात. पण व्यवहारांत त्याचें भान फारच थोड्यांना राहतें. गेल्या दोन सार्वत्रिक निवडणुका व स्थानिक संस्थांच्या निवडणुकांत प्रचाराची पातळी किती खालच्या थरावर जाते, वाटेल त्या इष्टानिष्ट मार्गांचा, साधनांचा कसा वापर केला जातो तें आपण पाहिलें आहे. तो अनुभव जमेस धरून कांहीं सूचना करतां येतील—

(१) **वैयक्तिक प्रचार**—विरोधी पक्षाच्या उमेदवाराच्या वैयक्तिक गुणदोषांची चर्चा करूं यये. आपल्या उमेदवाराचा वैयक्तिक चांगुलपणा सांगायला हरकत नाहीं. पण विरोधी उमेदवाराच्या अगदीं खाजगी बाबी उदा. दोन लग्नें, विवाहबाह्यसंबंध इ. यांचा उल्लेख टाळला पाहिजे. अर्थात् विरोधी उमेदवाराच्या सार्वजनिक चारित्र्याची चर्चा करायला हरकत नाहीं. सोयीप्रमाणें पक्ष बदलणें, राज्यकारभारांत अनधिकृत ढवळाढवळ करणें, सार्वजनिक संस्थांतील पैशाचा अपहार करणें यांसारख्या गोष्टींचे पुरावे उपलब्ध असतील तरच ते आरोप करण्यांत यावेत.

(२) **वैयक्तिक वा सामुदायिक धाकदपटशा**—कांहीं व्यक्तींना वा गटांना दमबाजी करण्यांत येते. विरोधी उमेदवाराचा प्रचार केलात तर नोकरी, उद्योगधंदा, इत्यादींवर परिणाम होईल असा दम दिला जाऊं येथे.

(३) **वैयक्तिक वा सामुदायिक प्रलोभनें**—दंडाप्रमाणें दामाचाहि उपयोग अनिष्ट होय. पण याचा तर सर्रास वापर केला जातो. व्यक्तिशः पैसे देण्याचें प्रमाण स्थानिक निवडणुकांत जास्त असतें. तर सार्वत्रिक निवडणुकांत, वस्त्यांना, गटांना, मंडळाना किंवा गांवांना सामुदायिकरीत्या आश्वासनें दिलीं जातात व अनेक वेळा तर ती मतदानाच्या आधींच पुरीं करावीं लागतात. हे प्रकार थांबले पाहिजेत.

(४) सरकारी नोकर, विद्यार्थी, प्राथमिक शिक्षक, सहकारी संस्थांतील नोकर यांना प्रचारासाठीं राबविलें जाणें ही गोष्टहि आपल्या परिचयाची झाली आहे. असा गैरवापर न करण्याचा कटाक्ष त्या त्या पक्षांनीं ठेवला पाहिजे.

(५) सहकारी संस्था, ग्रामपंचायती, मजूर संघटना इत्यादि संस्थांकडून निवडणूक निधीसाठीं मदत घेतली जाऊं नये. सहकारी संस्थांनीं राजकीय पक्षांना मदत देण्याबाबत नुकतीच कायद्यांत दुरुस्ती झाली आहे. पण त्या दुरुस्तीप्रमाणें सर्रास व्यवहार सुरूं झाला तर त्या संस्थांतहि गटबाजीचें राजकारण वाढीस लागण्याची भीति आहे. म्हणून अशा संस्थांना निवडणूक-निधीस मदत करण्याची बंदी घालावी.

पण जर समजा हें मान्य होणार नसेल तर मग निदान एवढें तरी बंधन स्वीकारावें कीं, अशा संस्थांनीं पक्षांना मदत करावी, व्यक्तिशः उमेदवारांना मदत करूं नये. त्यामुळें पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांना ही गोष्ट समजेल व त्यामुळें त्यांचा त्या त्या भागांतील कार्यकर्त्यांना थोडा तरी वचक राहील.

१२. या सर्व बाबतींत नेमकी अडचण येते ती देखरेखीची. प्रत्येक पक्ष असें म्हणत असतो कीं, दुसरे पक्ष असल्या अनिष्ट मार्गांचा अवलंब करीत आहेत. त्यामुळें खरें कुणाचें मानायचें असा प्रश्न पडतो. याबाबत

निःपक्षपाती न्यायमंडळ मान्य केलें तरच त्याचा कांहीं उपयोग होऊं शकेल.

अशा प्रकारचें न्यायमंडळ सर्व पक्षांना मान्य झालें तर त्याची घटना व कार्यपद्धति काय असावी तें सर्वांच्या विचारानें ठरवितां येईल.

पण जर न्यायमंडळाची कल्पना मान्य नसेल तर निदान प्रत्येक पक्षानें देखरेखीची व्यवस्था करावी. याबाबत एवढें सुचवितां येईल कीं, अ पक्षानें अनिष्ट साधनांचा वापर केला आहे असें त्या मतदारसंघातील व पक्षाच्या कार्यकर्त्यांना वाटलें तरी त्यांनीं तो आरोप लगेच करूं नये. तो आरोप व त्याबाबतचें आपलें म्हणणें आपल्या म्हणजे ब पक्षांतील निवडणूक समिति किंवा तिनें नेमलेलें एखादें पक्षांतर्गत देखरेख मंडळ यांच्याकडे कळवावा. त्या समितीनें किंवा मंडळानें त्या आरोपांची शहानिशा करावी, आणि त्यांत तथ्य आहे असें वाटलें तर तो आरोप जाहीर करावा.

ब पक्षाच्या जबाबदार लोकांनीं असा आरोप केला तर अ पक्षाच्या निवडणूक समितीनें किंवा देखरेख मंडळानें त्या आरोपांची शहानिशा करावी. संकुचित पक्षहिताची कल्पना शक्यतों त्या चौकशीच्या आड येऊं देऊं नये. आणि आपले निष्कर्ष जाहीर करावेत. अगदीं निःपक्षपाती न्यायमंडळाच्या चौकशीपेक्षां व निर्णयापेक्षां अशा प्रकारच्या पक्षांतर्गत चौकशीचें मूल्य कमीच असणार. तरी पण ब पक्षांतल्या जबाबदार लोकांनीं केलेल्या आरोपांची दखल घेतांना अ पक्षांतल्या जबाबदार नेत्यांनाहि थोडाफार सदसद्विवेक करावा लागेल.

१३. अर्थात् नुसतें एवढेंच करून भागेल असें नाहीं. जर आपल्या पक्षांतील कार्यकर्त्यांचा दोष आहे असें आढळून आलें तर तो दोष जाहीरपणें मान्य केला पाहिजे, व त्या कार्यकर्त्यांना शासन केलें पाहिजे. अशा प्रकारचें शासन प्रत्येक राजकीय पक्ष जितक्या प्रमाणांत करूं शकेल तितक्या प्रमाणांत प्रचारमोहिमेंतील व पर्यायानें निवडणूक-मोहिमेंतील शुद्धता वाढीस लागेल.

———

राजकीय पक्षांचा स्थानिक संस्थांबाबतचा व्यवहार

प्रा. र. वि. रानडे

आधुनिक लोकशाही शासन-व्यवस्थेंत राजकीय पक्षांचें अस्तित्व अनिवार्य आहे. पक्षीय राजकारणाचे दुष्परिणाम सार्वत्रिक असले तरी दुसऱ्या अधिक चांगल्या पर्यायाच्या अभावीं पक्षराजकारणाशिवाय गत्यंतर नाहीं. अपक्ष लोकशाहीच्या कल्पनांना मूर्त स्वरूप कितपत मिळेल ह्याबद्दल शंका वाटते. म्हणून राजकीय पक्षांचें अस्तित्व, त्यांची परस्परांमधील सत्ता हातगत करण्यासाठीं चाललेली स्पर्धा आणि ह्या स्पर्धेमधून निर्माण होणारे संघर्ष ह्या गोष्टी गृहीत धरूनच प्रस्तुत प्रश्नाचा विचार व्हायला हवा.

शासन-संस्थेची निर्मिति व्यक्तींच्या जाणीवेंतून निर्माण होणाऱ्या सामूहिक प्रेरणेवर आधारलेली असते आणि त्यामुळें प्रत्येक व्यक्तीचें हित आणि कल्याण समष्टि-हितांत आणि कल्याणांत अंतर्भूत झालेलें असतें. हें तात्त्विक विवेचन कितीहि आकर्षक वाटलें तरी वास्तवामध्यें व्यक्तीच्या कल्याणासंबंधींच्या कल्पनांमध्यें विरोध आढळून येतात. ह्याच विरोधांतून वर्गीय, जातीय, धार्मिक इ. प्रकारचे विग्रह समाज-जीवनांत निर्माण होतात. ह्यांतूनच राजकीय पक्षांची निर्मिति होते. हे राजकीय पक्ष राजकीय सत्ता हस्तगत करण्यासाठीं झगडत असतात. ज्या समाजांत राजकीय सत्तेचा उपभोग आळीपाळीनें वेगवेगळे राजकीय पक्ष घेतात तिथें खेळीमेळीचें वातावरण निर्माण होऊन खऱ्या अर्थानें सत्तेसाठीं स्पर्धा चालूं राहते; ह्या स्पर्धेचे अलिखित नियम तयार होतात आणि ह्या नियमांचें बंधन प्रत्येक राजकीय पक्ष स्वेच्छेनें स्वतःवर घालून घेतो. ज्या समाजांत एक विशिष्ट राजकीय पक्ष आपली मक्तेदारी टिकवून ठेवण्यासाठीं चांगल्या-वाईट साधनांचा उपयोग करून दुसऱ्या राजकीय पक्षांची मुस्कटदाबी करतो, त्या समाजांत विग्रहाला सुरुवात होते. ह्या संदर्भांत भारतीय राजकारणांतील राजकीय पक्षांच्या स्थानाबद्दल, कार्याबद्दल आणि परस्पर-संबंधांबद्दल विचार व्हायला हवा.

प्रस्तुत निबंधाचा विषय स्थानिक स्वराज्य संस्थांच्या राजकारणापुरता मर्यादित आहे. राष्ट्रीय किंवा राज्यांच्या राजकारणामध्यें विविध राजकीय पक्षांनीं जीं पथ्यें पाळायला हवींत त्यांचा विचार दुसऱ्या दोन निबंधांमध्यें होणार आहे. इथें स्थानिक संस्थांबाबतचा दृष्टिकोन कसा असावा ह्याचें प्राथमिक विवेचन करण्याचा प्रयत्न आहे.

शासन-संस्थेच्या मर्यादा कितीहि वाढल्या तरी व्यक्तीचें अधिकांश जीवन स्थानिक परिसरांतच विकास पावतें. तिची जोपासना होते ती स्थानिक वातावरणांत. राजकीय मर्यादा विस्तृत होत गेल्या तरी नागरी जीवनाचें (Civil Life) परिणाम म्हणून खेडें, गांव किंवा शहर कायम असतें. म्हणून शासन-व्यवस्थेंत राष्ट्रीय आणि स्थानिक शासनांना सारखेंच महत्त्व असायला हवें. दुर्दैवानें, आपल्याच देशांत नव्हे तर सर्वत्र स्थानिक शासनव्यवस्थेकडे दुर्लक्ष होत आहे. राजकीय पुढाऱ्यांचें लक्ष राष्ट्रीय शासन-सत्तेंत सहभागी होण्याकडे अधिक आहे. कारण स्थानिक शासनांपेक्षां तेथें सत्तेचा उपभोग अधिक प्रमाणांत घेतां येतो. लोकशाही शासन-व्यवस्थेंत तर स्थानिक शासन संस्थांकडेच अधिक लक्ष पुरविलें जायला हवें. कारण लोकांना शासनांत प्रत्यक्ष भाग घेणें तेथेंच शक्य होतें. राष्ट्रीय शासनांत भाग घेण्यासाठीं जनता मेंढरांच्या कळपासारखी हांकली जाते. सत्तेच्या केंद्रीकरणांत लोकशाही जिवंत राहण्याची शक्यता कमी म्हणूनच विकेंद्रीकरणांची भाषा आजकाल बोलली जाते आहे. अड्रॉल्फ गॅसर ह्या स्विस राज्यशास्त्रज्ञाच्या मतें युरोपीय लोकशाहीचें भवितव्य तिथल्या स्थानिक शासनसंस्थांच्या उद्धारावर अवलंबून आहे. भारतांत पंचायतींच्या पुनरुद्धाराचा प्रयत्न ह्याच दृष्टिकोनांतून केला जात आहे. स्वयंशासनाचें प्राथमिक घटक म्हणून पंचायती कार्य करतील अशी पंचायती राज्यामागील कल्पना आहे.

भारतीय लोकशाहीच्या भवितव्याच्या दृष्टीनें ग्रामपंचायतींचें संघटन आणि कार्य अधिक महत्त्वाचें आहे. शहरांमधील महापालिकांमध्यें किंवा नगरपालिकांमध्यें देखील नागरिकांना शासनांत प्रत्यक्ष भाग घेतां येत नाहीं ग्रामपंचायतीच्या ग्रामसभेंत खेड्यांतला प्रत्येक नागरिक सभासद

असतो. हें जेथें शक्य नसेल तिथें निदान प्रत्येक कुटुंबप्रमुख सभासद असावा लागतो. त्यामुळें प्रत्यक्ष लोकशाहीच्या दृष्टीनें खेडें विभागांतील पंचायती ह्याच स्वयंशासनाचीं प्राथमिक स्थानें ठरतात. भारतांतील स्थानिक-स्वराज्य संस्थांच्या आणि विशेषतः पंचायतींच्या शासनव्यवस्थेंत राजकीय पक्षांचें स्थान काय आहे आणि तें कसें असावें ह्याचा विचार प्रामुख्यानें व्हावयास हवा. पाश्चिमात्य देशांमध्यें लोकशाही शासनपद्धतीच्या विकासांतच राजकीय पक्ष उदयाला आले. प्रातिनिधिक संस्थांचा उदय होण्याच्या कितीतरी अगोदर स्थानिक शासनसंस्था अस्तित्वांत असल्यानें राजकीय पक्षांचें सर्व लक्ष राष्ट्रीय शासन हस्तगत करण्याकडे होतें. त्यांचें संघटन, कार्य आणि कार्यक्रम राष्ट्रव्यापी स्वरूपाचे झाले. ह्या परंपरेमुळें इंग्लंड, अमेरिका, फ्रान्स इ. युरोपीय देशांत स्थानिक-स्वराज्य संस्थांच्या बाबतींत राष्ट्रव्यापी राजकीय पक्ष फारसें लक्ष घालीत नाहींत. उलट हिंदुस्थानांत मात्र वेगळेंच दृश्य दिसतें. १९५७ मध्यें आंतरराष्ट्रीय राज्यशास्त्र परिषदेतर्फे करण्यांत आलेल्या पाहणींत (A Comparative Study of Rural Local Governments in Sweeden, Italy and India) एक गोष्ट स्पष्टपणें दिसून आली ती ही कीं हिंदुस्थान, इटाली आणि स्वीडनमध्यें राष्ट्रव्यापी राजकीय पक्षांचा प्रभाव तेथील स्थानिक स्वराज्य-संस्थांच्या राजकारणावर बऱ्याच मोठ्या प्रमाणावर पडलेला आहे. हिंदुस्थानांत हें जें घडतें आहे त्याला कारणें पुढीलप्रमाणें :—

(१) शतकानुशतकें टिकून राहिलेली ग्रामसंस्था आणि पंचायत शासनसंस्था इंग्रजांच्या अमदानींत नष्ट झाली. जुनी ग्रामसंस्था बदललेल्या युगांत योग्य आणि कार्यक्षम ठरली असती किंवा नाहीं हा प्रश्न वेगळा. पण इंग्रजांनीं जी नवी महसूल पद्धति भारतांत अस्तित्वांत आणली तिच्यामुळें नवीन समाजरचनेला अनुरूप असें परिवर्तन जुन्या ग्रामसंस्थेंत होण्याची शक्यता उरलीच नाहीं. १९ व्या शतकाच्या शेवटीं आणि २० व्या शतकाच्या सुरुवातीला हिंदुस्थानांत स्थानिक-स्वराज्य संस्था नव्यानें निर्माण करण्यासाठीं कायदे केले गेले आणि जुनी पंचायत संस्था उर्जित करण्याचा प्रयत्न सुरूं झाला. स्वातंत्र्यपूर्व काळांत राजकीय चळवळीचें नेतृत्व करणाऱ्या काँग्रेसनें स्थानिक-स्वराज्य-संस्थांमध्यें शिरून त्या हस्तगत

करण्याचा सफळ प्रयत्न केला. इतरहि राजकीय पक्षांनीं तशीच पावलें टाकलीं.

(२) स्वातंत्र्योत्तर काळांत राष्ट्रीय आणि राज्यांच्या शासन यंत्रणेंत काँग्रेसखेरीज इतर राजकीय पक्षांना भाग घेतां येणें शक्य नसल्यानें ठिकठिकाणीं त्यांनीं स्थानिक-शासनसंस्था काबीज करण्याचें ठरविलें.

(३) स्थानिक-स्वराज्य-संस्थांच्या निवडणुकांमध्यें पक्ष म्हणून भाग घ्यायचा नाहीं असें धोरण काँग्रेसनें ठरविलें होतें. पण इतर राजकीय पक्ष हळू हळू ग्रामीण विभागांत पाय रोवताहेत हें आढळतांच काँग्रेस पक्ष ह्या बाबतींत उदासीन राहणें शक्य नव्हतें. विशेषतः साम्यवादी पक्षानें पंचायती हस्तगत करण्याचें ठरवितांच आणि कांहीं राज्यांमध्यें विशेषतः केरळमध्यें ग्रामपंचायती साम्यवादी पक्षाच्या हातांत जाण्याची शक्यता दिसूं लागतांच तिथें काँग्रेस, प्र. स. पक्ष इ. पक्ष निवडणुकीच्या आखाड्यांत उतरले. उत्तर प्रदेशांत साम्यवादी पक्षाचें नेतृत्व असलेल्या किसान सभांनीं पंचायती काबीज करण्याचें ठरवितांच तिथल्या निवडणुकी पक्षातीत राहणें कठिण होऊन बसलें.

(४) मोठाल्या शहरांमध्यें असलेल्या महानगरपालिकांच्या किंवा नगरपालिकांच्या निवडणुकींमध्यें राजकीय पक्षांनीं भाग घेण्याची परंपरा स्वातंत्र्यपूर्व काळांत सुरू झाली होती ती नंतरहि चालूच आहे. कारण प्रत्येक राजकीय पक्षाला सत्तारूढ असलेल्या काँग्रेस पक्षाचा विरोध करणें हा प्रतिष्ठेचा प्रश्न वाटतो.

आज वस्तुस्थिति अशी आहे कीं, प्रत्येक राजकीय पक्षानें स्थानिक-स्वराज्य संस्था हस्तगत करण्याचा कार्यक्रम स्वीकारलेला आहे. पंचायतींच्या निवडणुकींत अलिप्त राहण्याची काँग्रेसची किंवा प्र. स. पक्षाची भूमिका टिकून राहील असें दिसत नाहीं, कारण आजच्या भारताच्या राजकीय परिस्थितींत प्रत्येक राजकीय पक्षासमोर पक्ष म्हणून टिकून राहण्याचाच प्रश्न अधिक महत्त्वाचा आहे. पक्षाची बांधणी करण्याच्या दृष्टीनेंच जिथें जिथें सत्ता हस्तगत करण्याची शक्यता असेल तिथें तिथें वेगवेगळे राजकीय पक्ष पुढें सरसावतात. ही सर्व धडपड

नागरी जीवनांतले प्रश्न कार्यक्षमतेनें सुटावेत म्हणून नव्हे तर पक्ष टिकून राहावा म्हणून चाललेली आहे. मुंबई महापालिकेच्या निवडणुकीपासून ते ग्रामपंचायतींच्या निवडणुकीपर्यंत हेंच घडतें आहे. आणि ह्या प्रक्रियेंत अत्यंत वाईट गोष्ट म्हणजे मतदार पण पक्षीय भूमिकेवरूनच मतदान करतो. कारण त्याला तशीच संवय जडली आहे. तात्पर्य हें कीं, हिंदुस्थानांत स्थानिक-स्वराज्य संस्थांच्या राजकारणावर राजकीय पक्षांचा प्रभाव भक्कम स्वरूपाचा आहे. तो तसा नसावा असें वाटल्यानें कमी होणार नाहीं. सत्ता उपभोगाची एका राजकीय पक्षाची मिरासदारी संपून इतर राजकीय पक्षांना सत्तेंत वांटा मिळेल तेव्हांच तो प्रभाव कमी होण्याची शक्यता आहे. मग आहे ह्या परिस्थितींत स्थानिक-स्वराज्य संस्थांच्या बाबतींत करावयाच्या राजकारणांत राजकीय पक्षांनीं कांहीं पथ्यें पाळायला हवींत किंवा नाहीं? आणि असतील तर तीं कोणतीं?

: २ :

आजच्या परिस्थितींत स्थानिक राजकारण आणि राष्ट्रीय राजकारण ह्या एकाच प्रक्रियेच्या दोन अवस्था असल्यानें राजकीय पक्षांनीं परस्परांच्या संबंधांत पाळावयाच्या संकेतांमध्यें स्थानिक आणि राष्ट्रीय पातळींवरील आचार संकेत असा मूलभूत भेद करतां येणार नाहीं. परंतु शासनाच्या ह्या दोन पातळींवरील कार्याचें आणि संघटनेचें स्वरूप वेगळें असल्यामुळें राष्ट्रीय पातळीवर जे विरोध राजकीय पक्षांच्या कार्यक्रमांमध्यें असतील तसे स्थानिक प्रश्नांच्या बाबतींत असणार नाहींत. कारण नागरी जीवनांतील प्रश्नांच्या बाबतींत तात्विक मतभेदाला फारसा वाव नसतो. त्यामुळें स्थानिक-स्वराज्य संस्थांच्या शासनांत वेगवेगळ्या राजकीय पक्षांना पक्षीय कार्यक्रम समोर ठेवून राजकारण करणें कठिण जातें. परंतु सांप्रतच्या राजकीय वातावरणांत स्थानिक-स्वराज्य संस्थांमध्यें पक्षीय राजकारणाला ऊत येत असल्यानें येथेंहि सर्व राजकीय पक्षांनीं राष्ट्रव्यापी राजकारणांत त्यांनीं पाळावयाचीं पथ्येंच पाळायला हवींत. त्या व्यतिरिक्त खालील संकेत त्यांनीं पाळावेत.

(१) स्थानिक-स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसंबंधींचे निर्णय पक्षांच्या स्थानिक शाखेनें घ्यावेत आणि निवडणुकीसाठीं करावयाचे प्रयत्न स्थानिक पुढाऱ्यांकडूनच व्हावेत.

(२) जाहीर भाषणांशिवाय दुसऱ्या कोणत्याच साधनांचा उपयोग होऊं नये. हीं भाषणें एकाच वेळीं एकाच व्यासपीठावर व्हावींत. वेगवगळ्या राजकीय पक्षांच्या उमेदवारांनीं किंवा त्यांच्या समर्थकांनीं एकाच वेळीं एकाच व्यासपीठावरून मतदारांच्या समोर आपआपल्या बाजू मांडल्या तर परस्परांच्या उखाळ्या-पाखाळ्या काढणें कठिण होईल आणि प्रचाराच्या भाषणांचा दर्जा वरचा राहूं शकेल.

(३) ज्याचें पक्षसदस्यत्व निदान तीन वर्षांपासून आहे अशालाच उमेदवार म्हणून निवडावा.

(४) स्थानिक प्रश्नांशिवाय इतर प्रश्नांच्या आधारावर प्रचारांचीं भाषणें करूं नयेत.

(५) निवडणूक झाल्यानंतर स्थानिक शासनासंबंधीं घ्यावयाच्या निर्णयावर पक्षीय संघटनेचा उपयोग करून दडपण आणूं नये.

(६) ज्यामुळें राजकीय पक्षांच्या मानबिंदूंना धक्का बसेल अशा विषयांवर वादविवाद किंवा ठराव करूं नयेत. तत्त्वतः जगांतल्या कोणत्याहि प्रश्नावर चर्चा करून ठराव करण्याचा अधिकार नागरी संस्थांना असला तरी तारतम्य बाळगायला हवें.

(७) पंचायत किंवा इतर स्थानिक स्वराज्य-संस्था ह्या विकास कार्यक्रमाचीं प्राथमिक स्थानें असल्यानें विकास कार्याच्या बाबतींत पक्षीय भूमिकेवरून शासनाकडून मिळणाऱ्या मदतीचे बाबतींत पक्षपात केला जाऊं नये. पक्षपात होतो आहे असें नागरिकांना आढळलें तर लोकांचा विकास कार्यक्रमावरील विश्वासच उडून जाईल.

(८) स्थानिक शासनांतील कर्मचारी आणि इतर कार्यकारी अधिकारी अधिकारारूढ राजकीय पक्षांचे सेवक आहेत ह्या जाणीवेनें त्यांना वागविलें जाऊं नये. त्यांच्या नेमणुकी पक्षनिष्ठेच्या आधारावर केल्या जाऊं नयेत.

(९) स्थानिक स्वराज्य संस्थेमध्यें बहुमत मिळणें शक्य नाहीं म्हणून विरोधी पक्षानें राज्य सरकारवर दडपण आणून स्थानिक शासन बरखास्त करवून घेतल्यास नागरिकांचा स्थानिक स्वराज्य संस्थेच्या स्वायत्ततेवरील विश्वास उडेल. म्हणून राज्यसरकारच्या ह्या अधिकाराचा (बरखास्त करण्याच्या) वापर फार काळजीपूर्वक व्हावा.

राजकीय सत्तेचें विकेंद्रीकरण केल्याशिवाय लोकशाही यशस्वी होणें कठिण म्हणून हिंदुस्थानांत पंचायती राज्याची कल्पना प्रत्यक्षांत उतरविण्यासाठीं अधिकारसंपन्न पंचायती स्थापन करण्याचा कार्यक्रम सर्व राज्यांनीं स्वीकारला आहे. पंचायतींचा प्रयोग यशस्वी करण्याच्या दृष्टीनें वेळोवेळीं ज्या सूचना करण्यांत आल्या आहेत त्यांत पंचायतींच्या कारभारांत पक्षीय राजकारणाला मुळींच वाव मिळूं नये ही सूचना सार्वत्रिक दिसते. कॉंग्रेस व प्र. स. पक्षानें हें पथ्य पाळण्याचें जाहीर वचन दिलें, इतर राजकीय पक्षांनीं देखील हें बंधन स्वीकारायला हवें. वर नमूद केलेल्या नऊ सूचना स्थानिक राजकारणामधील कटुता दूर करण्याच्या दृष्टीनें केलेल्या आहेत. पण राजकीय पक्षांच्या नेत्यांनीं आणि विचारवंतांनीं मूलग्राही विचार करावा आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या राजकारणांत राजकीय पक्षांनीं भाग घ्यावा किंवा नाहीं हें ठरवावें. स्थानिक जीवनाची स्वायत्तता आणि एकजिनसीपणा टिकून राहणें समाज-हिताच्या दृष्टीनें आवश्यक आहे किंवा नाहीं ह्याचा विचार करावा. प्रस्तुत लेखकाला असें वाटतें कीं, राजकीय पक्षांनीं स्थानिक स्वराज्य संस्थांच्या राजकारणांतून आपले पाय काढून घेतले तर निरोगी नागर-जीवन निर्माण होऊं शकेल.

——

राजकीय पक्षांचा स्थानिक संस्थांबाबतचा व्यवहार

प्रा. राम जोशी

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या संदर्भात आचार-संहितेचा विचार करण्यापूर्वी नेहमी विचारल्या जाणाऱ्या एका महत्त्वाच्या प्रश्नाचें उत्तर प्रथम दिलें पाहिजे. स्थानिक संस्थांच्या राजकीय पक्षांची आवश्यकता आहे काय? असा प्रश्न नेहमी विचारला जातो. फक्त अपक्ष लोकशाहीचे पुरस्कर्ते तो विचारतात असें नाहीं तर ज्यांना राजकीय पक्षांची आवश्यकता पटलेली आहे अशांपैकीं देखील कांहीं लोक हा प्रश्न विचारतात. पहिल्या प्रकारच्या लोकांना पक्षांचें अस्तित्वच नको आहे तर दुसऱ्या प्रकारच्या मंडळींना पक्षनिष्ठ राजकारणाला स्थानिक संस्थांचे बाबतींत अपवाद करावासा वाटतो. राज्य किंवा राष्ट्र यांच्या पातळीवर पक्षपद्धतीची अपरिहार्यता ते मान्य करतात.

अपक्ष लोकशाहीच्या पुरस्कर्त्यांच्या एतद्विषयक भूमिकेच्या तपशीलांत शिरण्याचें कारण नाहीं. इतकें सांगितलें म्हणजे पुरे कीं त्या भूमिकेचे दोन भाग आहेत. पहिला आधुनिक पक्षनिष्ठ लोकशाहीवरील आक्षेपांचा व दुसरा अपक्ष पद्धतीनें लोकशाही कशी चालवावी याविषयींच्या सूचनांचा जयप्रकाशजी वगैरे सर्वोदयवाद्यांनीं आधुनिक लोकशाहीवर कांहीं अतिशय मौलिक आक्षेप घेतलेले आहेत, पण त्यांचा परामर्ष येथें घेण्याचें प्रयोजन नाहीं. दुसरा भाग अपक्ष शासनाविषयींच्या विधायक सूचनांचा. या भागांतील विवेचनाचा प्रायः सर्व आधार प्राचीन भारतांतील स्वायत्त ग्रामराज्यें होत. हीं ग्रामराज्यें खरोखरीं इतकीं आदर्श होतीं किंवा नाहीं हा प्रश्न बाजूला ठेवला तरी आधुनिक यंत्राधिष्ठित संस्कृतीच्या व राष्ट्रव्यापी शासन-व्यवस्थांच्या काळांत ग्रामराज्यांचा आदर्श कितपत व्यवहार्य ठरेल याची शंका वाटते. पक्षीय राजकारणाचे दुष्परिणाम लक्षांत घेतले तरी जोंवर अधिक चांगला व व्यवहार्य पर्याय सांपडत नाहीं तोंवर पक्षनिष्ठ शासन अपरिहार्य आहे. शिवाय पक्षसंघटना दोषास्पद आहे हें मान्य

करूनहि असें विचारतां येईल कीं भारतांत राजकीय पक्ष तर गेल्या पन्नास पाऊणशें वर्षांत आले ना ? मग तत्पूर्वी तरी गांवांचा कारभार नीट चालत होता काय ? त्यावेळीं वैयक्तिक महत्त्वाकांक्षा, सत्तास्पर्धा किंवा गटबाजी आणि जातीयवाद यांसारख्या दोषांपासून ग्रामपंचायती मुक्त होत्या काय ? जातीय भावना ही तर आपल्याकडील इतकी स्थायी व प्रभावी भावना आहे कीं सुस्पष्ट कार्यक्रमांवर आधारलेल्या पक्षांच्या अभावीं तीच भावना प्रबळ होणार. पक्षांचें वर्चस्व वाढलें तर ह्या जातीय भावनेला राजकीय तत्त्वज्ञानाचा किंवा कार्यक्रमाचा बुरखा घालून मिरवावें लागतें, उघडपणें फिरतां येत नाहीं. हाहि पक्षांच्या अस्तित्वाचा कांहीं लहान-सहान फायदा नव्हे. स्थानिक संस्थांच्या कारभारांत चाललेली पक्ष-बाजी बघ्याच-वेळीं उद्वेगजनक असते हें मान्य केलें तरी एकंदरींत स्थानिक संस्थांच्या कारभारांत राजकीय पक्ष पडले त्यामुळें त्या संस्थांचें शासन बरेचसें व्यक्तिनिरपेक्ष, स्पष्ट व पूर्वनियोजित कार्यक्रमाप्रमाणें व कार्य-क्षमतेनें चालूं लागलें हें नाकारण्यांत अर्थ नाहीं. अपक्ष लोकशाहीवाद्यांना अभिप्रेत असलेली व्यवस्था मूर्त स्वरूप घेऊं शकणार नाहीं. म्हणून स्थानिक संस्थांमध्यें राजकीय पक्ष असणें अनिवार्य आहे. असें गृहीत धरूनच संहितेचा विचार झाला पाहिजे.

स्थानिक संस्थांच्या कारभारांत राजकीय पक्ष नकोत, इतरत्र चालतील असें म्हणणाऱ्यांची भूमिका तात्विक नसून व्यावहारिक आहे. त्यांचा पक्षपद्धतीला विरोध नाहीं पण ती पद्धति स्थानिक संस्थांमध्यें सुरू करूं नये असें त्यांना वाटतें. पक्षपद्धतीचे दोष त्यांना स्पष्टपणें जाणवत असल्यामुळें व स्थानिक संस्थांमध्यें मूलगामी मतभेदांना वाव नसल्यामुळें त्यांना पक्षांची आवश्यकता भासत नसावी. पण थोडा सूक्ष्म विचार केला तर असें लक्षांत येईल कीं स्थानिक स्वराज्य संस्थांची देखील वर्गवारी करावी लागते. छोट्याशा खेड्यापासून तों मुंबई, कलकत्ता यांसारख्या मोठ्या शहरांपर्यंत विविध प्रकारच्या स्थानिक संस्था असतात व त्यांचें कार्यक्षेत्र, अधिकार, आर्थिक स्थिति हीं वेगवेगळीं असतात. मुंबईसारख्या शहरांत नगरपालिकेचें उत्पन्न वीस कोटी रुपयांहून अधिक आहे (बेस्ट बस व ट्राम धरून). हें उत्पन्न केरळ, किंवा ओरिसा या राज्यांच्या

उत्पन्नांपेक्षां जास्त आहे. शिवाय औद्योगिक व व्यापारी क्षेत्रांत हीं शहरें अग्रेसर असल्यानें त्यांना राजकीय महत्त्व आलें आहे. अशा शहरांत राजकीय चळवळींची तीव्रता राज्यसरकारांच्या पातळीवर चालणाऱ्या राजकारणाइतकी मोठी असते. अशा परिस्थितींत केरळ किंवा ओरिसा-मध्यें पक्षपद्धतीनें राज्यकारभार चालावा. मात्र मुंबई महानगरपालिकेंत तो चालूं नये असें म्हणण्यांत तार्किक सुसंगति कोठें राहिली ? मोठ्या शहरांत तेथील नागरी प्रश्नांसंबंधीं स्पष्ट कार्यक्रमावर आधारलेल्या पक्षांनीं नगर-पालिकेचा कारभार चालवण्यावांचून आतां गत्यंतर नाहीं. नगरपालिकेंत शिस्तबद्ध पक्ष नव्हते तेव्हां कारभार अधिक कार्यक्षम, वशिलेबाजी, लांचलुचपत वगैरे दोषांपासून दूर होता असें इतिहास सांगत नाहीं. किंबहुना आज मोठ्या अधिकाराच्या जागा पक्षीय दृष्टिकोनांतून करण्याचा प्रमाद घडत असला तर पूर्वी सभासदांना वश करून घेण्यासाठीं अनेक अनिष्ट साधनांचा उपयोग केला जात असे, हें सर्व जाणतात. पक्ष-संघटनांच्या अभावीं सभासदांच्या वैयक्तिक महत्त्वाकांक्षा, गटबाजी, संधि-साधूपणा वगैरेंवर कसलेंच बंधन राहत नाहीं.

म्हणून प्रस्तुत लेखकाचें असें मत आहे कीं स्थानिक-स्वराज्य संस्थां-मध्यें देखील खेड्यांचा अपवाद वगळून इतर सर्व ठिकाणीं राजकीय पक्ष असणें क्रमप्राप्त आहे. एवढेंच नव्हें तर आवश्यकहि आहे. सार्वजनिक जीवनांतील प्रत्येक वाईट गोष्टीबद्दल राजकीय पक्षांना जबाबदार धरण्याची सध्यां प्रस्तुत होत चाललेली प्रवृत्ति घातक आहे असें प्रस्तुत लेखकास वाटतें.

स्थानिक-स्वराज्य संस्थांच्या कारभारांत राजकीय पक्ष असणें आवश्यक आहे असें म्हटल्यानें त्यांच्या सध्यांच्या कार्यपद्धतीचें वा सत्तास्पर्धेचें समर्थन होतें असें नाहीं. राजकीय पक्षांच्या उद्गमामागें असलेली, समूहांत वावरण्याची मानवी प्रेरणा नैसर्गिक आहे व म्हणून राजकीय पक्ष ही मानवी समाजाची विकृति नसून नैसर्गिक प्रवृत्ति आहे. " पक्ष " हें नामाभिधान जरी अलीकडील काळांतलें असलें तरी सम विचारांच्या वा समान ध्येयानें प्रेरित झालेल्या व्यक्ति पुरातन काळापासून एकत्र वावरत आल्या आहेत व एकाच शिस्तीखालीं कार्य करीत आल्या आहेत. आधुनिक समाजाचें वैशिष्ट्य हें कीं शासनव्यवस्था लोकशाही तत्त्वानुसार होऊं लागल्यानें

शासनसंस्थेवर ताबा मिळवून तिच्या दंडशक्तीनें समाजपरिवर्तन घडवून आणण्याच्या उद्देशाला अवास्तव महत्त्व आलें व त्यामुळें राजकीय पक्षांना चालना मिळाली. यांतून पक्षांना अनन्यसाधारण महत्व प्राप्त झालें व पक्षपद्धतीचा अतिरेक झाला.

पाश्चिमात्य देशांत, विशेषतः इंग्लंडमध्यें राजकीय पक्ष स्थानिक संस्थांच्या कारभारांत अधिकृतपणें वावरतात. नगरपालिकांच्या व परगण्यांच्या निवडणुका पक्षीय भूमिकेवरून लढविल्या जातात व त्यांतील निकाल राष्ट्रीय पक्षांच्या सामर्थ्याचें गमक म्हणून मानले जातात. त्या देशांत स्थानिक-स्वराज्य फार कसदार आहे. स्थानिक स्वरूपाचे सर्व प्रश्न या संस्था हाताळतात व त्यामुळें बहुसंख्य समाजाला या ना त्या मार्गानें शासनाशीं सहभागी होतां येतें. शासनसंस्थेची व्याप्ति व अधिकार कितीहि वाढले तरी सामान्य नागरिकाचें बहुतांश जीवन गांवाशींच निगडित राहणार असल्यानें स्थानिक संस्थांचें महत्त्व कमी होणार नाहीं. उलट राष्ट्रीय शासनांत प्रतिदिनीं होत चाललेल्या सत्तेच्या केंद्रीकरणाला आळा घालण्यासाठीं शासनाचें विकेंद्रीकरण करावें व स्थानिक स्वराज्य संस्थांचे अधिकार वाढवावेत असाच विचार बळावणार असल्यानें स्थानिक संस्थांचें महत्त्व वाढणार आहे. यामुळें देखील भारतांतील राजकीय पक्ष स्थानिक संस्थांच्या कारभारांत अपक्षतेचें धोरण स्वीकारूं शकतील असें वाटत नाहीं.

अशा रीतीनें राजकीय पक्षांचें स्थानिक संस्थांमधील अस्तित्व मान्य केल्यानंतर त्यांच्या एतद् संस्थांविषयींच्या व परस्परसंबंधांविषयींच्या दृष्टिकोणाचा प्रश्न निर्माण होतो. येथें सुरुवातीलाच कबूल केलें पाहिजे कीं राजकीय पक्षांचें सध्यांचें वर्तन समाधानकाक नाहीं. त्यांत स्थानिक संस्थांच्या स्वायत्ततेच्या आदराची भावना नाहीं; अधिकाधिक लोकांना संस्थांच्या कारभाराशीं सहभागी करून त्यांना शासनाचें शिक्षण देण्याची तयारी नाहीं, कार्यक्षम व प्रामाणिक कारभाराची तळमळ नाहीं आणि पक्षांपक्षांमधील स्पर्धेमध्यें सौजन्य व सौम्यत्व आणून संस्थांच्या कारभाराला सातत्य देण्याची इच्छा नाहीं. ही परिस्थिति लोकशाही विचारांच्या वाढीला किंवा संस्थांच्या हिताला मुळींच पोषक नाहीं. यासाठीं

राजकीय पक्षांनीं अविलंबानें एक आचार-संहिता तयार करावी व त्याप्रमाणें स्वतःचें वर्तन ठेवावें अशी आज परिस्थिति निर्माण झाली आहे. अन्यथा अशा संस्थांवरील लोकांच्या विश्वासाला लागलेली ओहोटी व पक्षांचें झपाट्यानें होत असलेलें अवमूल्यन यांना आळा बसणार नाहीं. अशी आचार-संहिता तयार करतांना पुढील गोष्टींचा त्यांत विचार होणें अगत्याचें आहे.

१. राजकीय पक्षांनीं महानगरपालिका व जिल्हा मंडळें यांव्यतिरिक्त अन्य स्थानिक संस्थांच्या निवडणुका व कारभार यांमध्यें पक्ष म्हणून कार्य करूं नये. हें सुचविण्यामागील कारणें दोन.

अ) खेडें, लहान गांव वा तालुका यांमध्यें शासनाची जबाबदारी घेऊं शकतील असे शिक्षित, कार्यक्षम व जबाबदार कार्यकर्ते इतके कमी असतात कीं, त्या सर्वांचें सहकार्य मिळाल्यावांचून गांवाचा विकास होणें अशक्य आहे. अशा परिस्थितींत त्यांची पक्षनिहाय वांटणी झाली व कांहीं-जणांकडे शासनाची व इतरांकडे त्यांना विरोध करण्याची कामगिरी आली तर त्याचा गांवाच्या सुधारणेवर अनिष्ट परिणाम होईल.

ब) खेडें किंवा गांव यांचे नागरी प्रश्न इतके सरळ, सर्वमान्य व वादातीत असतात कीं, दृष्टिकोनांतील फरकावर किंवा वेगळ्या कार्यक्रमावर आधारलेले पक्षच त्या छोट्या क्षेत्रांत संभवत नाहींत. गांवांतील पक्ष हे राष्ट्रीय पक्षांच्या शाखा असतात त्यामुळें शेवटीं निवडणुकांत गांवाच्या प्रश्नांचा खल होण्याऐवजीं राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय प्रश्नांवर लक्ष केंद्रित होतें.

२. महानगरपालिका व जिल्हा मंडळें यांच्या निवडणुका पक्षांनीं नागरी प्रश्नांवरच लढवाव्यात. अशा संस्थांमध्यें राजकीय वादंग माजवूं नयेत.

३. स्थानिक स्वराज्य संस्थांमार्फत जीं विकासाचीं कामें होत असतील त्यांत पक्षांनीं कोणतेंहि अडथळे आणूं नयेत.

आपल्याकडे राजकीय पक्षांना हें पथ्य अद्याप समजलेलें नाहीं. बहु-पक्षीय लोकशाहीचा कारभार कार्यक्षमतेनें चालण्यासाठीं अधिकाधिक प्रश्न

पक्षीय वादाच्या क्षेत्राबाहेर काढले पाहिजेत. प्रगल्भ लोकशाहीचें तें लक्षण आहे. राजकीय पक्षांनीं हेतुपुरस्सर अशा रीतीनें आपलें कार्य वा विरोध केला पाहिजे कीं राष्ट्रीय उन्नतीचा वेग मंदावणार नाहीं. अविकसित देशांमध्यें तर याची फारच गरज आहे. क्रमाक्रमानें सार्वजनिक जीवनाचें वाढतें क्षेत्र राजकरणाच्या म्हणजेच पक्षीय मतभेदांच्या कक्षेबाहेर काढण्याची (Depoliticalisation) आज तीव्र गरज आहे. अन्नधान्याची पैदास, जलद औद्योगीकरण, आर्थिक नियोजन वगैरे प्रश्न पक्षीय स्पर्धेबाहेर काढणें इष्ट आहे किंवा नाहीं याबाबत मतभेद होऊं शकतील. पण साफसफाई, पाणीपुरवठा—योजना, रस्ते बांधणें, वीजपुरवठा किंवा घरबांधणीच्या योजना यांसारखे अनेक तांतडीचे नागरी प्रश्न असे आहेत कीं ज्यांवर राजकीय पक्षांमध्यें मूलभूत स्वरूपाचे मतभेद संभवूं शकत नाहींत. तरी देखील पक्षीय विरोधामुळें अनेक महत्त्वाची नगरसुधारणेचीं कामें वर्षानुवर्षें पडून राहतात हा स्थानिक स्वराज्य-संस्थांत कार्य करणाऱ्यांचा अनुभव आहे. यासाठीं पक्षांनीं स्वतःवर असें बंधन घालून घेतलें पाहिजे कीं कामाचा खोळंबा कोणत्याहि परिस्थितींत केला जाणार नाहीं.

४. पक्षांतर्फे उभे केले जाणारे उमेदवार विधायक दृष्टिकोनाचे, व्यासंगी व सचोटीचे असले पाहिजेत.

एकीकडे राजकीय पक्ष स्थानिक संस्थांना महत्त्व देतात, पण दुसरीकडे त्या संस्थांत कार्य करण्यासाठीं ज्या उमेदवारांची निवड केली जाते त्यांपैकीं कित्येक योग्य असत नाहींत. पहिली गोष्ट म्हणजे मोठ्या पक्षांनीं जनतेला या संस्थांचे महत्त्व पटविण्यासाठीं स्वपक्षांतील अनुभवी, लोकप्रिय जबाबदार अशी प्रथम श्रेणींतील माणसें उभीं केलीं पाहिजेत व त्यांच्या जोडीला उत्साही, निरलस व प्रामाणिक अशा तरुण रक्ताच्या कार्यकर्त्यांना संधि दिली पाहिजे. पण पक्ष आपले ज्येष्ठ कार्यकर्ते लोकसभा, राज्यसभा व विधानसभा यांसाठीं उभे करतात व सामान्य दर्जाचे कार्यकर्ते स्थानिक-स्वराज्य संस्थांच्या वांट्याला येतात.

५. महानगरपालिकांच्या कायद्यांत धोरण ठरविण्याचा अधिकार व अम्मलबजावणीचे अधिकार पृथक् करण्यांत आलेले असतात. तेथें

नगरपित्यांनीं कारभारांत हस्तक्षेप करण्याचा प्रयत्न करतां कामा नये असा दंडक पक्षांनीं आपल्या सदस्यांवर घातला पाहिजे. कंत्राटें, लायसन्स, घरमालक किंवा भाडेकरूंना मिळणाऱ्या नोटिसा वगैरेंच्या बाबतींत नगरपित्यांनीं अधिकाऱ्यांच्या कार्यांत ढवळाढवळ करण्याचे प्रकार प्रत्यही वाढत आहेत व त्यामुळें लांचलुचपत आणि वशिलेबाजी वाढत असून नोकरवर्गाच्या नीतिधैर्यावर अनिष्ट परिणाम होत आहे. राजकीय पक्षहि त्यामुळें कित्येक वेळां बदनाम होतात. तसेंच वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या नेमणुका करतेवेळीं राजकीय दडपण आणलें जातां कामा नये.

६. क्षुल्लक ठरावांवर कालापव्यय करून तांतडीचीं कामें लांबणीवर पडणार नाहींत यासाठीं पक्षांनीं एक सूत्रसंचालन समिति नेमावी व तिच्यावर सर्व पक्षांना प्रमाणशीर प्रतिनिधित्व द्यावें. कामकाजपत्रिकेवर जेवढे म्हणून ठराव असतील ते सर्व प्रथमतः या समितीपुढे गेले पाहिजेत व जे वादातीत असतील त्यांवर चर्चेंत वेळ न घालवतां संमतीचें शिक्कामोर्तब केलें पाहिजे. हे प्रश्न सभागृहांत चर्चेसाठीं येतील तेव्हां आपल्याच पक्षांतील सभासद त्यांवर वादविवाद करणार नाहींत याची हमी पक्षांनीं घेतली पाहिजे. कार्यक्रमपत्रिकेवरील कांहीं महत्वाचे धोरणविषयक व वादग्रस्त ठराव निवडून त्यांवर मनमोकळी चर्चा होऊं द्यावी. अशानें कार्यहानि न होतां धोरणें स्पष्ट होतील, सभासदांना विधायक चर्चेचें शिक्षण मिळेल व नागरिकांना जलद सुधारणांचा फायदाहि उपभोगतां येईल.

७. महानगरपालिका व जिल्हामंडळांत निवडून आलेल्या सभासदांवर त्यांच्या दैनंदिन कार्यांत पक्षाचें धोरण दडपण आणून लादलें जाऊं नये. स्थानिक शासनाचीं सूत्रें सभागृहांतून चालवलीं गेलीं पाहिजेत, पक्ष कचेऱ्यांतून नव्हे.

८. राज्यकर्त्या पक्षानें स्थानिक संस्थांना करावयाच्या आर्थिक सहाय्याच्या बाबतींत नगरपालिकेंत कोणता पक्ष अधिकारारूढ आहे याचा विचार होतां कामा नये.

९. स्थानिक कारभारांत जनतेचें व संस्थेबाहेरील तज्ज्ञांचें सहकार्य मिळविण्यासाठीं विभागवार सल्लागार समित्या स्थापन कराव्यात व त्यामध्यें सर्व पक्षांचे तसेंच अपक्ष लोक व भिन्न भिन्न क्षेत्रांतील तज्ज्ञ यांचा समावेश

व्हावा. अशा समित्या स्थापन करण्यांत पक्षांनीं अवश्य मदत करावी पण तेथें आपलें बहुमत करून घेण्याचा प्रयत्न करूं नये.

१०. नगरपालिकेच्या शाळा, औषधालयें, इस्पितळें, पाणीपुरवठा, साफसफाई वगैरे आवश्यक (Essential) खात्यांत राजकीय पक्षांच्या वर्चस्वाखालील कामगार संघटनांनीं संप घडवून आणूं नयेत. अधिकारारूढ पक्षानें देखील राजकीय दृष्टीनें संपाकडे व संपनेत्यांकडे न पाहतां कामगरांच्या रास्त मागण्या पूर्ण करण्याचे दिशेनें जलद कारवाई करावी.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या जोरकसपणावर लोकशाही शासनाचें भवितव्य अवलंबून आहे असें प्रस्तुत लेखकास वाटतें. त्यामुळेंच सध्यां विकेंद्रीकरणाचे जे प्रयत्न देशांत चालू आहेत त्यांचें स्वागत झालें पाहिजे व राजकीय पक्षांनीं या नव्या विकेंद्रित लोकशाही शासनाच्या प्रयोगांत स्थानिक स्वराज्य संस्थांना जी महत्वाची कामगिरी पार पाडावी लागणार आहे ती त्यांना झेपेल यासाठीं हेतुपूर्वक प्रयत्न केले पाहिजेत. स्थानिक जीवनांत एकजिनसीपणा यावा, त्याचीं वैशिष्टें कायम रहावींत व लोकांना शासनाशीं सहकार्य करण्याची अधिकाधिक संधि मिळावी असें लोकशाही-वादी पक्षांना वाटलें पाहिजे व त्यासाठीं त्यांनीं स्थानिक स्वराज्य संस्थांबाबत वर चर्चिलेला दृष्टिकोन स्वीकारला पाहिजे.

———

केरळमधील आचार-संहिता

केरळ सरकार (सारांश)

केरळ पोलिस रीऑर्गनायझेशन कमिटी राजकीय पक्षांच्या आचार-संहितेसंबंधींच्या सूचनांचा अहवाल.

(गृहखातें [आ]).

G. O. (MS) No. ७८८ गृह

तारीख त्रिवेंदम्, २२-१२-६०

हुकूम

भारतीय राज्यघटनेनें (हक्कानें) मान्य केलेल्या भाषणस्वातंत्र्य, विचार स्वातंत्र्य व सभास्वातंत्र्य या लोकशाहीच्या मूलभूत हक्कांची सुयोग्य अंमलबजावणी व्हावी, व त्यांचा दुरुपयोग होऊं नये यासाठीं या राज्यांतील सर्व राजकीय पक्ष व सामाजिक संस्थांनीं कांहीं विशिष्ट (संकेत) करार मान्य करावेत अशी केरळ पोलिस पुनर्संघटन समितीनें सुचविलें आहे. आवश्यक असे करार करणे व त्यांची अंमलबजावणी कशी होईल हें पाहणें यासाठीं राज्यसरकारनें राज्यांतील विविध प्रमुख राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींशीं चर्चा करावी अशी या समितीची इच्छा होती. त्याप्रमाणें सरकारनें भाषणस्वातंत्र्य, विचारस्वातंत्र्य व सभा-स्वातंत्र्य हे हक्क प्रत्येकाला उपभोगतां येतील अशा तऱ्हेचा आचार-संहितेचा एक आराखडा तयार करून तो सर्व पक्षांकडे विचारार्थ पाठ-विला व दिनांक २०-१२-१९६० रोजीं त्यानिमित्त घेतलेल्या सर्व-पक्षीय प्रतिनिधींच्या बैठकींत त्यासंबंधीं चर्चा केली. त्या बैठकींत मान्य झालेल्या आचार-संहितेची एक प्रत या हुकुमाच्या परिशिष्टामध्यें जोडली आहे.

(२) या बैठकींत खालीलप्रमाणें जिल्हानिहाय कार्यवाही समिति नेमण्याबाबत निर्णय कलेक्टर, पोलिस सुपरिंटेण्डण्ट आणि प्रमुख राजकीय

पक्षांच्या मध्यवर्ति संघटनेनें नेमून दिलेले स्वपक्षीय उमेदवार या सभासदांची कार्यवाही समिति असावी. संहितेंतील नियम पाळले जातात कीं नाहीं यावर लक्ष ठेवणें, पक्षांकडून किंवा कार्यवाही समितींतील सभासदांकडून नियमांचे उल्लंघन झाल्यास त्यावर इलाज करणें हें या समितीचे काम असेल. कलेक्टरांनीं आपल्या जिल्ह्यांत याप्रमाणें समिति बनविण्याच्या दृष्टीनें हालचाली कराव्यात या सूचनेचा सरकारनें खुषीनें स्वीकार करून त्यानुसार व्यवस्था करण्यांत आली. कलेक्टर या समितीचे अध्यक्ष असतील व आचार-संहितेबाबतचा सर्व पत्रव्यवहार त्यांचे नांवें होईल.

(३) जनता-संपर्क खात्याचे डायरेक्टर आचार-संहितेचे पद्धतशीर (आकर्षक) नमुने छापून घेतील व सर्व पक्षांच्या सर्व उपकेंद्रांना आवश्यक तेवढ्या प्रति पुरविण्याकरितां त्यांच्या मध्यवर्ति केंद्रांकडे पाठवितील.

(गव्हर्नरसाहेबांच्या हुकूमान्वयें)

पी. आय्. जेकब.

सरकारी-चिटणीस.

प्रती—(* आज्ञापत्रासह)

*(१) प्रमुख चिटणीस—केरळ प्रदेश कॉ. क. काँग्रेस हाऊस, त्रिवेंद्रम्.

*(२) प्रमुख चिटणीस—केरळ प्रजा स. पक्ष, कालिकत ४.

*(३) चिटणीस—भारतीय कम्युनिस्ट पक्ष, केरळ राज्य मंडळ, त्रिवेंदम् १.

*(४) चिटणीस—केरळ मुस्लिमलीग समिति, M. A. रोड, कालिकत १.

*(५) चिटणीस—भारतीय जनसंघ, केरळ प्रदेश समिति, कल्याणी रोड, कालिकत २.

(६) जनरल पोलिस इन्स्पेक्टर, त्रिवेंद्रम्.

(७) जनतासंपर्क अधिकारी, त्रिवेंद्रम्.

(८) सर्व जिल्ह्यांचे कलेक्टर्स.

(९) गृहमंत्र्यांचे खाजगी चिटणीस.

(१०) मुख्यमंत्री व इतर सर्व मंत्री यांचे खाजगी चिटणीस.

(११) गव्हर्नरांचे खाजगी चिटणीस.

(१२) (ब) क. बड ही गृहखातें

हुकूमान्वयें पाठविली असे.
सही। सुपरिंटेण्डण्ट २०–१२–६०

भाषणस्वातंत्र्य, विचारस्वातंत्र्य व सभास्वातंत्र्य हे हक्क अबाधित उपभोगणाऱ्या संबंधींची सर्वपक्षमान्य आचारसंहिता.

१ बैठकी — सभा

(१) सार्वजनिक सभा घेण्याच्या नेहमींच्या सार्वजनिक जागांशिवाय इतरत्र बैठकी-सभा घ्यावयाच्या असल्यास संबंधित पक्षानें त्या जागेच्या अधिकाऱ्यांकडून वा जागेच्या मालकांकडून योग्य ती परवानगी घेतलेली असावी.

(२) बैठकी-सभेसाठीं लाऊडस्पीकर वा तत्सम सोयी हव्या असतील तर संबंधित अधिकाऱ्यांकडून सभा-बैठकीचे वेळेपूर्वीच परवानगी अगर (लायसन्स) परवानापत्र अवश्य असल्यास काढलेलें असावें.

(३) आवश्यक ती रहदारी व संरक्षणाची व्यवस्था करण्यास भरपूर अवसर मिळेल असे दिवस राखूनच संबंधित पक्षानें स्थानिक पोलिस अधिकाऱ्यांना आपल्या सभा बैठकीची वेळ व कार्यक्रमाची सूचना दिली पाहिजे.

(४) ज्या भागांत सभा वा बैठक घ्यावयाची असेल त्या भागांत सभा-बैठकीसंबंधीं कांहीं निर्बंध असतील तर संबंधित पक्षानें त्याची सभा-बैठक ठरविण्यापूर्वीच माहिती करून घेतली पाहिजे. असे कांहीं निर्बंध असतील तर ते कसोशीनें पाळले पाहिजेत. निर्बंधांतून कांहीं खास सवलती हव्या असतील तर आवश्यक तो अवसर ठेवूनच त्यासाठीं अर्ज-विनंति करून परवानगी मिळविली पाहिजे.

(५) सभा-बैठकीच्या संघटकांनीं सभा–बैठकीच्या वेळेला कामावर हजर असणाऱ्या पोलिसांची मदत मिळविण्याकरितां जरूर अर्ज करावा व

सभा-बैठकींत गोंधळ निर्माण करणाऱ्या वा इतर कांहीं प्रकारांनीं गैर-व्यवस्था करणाऱ्या व्यक्तींची दखल घेण्यांत पोलिसांची मदत घ्यावी. अशा व्यक्तीविरुद्ध इलाज करण्यांत सभा-बैठकीच्या संघटकांनीं शक्यतों ढवळाढवळ करूं नये हें चांगलें.

(६) दुसऱ्या पक्षालाहि त्याच ठिकाणीं त्याच वेळेला सभा-बैठक आहे असें कळलेंच तर दोन्ही पक्षांच्या संघटकांनीं वेळ न घालवितां परस्परांशीं बोलणीं करून एका सभा-बैठकीनंतर दुसरी सभा-बैठक घेणें वा दोन वेगवेगळ्या ठिकाणीं सभा-बैठक घेणें वा एकाच वेळीं पण शक्य झाल्यास एकाच विभागांतल्या दोन वेगवेगळ्या वस्त्यांमधून (उदा० विस्तृत मोठ्या मैदानाच्या दोन टोंकांना दोन सभा एकाच वेळीं होऊं शकतात). एकाच वेळीं दोन्ही पक्षांनीं आपापल्या सभा-बैठकी घेणें व परस्परांना त्रास न होईल अशा तऱ्हेनें परस्परांच्या लाऊड स्पीकर्सचा आवाज मर्यादित करणें वगैरे गोष्टींचे निर्णय घ्यावेत. पक्षांनीं याबाबत व्यवस्था करण्यासाठीं स्थानिक अधिकाऱ्यांना शक्यतों लवकरच अर्ज करून त्यांची या कामीं मदत घ्यावी.

२ मिरवणुका

(१) मिरवणुका काढूं इच्छिणाऱ्या पक्षानें, मिरवणूक सुरू होण्याची वेळ व जागा, फिरण्याचा मार्ग, तसेंच मिरवणूक संपण्याची वेळ व जागा या सर्व गोष्टी मिरवणूक सुरूं होण्यापूर्वीच ठरवाव्यात; व या कार्यक्रमांत शक्यतों ऐन वेळीं बदल करूं नयेत.

(२) मिरवणुकीच्या संघटकांनीं स्थानिक पोलिस अधिकाऱ्यांना रहदारी व संरक्षणासाठीं आवश्यक ती व्यवस्था करण्यास भरपूर अवसर मिळेल याची दक्षता घेऊन त्यांना लवकरच मिरवणुकीची सूचना द्यावी.

(३) ज्या विभागांतून मिरवणूक जावयाची आहे, त्या विभागांत मिरवणुकीसंबंधीचे कांहीं निर्बंध ठेवले असतील तर त्याची संघटकांनीं योग्य वेळींच माहिती करून घ्यावी व ते निर्बंध दुर्लक्षिण्यासाठीं संबंधित अधिकाऱ्यांकडून खास सवलत मिळविल्याखेरीज त्यांचें उल्लंघन करूं नये. रहदारीचे कोणतेहि नियम वा निर्बंध काटेकोरपणें पाळावेत.

(४) मिरवणूक सुरूं होण्यापूर्वीच संघटकांनीं आपल्या मार्गांतील रस्त्यांच्या रुंदीचा व तेथील नेहमींच्या रहदारीचा विचार करून तेथून जातांना मिरवणुकींत सहभागी झालेल्यांच्या अशा रीतीनें रांगा कराव्यात कीं ज्यामुळें त्या त्या रस्त्यावरील नेहमींच्या इतर रहदारीस अडथळा वा अटकाव होणार नाहीं. मिरवणूक फार मोठी असेल तर तिचे सोयीचे विभाग पाडावेत, म्हणजे रस्ते ओलांडतांना – विशेषतः चौक ओलांडतांना–मिरवणुकीसाठीं अडविलेल्या इतर रहदारीला मिरवणुकीचा एक विभाग संपल्यावर मोकळीक देतां येते. त्यामुळें इतर रहदारी (फार काळ थांबविल्यामुळें) वाढत्या पुराच्या पाण्याप्रमाणें फुगणार नाहीं.

(५) संघटकांनीं अनेक नेत्यांवर मिरवणुकीची जबाबदारी सोपवावी. प्रत्येक नेत्याला व विभागाला सुस्पष्ट रीतीनें सर्व सूचना द्याव्यात, कीं ज्यामुळें कामावरील पोलिस अधिकाऱ्यांच्या सहकार्यानें ते मिरवणूक शांततेनें नेऊं शकतील.

(६) मिरवणूक शक्यतों रस्त्यांच्या जास्तींत जास्त उजव्या कडेनें जावी व कामावरील पोलिस अधिकाऱ्यांचे आदेश व सूचना तंतोतंत पाळल्या जाव्यात.

(७) जर दोन वा अधिक राजकीय पक्षांना आपापल्या मिरवणुका एकाच मार्गांनीं, (वा सारख्याच वस्त्यांमधून) एकाच वेळेला न्यावयाच्या असतील तर त्यांच्या संघटकांनीं मिरवणुकीचे निर्णय घेण्यापूर्वीच परस्परांशीं विचार-विनिमय करावा, व परस्परांच्या मिरवणुकींचा परस्परांना अडथळा कसा होणार नाहीं वा अनर्थकारक परिस्थिति कशी निर्माण होणार नाहीं यांचे उपाय योजावेत. स्थानिक अधिकारी याबाबत नेहमींच सहाय्यभूत असतील; तरी संबंधित पक्षांनीं लवकरांत लवकर त्यांना भेटून त्यांची मदत घ्यावी.

(८) विशेषतः वातावरण तापलेलें असतांना, राजकीय पक्षांनीं मिरवणूक आपल्या हातीं राहील याची काळजी घ्यावी. अनिष्ट प्रवृत्तीच्या लोकांकडून गैर उपयोग केला जाईल, अशा वस्तू मिरवणुकींत शक्यतों नेल्या जाऊं नयेत.

(९) राजकीय मतप्रणाली वा कृतींबद्दल कितीहि नावड व्यक्त केली जावो—सर्व राजकीय पक्षांनीं प्रत्येक नागरिकाला त्याचें स्वतःचें शांत, अव्यत्ययी खाजगी जीवन जगण्याचा पूर्ण हक्क आहे याची सदर जाणीव ठेवावी, व नागरिकांच्या तशा या कृतींविरुद्ध त्यांचे घरांवर टेहेळणी (नजर) करणें वा निदर्शनें करणें हें केव्हांहि लोकशाहीच्या तत्त्वाशीं व व्यक्तिस्वातंत्र्याच्या कल्पनेशीं पूर्णपणें विसंगत आहे व म्हणून कोणत्याहि परिस्थितींत तसे उपाय योजूं नयेत.

३. भाषणें व घोषणा

(१) कुणाच्याहि खाजगी जीवनासंबंधीं अपमानकारक वा अवमूल्यनकारक (शेरे मारणें) मत सांगणें किंवा वैयक्तिक संबंधी, शारीरिक वैशिष्ट्यें वा वैगुण्यें यांचेबाबत सार्वजनिक सभास्थानीं बोलणें टाळावें.

(२) इतरांच्या धर्म, वंश, जातींविषयीं हीनतेनें बोलूं नये.

(३) कोणत्याहि प्रकारें एखाद्या विभागाच्या धार्मिक श्रद्धा दुखावल्या जातील अशीं विधानें करूं नयेत.

(४) दुसऱ्या पक्षांच्या सभासदांविरुद्ध हिंसात्मक कृति सूचित होतील अशी वक्तव्यें वा घोषणा करूं नयेत.

(५) सर्व राजकीय पक्षांनीं भाषणें देतांना, घोषणा करतांना उच्च दर्जाची सभ्यता व शिष्टाचार पाळावेत. कोणत्याहि प्रकारें जनतेचें नैतिक अधःपतन होईल किंवा त्यांना असभ्यतेच्या वा अहिंसेच्या वर्तनाप्रत प्रोत्साहित केलें जाईल असे शब्द वापरूं नयेत वा तशी कृति होऊं देऊं नये.

(६) राजकीय पक्षांनीं परस्पर सहनशील व संमश्रित वृत्ति धारण करावी. विशेषतः भाषणस्वातंत्र्य व विचारस्वातंत्र्य या हक्कांच्या अनिर्बंध उपयोगांमुळें परिस्थिति बिघडण्याचा व स्फोटक वा हिंसक प्रवृत्ति उफाळण्याचा संभव असतो तेव्हां तर कमालीचा संशय अपेक्षित आहे. जेव्हां विरोधी पक्षाच्या सभा थोड्या अंतरावर चालू असतील वा परस्परांच्या मिरवणुकी एकाच रस्त्यानें जात असतील तेव्हां प्रक्षोभक घोषणा वा चेष्टा जाणीवपूर्वक टाळाव्यात.

४. निदर्शनें, प्रदर्शनें, निवेदनें

(१) सचित्र निदर्शनांद्वारें फक्त आपल्या तत्त्वांचा व उद्दिष्टांचा केवळ प्रचार करण्याची मुभा आहे हें सर्व राजकीय पक्षांनीं लक्षांत ठेवावें. दुसऱ्या पक्षांचे दोष वा दुष्कृत्यें खोट्या वा अतिशयोक्तिपूर्ण पद्धतीनें चित्रित करण्यासाठीं अशा प्रदर्शनांचा उपयोग केला जाऊं नये.

(२) सचित्र निदर्शनें हीं सौम्य, नेमस्त व खऱ्याखुऱ्या शैक्षणिक दर्जाचीं असावींत. तसेंच तीं विरुद्ध पक्षाच्या लोकांच्या भावना चेतविणारी किंवा सर्वसामान्य लोकांच्या नीतिमत्तेला धक्का देणारीं वा असभ्य किंवा अहिंसात्मक प्रवृत्ति चेतविणारीं नसावींत.

(३) कुणाचीहि वैयक्तिक मानखंडना करणें, अपमान करणें, कुठल्याहि पक्षाच्या वा धर्माच्या अनुयायांच्या श्रद्धांचा वा चालीरीतींचा उपहास करणें यासाठीं सचित्र निदर्शनांचा वापर केला जाऊं नये.

(४) दुसऱ्या पक्षांच्या वा पक्षनेत्यांच्या सूचक प्रतिमा पेटविणें, सार्वजनिक ठिकाणीं त्या जाळणें, अशा किंवा या प्रकारच्या बदनामीकारक निदर्शनांना कोणत्याहि पक्षानें उत्तेजन देऊं नये.

(५) कोणत्याहि पक्षानें आपल्या कार्यकर्त्यांना मालकाच्या अनुमतीखेरीज जागा, इमारती, कुंपण, भिंतींना पक्षध्वज लावणें, पताका लावलें, नोटिसा चिकटविणें वा घोषणा लिहिणें इत्यादींसाठीं वापर करण्यास परवानगी देऊं नये.

५. सर्वसाधारण

सर्व राजकीय पक्षांनीं आपल्या सर्व अनुयायांना वरील आचार-संहितेसंबंधीं काळजीपूर्वक सूचना द्याव्यात व स्वपक्षालाहि या तत्त्वांविरुद्ध वर्तन करण्यापासून परावृत्त करावें. व या बाबतींतल्या पक्षाच्या सूचना मुद्दाम उल्लंघणाऱ्या सभासदांविरुद्ध आवश्यक ते इलाज योजण्यांत मुळींच हयगय करूं नये.

सुपरिंटेंडेंट

२२–१२–६०

———

आचार-संहितेची आवश्यकता

डॉ. राम मनोहर लोहिया

(भाषणाचा उतारा व इतर संबंधित पत्रव्यवहार)

डॉ. राम मनोहर लोहिया यांनीं देशांतील सर्व राजकीय पक्षांना, पक्ष-कार्यपद्धतींत कांहीं सुधारणा करणें शक्य आहे कीं नाहीं याबाबतचा विचार करण्यासाठीं गोलमेज परिषदेंत एकत्रित येण्याचें आव्हान दिलें. तेव्हां ते करीमनगर जिल्ह्यांतील जम्मीकुटा या गांवीं आंध्र प्रदेश समाजवादी पक्षशाखा परिषदेचें उद्घाटन करीत होते. अशा तऱ्हेच्या परिषदेनें पक्षांच्या राजकीय आशयांचा विचार करूं नये असें त्यांनीं स्पष्ट बजावलें—कारण तसें करणें म्हणजे परिषदेच्या उद्देशाचा पराभवच ठरेल. वृत्तपत्रांसाठीं असलेल्या ऑडिट ब्यूरो ऑफ सर्क्युलेशनसारखी एखादी संस्था राजकीय पक्षांची सभासद नोंदणी तपासण्यासाठीं असावी म्हणजे त्यांतला खोटेपणा कमी होत जाईल असें त्यांना म्हणायचें होतें. राजकीय पक्षांसाठीं अशाच प्रकारची संस्था असावी. तिनें पक्षांची सभासदनोंदणी व इतर अनेक संबंधित गोष्टींवर नजर ठेवून राजकीय जीवनांतील ढोंगीपणा व खोटेपणा कमी करण्याचा प्रयत्न करावा असें डॉक्टरसाहेबांच्या मनांत होतें.

डॉ. लोहियांनीं भारतीय राजकारणांतील सार्वत्रिक दोषांचे–उदा०:– खोटेपणा व ढोंग, केंद्रीकरण व अविश्वसनीयता–स्पष्टीकरण केलें.

" जर एखादा पक्ष या रोगाला बळी पडला तर दुसराहि पक्ष स्वतःची लोकप्रियता वाढविण्यासाठीं त्या रोगाला निमंत्रण देतो !

ढोंगीपणा व तत्सम विध्वंसक सार्थींचे राजकीय रोग आमच्या सामुदायिक जीवनांत सार्वत्रिक व सदा काळ घर करून बसलेलेच आहेत. आपण या सांथी नष्ट करण्याचे कांहींतरी उपाय निकडीनें शोधून काढलेच पाहिजेत " असें त्यांचें म्हणणें होतें.

जर कंपन्यांच्या नफा-तोट्यावर, व विक्रीवर तसेंच वर्तमानपत्रांच्या प्रसारावर व विक्रीवर नियंत्रण ठेवतां येतें; तर राजकीय पक्षांच्या सभासद-नोंदणीवर व संघटनेवर कां नियंत्रण असूं नये हा त्यांच्या प्रश्नांचा मुख्य रोख

होता. अशा तऱ्हेचें नियंत्रण व तपासणीमुळें फसवेगिरी, अप्रामाणिकपणा, खोटेपणा यांचा बंदोबस्त होऊं शकेल. या सभासद-नोंदणी-नियंत्रणांत इतरहि अनेक गोष्टींच्या तपासणीचा अंतर्भाव करतां येईल. देशांतील सर्व राजकीय पक्षांनीं आपल्या पैसे मिळविण्याच्या साधनांचा व खर्चाच्या पद्धतींचा पूर्ण खुलासेवार हिशोब जनतेपुढें दिला पाहिजे— नाहींतर आपली लोकशाही छुप्या व विघातक प्रवृत्तींना बळी पडेल. सध्यांहि कांहीं युरोपीय देशांत राजकीय पक्षांच्या निधीचा व संपत्तीचा पूर्ण आढावा जनतेपुढें खुलेपणानें आणण्यासंबंधींचे कायदे केलेले आहेत.

भारतीय राजकारणाला ठराव पसार करणें व प्रत्यक्ष कृति मात्र नेमकी त्याविरुद्ध करणें अशा संवयींचा दारुण रोग जडलेला आहे असें सांगून डॉक्टर लोहियांनीं पुढें स्पष्टीकरण केलें कीं, एखादा ठराव पूर्णत्वानें प्रत्यक्षांत आणण्यास असमर्थ ठरणें हें तो प्रत्यक्ष उल्लंघण्यापेक्षां फार वेगळें आहे. अशा प्रकारचें अतिक्रमण व उल्लंघन थांबविलें पाहिजे. वर सुचविलेल्या राजकीय संस्थेनें वेगवेगळ्या राजकीय पक्षांनीं पास केलेल्या ठरावांचीच व मान्य केलेल्या करारांची तसेंच त्यांनीं मोडलेल्या करारांची यादी करावी व वेळोवेळीं त्यासंबंधीं सविस्तर व अधिकृत माहिती देणारे लेख प्रसिद्ध करावेत. त्यामुळें कदाचित् राजकीय जीवनाला ग्रासणाऱ्या फाजील अहंगडाचा धोका कमी होईल असें डॉक्टरसाहेबांचें म्हणणें होतें.

जेव्हां एका पक्षाचे सभासद सार्वजनिक वा वैयाक्तिक उपोषणासारख्या कांहींशा दुराग्रहाच्या मार्गाचा अवलंब करतात—कारण त्यामुळें फार चटकन् प्रसिद्धि मिळाल्यासारखी वाटते—तेव्हा दुसऱ्या पक्षाचे लोकहि अशाच प्रकारें झटपट प्रसिद्धीच्या मागें लागतात. विशेषतः आपल्या अवास्तव मागण्या पुढें दामटतांना अशा प्रकारांचा फार अवलंब केला जातो. " हिंदुस्थानांत असें कांहीं कमी वेळां होत नाहीं कीं, एक पक्ष सत्तेवर असतांना ज्या गोष्टी करतो—उदा०—नगरपालिका वा जिल्हा लोकल बोर्डांत असतांना—त्याच गोष्टींना तोच पक्ष सत्तेवरून खालीं येतांच (विरोधासाठीं) विरोध करतो, निषेध करतो. एवढेंच नव्हे तर तो कार्यक्रम कडाक्याच्या विरोधानें हाणून पाडतो " असें डॉ. लोहिया म्हणतात.

केंद्रीकरणासंबंधींचे आपले विचार स्पष्ट करून डॉ. लोहिया म्हणाले, कीं भारतांतील राजकीय पक्ष आजपर्यंत फक्त राष्ट्रीय व प्रांतीय पातळीवरच कार्य करूं शकले आहेत. जिल्हा वा गांवांच्या पातळीवर एक तर पक्ष-संघटना तरी मजबूत नसते किंवा थोडीबहुत असलीच तर पक्षाचें ध्येय-धोरण ठरविण्यापर्यंत त्यांचे हात पोहोंचत नाहींत; एवढेंच काय पण राष्ट्रीय वा आंतरराष्ट्रीय घटनांसंबंधींचे आपले विचार नुसते मांडण्याचीहि संधि त्यांना मिळूं शकत नाहीं. वरून आलेले हुकूम केवळ पाळणें एवढेंच सर्व पक्षांच्या गांव वा जिल्हा केंद्रांचें मर्यादित स्थान राहिलें आहे. भारताच्या राजकीय पक्षांतील सूत्रबद्ध धोरणांचा अभाव आणि केंद्रानुवर्ती राजकारणाच्या सर्व अनिष्ट प्रवृत्तींचा प्रभाव याचें मुख्य कारण हेंच आहे. डॉ. लोहिया म्हणाले कीं, आपल्या सभोंवतालच्या जगांत घडणाऱ्या घटनांविषयीं लोकांनीं जास्तींत जास्त उत्सुक असावें, आपल्या वृत्ति व वर्तन जागरूक ठेवावें यासाठीं सर्व राजकीय पक्षांच्या संघटनांनीं आपली जिल्हा व गांव केंद्रें अधिकाधिक मजबूत केलीं पाहिजेत; म्हणजे तीं केंद्रें राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय घटनांची चर्चा तर करतीलच पण त्या घटना घडविण्यांतहि बऱ्याच अंशानें सहभागी होतील.

पक्षनिष्ठेसंबंधींच्या सातत्यानें वाढणाऱ्या डळमळीतपणाचा व अविश्वसनीयतेचा तीव्र निषेध करून डॉ. लोहिया म्हणाले कीं, एक व्यक्ति निवडणुकीसाठीं आपल्या पक्षाकडे अर्ज करते, पण जर अर्ज फेटाळला गेला तर तीच व्यक्तीहि थोड्याच कालावधींत दुसऱ्या पक्षांत प्रवेश करते व हा दुसऱ्या पक्ष आपल्यातर्फे तिचा अर्ज मान्य करून तिकिट देतो.— असले विचित्र प्रकार पूर्णपणें थांबले पाहिजेत. एका पक्षानें अव्हेरलेले उमेदवार दुसऱ्या पक्षानें स्वीकारूं नयेत. निदान अशा अव्हेरण्यांत व स्वीकारण्यांत एका वर्षाचें तरी अंतर असावें. असाच नियम विधानसभेंत एकाएकी पक्ष बदलण्याचे बाबतींत असावा. अशा सभासदमहाशयांनीं प्रथम आपल्या जागेचा राजीनामा द्यावा, नंतर पक्ष बदलून पुनः निवडून यावें. असाच रिवाज म. गांधींचे वेळीं रूढ होता व हीच पद्धति आपण कायम ठेवली पाहिजे. एखादे वेळीं निवडणुकीपुरतांच एखादा पक्ष-सभासद कांहीं मतभेदांमुळें स्वतंत्ररीत्या उभा राहतो व तो निवडून आलाच तर त्याला

पुनः मतभेदांकडे लक्ष न देतांहि पूर्वीच्याच पक्षांत सामील करून घेतलें जातें. अशा प्रकारच्या बंडखोरांना वा संधिसाधूंना बेदखलपणें परत घेण्याच्या (राक्षसी!) विचित्र प्रकारांमुळें पक्षांच्या तात्त्विक भूमिकेची चेष्टा व हंसें झालेलें आहे. माझ्या पक्षानें अशा तऱ्हेच्या कृत्यांपासून पूर्णपणें अलिप्त राहण्याचा निश्चित निर्णय घेतला आहे. सर्व पक्षांनीं एकत्रित येऊन, गोलमेज परिषद् भरवून अशा तऱ्हेच्या प्रवृत्ति उखडून टाकण्याचे सर्व व्यावहारिक उपाय शोधून काढल्याखेरीज त्या नष्ट होणें किती अवघड आहे याचीहि आम्हांला सखोल व स्पष्ट जाणीव आहे."

भारतीय जनतेला लवकर वा थोड्याच कालावधींत आर्थिक आणीबाणीच्या दुर्घटनेचा धक्का बसणार आहे. नेहमींच्या परिस्थितींत व विशेषतः अशा वेळीं दुसऱ्या परकीय सत्ता ईर्जितप्रमाणें येथेंहि कांहीं साहसी उपद्व्याप करूं पाहतील असा त्यांनीं भारतीय जनतेला अत्यंत स्पष्ट भाषेंत गंभीर इशारा दिला. पुढें ते म्हणाले, "भारतीय जनतेनें आपल्या सर्व राजकीय पक्षांना हिंसकतेच्या धोक्यापासून अलिप्त राहण्याचा स्पष्ट आदेश दिला पाहिजे. कारण दगडफेक, जाळपोळ, लूटमार असे हिंसेचे लहान-लहान प्रकार लोकांनीं करावेत तर सरकारनें गोळीबार करून मोठा हिंसा-मार्ग अवलंबावा हें हल्लीं नित्याचें होऊं पाहत आहे." "आतां क्रांति अटळ आहे" अशी ते अत्यंत निश्चयानें घोषणा करत होते. त्यांना ही क्रांति शांततेनें व्हावी एवढेंच हवें होतें आणि म्हणूनच त्यांचा आग्रह होता कीं, या शांततामय क्रांतीसाठीं सर्व पक्षांनीं अनिवार्य आचार-संहितेचा स्वीकार केला पाहिजे—मग तो पक्ष सत्ताधारी असो वा नसो.

शेवटीं डॉ. लोहिया म्हणाले कीं, इतर पक्षांनीं वरील सूचनेचा सहानुभूतीनें विचार केल्यास समाजवादी पक्ष स्वतःहून अशा तऱ्हेच्या परिषदेचें आमंत्रण देण्यास व व्यवस्था करण्यास आनंदानें तयार आहे. अर्थात् त्या सर्व पक्षांना स्वतंत्रपणें आपल्या व भोंवतींच्या परिस्थितीचें निदान करणें व त्यावर इलाज योजणें यांचें स्वातंत्र्य असेलच.

समाजवादी पक्ष, मध्यवर्ति केंद्र-प्रसारित.
हैद्राबाद, २४ नोव्हें. १९५६

: २ :

समाजवादी पक्षाचे जनरल सेक्रेटरी बिपिनपाल दास यांचें परिपत्र

काल आंध्र प्रदेश समाजवादी पक्षाच्या अधिवेशनाचें उद्घाटन करतांना डॉ. लोहियांनीं प्रकट केलेले कांहीं विचार सोबत पाठवीत आहोंत. आपली लोकशाही दृढमूल होण्यासाठीं व येथें निरोगी राजकीय जीवनाची बांधणी करण्यासाठीं त्यांनीं उपस्थित केलेले प्रश्न महत्त्वाचे आहेत हें आपण मान्य कराल अशी आशा आहे. त्या प्रश्नांचा अधिक खुलासा करण्याची गरज नाहीं. डॉ. लोहियांनीं पुरेसें स्पष्टीकरण दिलें आहेच. त्याची नक्कल सोबत आहे.

आजच्याप्रमाणें आपल्यालाहि भारतांत लोकशाही दृढमूल करण्याची तितकीच तळमळ आहे याबद्दल आमची खात्री आहे. आणि म्हणून सर्व राजकीय पक्षांनीं कांही एक किमान आचार-संहिता स्वीकारून तिचें पालन करणें, व पक्षसंघटनेचीं कांहीं समान तत्त्वें स्वीकारणें आवश्यक आहे हें आपणहि मान्य कराल.

म्हणून डॉ. लोहियांनीं उपस्थित केलेल्या प्रश्नांवर आपण शक्य तितक्या लवकर विचार कराल अशी आशा आहे. त्या सूचनांवरील आपली प्रतिक्रिया शक्य तितक्या लवकर कळविलीत तर आम्ही आपलें आभारी होऊं.

या सूचनांबाबत तुमच्या प्रतिक्रिया अनुकूल असतील तर मग आपल्याला त्या दृष्टीनें पावलें टाकलीं पाहिजेत. याबाबत विचार-विनिमय करण्यासाठीं सर्व पक्षांची गोलमेज परिषद् बोलविण्यांत पुढाकार घ्यायला समाजवादी पक्षाला आनंदच वाटेल. अर्थात् या योजनेची अंमलबजावणी करण्याबाबत सर्व पक्षांनीं सहकार्य देण्याचें आश्वासन दिलें तरच तशी परिषद् बोलाविणें शक्य होईल. हें पत्र आम्ही ज्या ज्या पक्षांना पाठवीत आहोंत त्या सर्वांच्या प्रतिक्रिया जाणून घेतल्यानंतरच अशी परिषद् बोलविण्याबाबत अधिक हालचाली करतां येतील. तरी आपण याबाबत आपल्या सूचना पाठवाव्यात अशी विनंति.

: ३ :

फॉरवर्ड ब्लॉकचे जनरल सेक्रेटरी आर. के. हळदीकरांचें उत्तर—

तुमचें ता. २५ नोव्हेंबरचें पत्र मिळालें. आभारी आहें. देशांत लोकशाही पद्धति दृढमूल करण्याच्या दृष्टीनें राजकीय पक्षांसाठीं आचार-संहिता बनविण्यासाठीं सर्व पक्षीय परिषद् बोलविण्याच्या आपल्या कल्पनेचें मीं स्वागत करतों. पण बहुसंख्य राजकीय पक्षांनीं या सूचनेला पाठिंबा दर्शविल्याशिवाय अशी परिषद् फलदायी ठरणार नाहीं हें उघड आहे. तरी याबाबत आपणांला ज्या पक्षांचीं उत्तरें आलीं असतील तीं सर्व आम्हांला कळवावींत अशीं विनंति.

आमच्या पक्षाच्या मध्यवर्ति समितीची बैठक या महिन्याच्या १५-१६ तारखेला पाटणा येथें भरणार आहे. त्या बैठकीसमोर आपलें पत्र विचारार्थ ठेवलें जाईल व पक्षाचें त्याबाबत काय मत आहे तें आपणांला कळविलें जाईल. दरम्यानच्या काळांत आपण इतर पक्षांचीं उत्तरें व त्या दृष्टीनें झालेल्या इतर हालचाली आम्हांला कळवीत राहाल अशी आशा आहे.

छिंदवाडा मध्यप्रदेश, ता. ६ डिसें. १९५६

: ४ :

काँग्रेसचे जनरल सेक्रेटरी श्रीमान् नारायण यांचें उत्तर : —

तुमच्या ता. २५ नोव्हेंबरच्या पत्राबद्दल व डॉ. लोहियांच्या भाषणांतील उताऱ्यांबद्दल आभारी आहें. लोहियांनीं उपस्थित केलेल्या प्रश्नांवर विचार करून आम्ही आमचें मत लवकरच कळवूं.

नवी दिल्ली, ६ डिसें. १९५६

: ५ :

रिव्होल्युशनरी कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडियाचे जनरल सेक्रेटरी सुधीर के. दासगुप्ता यांचें उत्तर : —

आपल्या ता. २५ नोव्हेंबरच्या पत्राबद्दल आभारी आहें. तुमचें पत्र व डॉ. लोहियांच्या भाषणांतील तुम्ही पाठविलेले उतारे आम्ही वाचले आहेत.

सर्व राजकीय पक्षांनीं आचारसंहिता बनवून तिचें पालन करावें व पक्षसंघटनेची कांहीं किमान समान तत्त्वें स्वीकारावींत या डॉ. लोहियांच्या सूचनांशीं आम्ही सहमत आहोंत.

आमचा असा अनुभव आहे कीं कांहीं राजकीय पक्ष किंवा गट हे नेहमीं खोटेपणा करतात आणि त्यामुळें इतर राजकीय पक्षांशीं वा ज्यांची सेवा करण्याचा दावा ते मांडतात त्या सर्वसामान्य लोकांशीं त्यांची जी वागणूक आहे ती अतिशय अस्थिर आहे. राजकीय पक्षांनीं गोलमेज परिषद् भरवून चर्चा करण्यानें आपल्या राजकीय जीवनांतील हे अपप्रकार कितपत थांबवितां येतील याबद्दल आम्हांला शंका आहे. जनतेचा विश्वास व पाठिंबा संपादन करण्यासाठीं खोटेपणा व फसवाफसवीचा कांहीं उपयोग नाहीं. ही गोष्ट राजकीय पक्षांच्या धुरीणांना समजावून देण्यासाठीं चर्चेचा तितकासा उपयोग नाहीं. कांहीं पक्षांनीं आपल्या चोख वर्तनानेंच तें सिद्ध करून दाखविलें पाहिजे. याबाबतच्या आमच्या सदिच्छेबाबत व हार्दिक सहकार्याबाबत आम्ही समाजवादी पक्षाला संपूर्ण आश्वासन देऊं इच्छितों. अर्थात् तुमच्या सूचनेशीं आमचा मतभेद नाहीं. तुम्ही गोलमेज परिषद् बोलावलींत तर आम्ही त्यांत जरूर सहभागी होऊं.

राजकीय पक्षांच्या सभासद-नोंदणीची तपासणी व प्रमाणपत्र देण्याची व्यवस्था, निधि उभारण्याचे मार्ग व खर्च करण्याच्या पद्धति याबाबत तटस्थ, विश्वासू व कार्यक्षम मंडळींकडून तपासणी करवून घ्यायला आमची मुळींच हरकत नाहीं. वस्तुतः याबाबत आम्हांला हरकत घेण्याचें कांहींच कारण नाहीं. कारण आमची सभासद-नोंदणी ही शिस्त, विश्वासपात्रता व पक्ष-उद्दिष्टांवरील खंबिर निष्ठा यांबाबतच्या अतिशय कडक कसोट्यांवर आधारलेली असते. तसेंच आमच्या उत्पन्नाचीं साधनें परकीय नाहींत, वा खर्च करण्याची पद्धतहि संशयास्पद नाहीं. अर्थात् व्यापारी लोक सेल्स टॅक्स किंवा इन्कमटॅक्ससाठीं होणाऱ्या तपासणीला ज्या हिकमतीनें चकवतात तशीच हिकमत ज्या पक्षांची अशा तपासणीला मनःपूर्वक तयारी नाहीं ते पक्ष दाखवतील अशी आम्हांला भीति वाटते. जोंपर्यंत ज्याचा तोच प्रामाणिकपणावर श्रद्धा ठेवीत नाहीं, किंवा त्याप्रमाणें आचरण करीत नाहीं, तोंपर्यंत खरें सत्य सांपडणें कठिण आहे असें आम्हांला वाटतें.

इतर पक्षांनीं अशा व्यक्ति वा गटांचा स्वतःच्या स्वार्थासाठीं दुरुपयोग करणें व पक्षापक्षांच्या हातमिळवणींतील अविश्वासार्हता याबाबतहि आम्हांला अतिशय कटु अनुभव आले आहेत. अर्थात् या स्वरूपाचे राजकीय अपप्रकार थांबविणें कठीण नाहीं. सर्व पक्षांनीं याबाबत कांहीं किमान संकेत मानून ते पाळले म्हणजे हें साधतां येईल.

केंद्रीकरणाच्या मुद्याबाबत आम्हांला असें वाटतें कीं, डॉ. लोहियांनीं जें निरीक्षण व स्पष्टीकरण मांडलें तें म्हणजे राजकीय पक्षांचे खालचे घटक व सर्वसाधारण सभासद यांचें राजकीय शिक्षण पुरेसें झालेलें नाहीं या गोष्टीची कबुली होय. आमच्या मतें हा दोष संघटनात्मक केंद्रीकरणाचा नसून नेते लोक पक्षकार्यकर्त्यांना शिक्षण देण्यांत पुरेसा उत्साह व चिकाटी दाखवीत नाहींत याचा आहे. कांहीं वेळां तर आपल्या चुकीच्या धोरणांनाहि पक्षकार्यकर्त्यांकडून संपूर्ण पाठिंबा मिळावा यासाठीं पक्ष-नेते मुद्दामच त्यांची राजकीय प्रगल्भता वाढवीत नाहींत असेंहि दिसून येतें. कांहीं वेळां असेंहि असतें कीं, राजकीय जीवनांतून उठून जायचें नसेल तर वरून आलेल्या आदेशांचें व हुकुमांचें पालन करणें हाच राजकीय शहाणपणाचा कळस झाला अशा प्रकारची शिस्त पक्षकार्यकर्त्यांना लावलेली असते. अशा पक्षांचे नेते त्यांच्या कार्यकर्त्यांशीं मधूनमधून शिष्टाचारानें बोलूं लागले म्हणजे लगेच ते पक्षसंघटनेबाबतचें व पक्षकार्यकर्त्यांबाबतचें आपलें उपरोक्त धोरण बदलतील अशी अपेक्षा करणें चूक ठरेल. यांतून बाहेर पडण्याचा एकच मार्ग आहे, व तो म्हणजे पक्षसंघटनेची लोकशाहीच्या पद्धतीनें बांधणी करणें, व पक्षकार्यकर्त्यांचा विकास घडवून आणण्यासाठीं अहर्निश प्रयत्नशील राहणें हाच होय.

डॉ. लोहियांनीं उपस्थित केलेल्या प्रश्नांबाबतचीं आमचीं मतें थोडक्यांत वरीलप्रमाणें आहेत. आपल्या राजकीय जीवनांतील हे प्रश्न अतिशय गंभीर असल्यानें त्याबाबत अधिकाधिक चर्चा करण्यासाठीं आम्ही उत्सुक आहोंत. तसेंच आपण बोलावणार असलेल्या गोलमेज परिषदेंतून कांहीं फलनिष्पत्ति होणार असेल तर त्यांत सहभागी होण्यासहि आम्ही तयार आहोंत.

कलकत्ता, १२ डिसें. १९५६.

: ६ :

कम्युनिस्ट पार्टीचे जनरल सेक्रेटरी अजय घोष यांचें उत्तर :—

तुमचें ता. २५ नोव्हेंबरचें पत्र व डॉ. लोहियांचें निवेदन मिळालें. त्या निवेदनांतील बऱ्याच मुद्यांशीं मीं सहमत नाहीं. पण पत्रांत त्यांबाबत अधिक लिहिणें शक्य नाहीं.

सर्वपक्षीय गोलमेज परिषदेच्या सूचनेबाबत आम्हांला असें वाटतें कीं येत्या सार्वत्रिक निवडणुका संपल्यानंतरच त्याचा विचार करणें अधिक योग्य होईल. सध्यां सर्वच पक्ष निवडणुकीच्या धामधुमींत गुंतले असल्यानें अशी परिषद् बोलावणें कितपत व्यवहार्य ठरेल याबद्दल मी साशंक आहें.

नवी दिल्ली, १८ डिसें. १९५६

: ७ :

मजदूर किसान पार्टीचे नियंत्रक-चिटणीस आर. के. खाडीलकर यांचें उत्तर:—

तुमच्या तारीख २५ नोव्हेंबर १९५६ च्या पत्राबद्दल आभारी आहें. आपल्या देशांत लोकशाही जीवनाचा विकास घडविण्याच्या दृष्टीनें डॉ. लोहियांनीं उपस्थित केलेले मुद्दे महत्त्वाचे आहेत. राजकीय पक्षांनीं आपल्या कार्यपद्धतीचें कठोर समीक्षण केलें पाहिजे, म्हणजे बद्धमूल झालेल्या कांहीं संवयी बदलून टाकणें किती आवश्यक आहे हें त्यांना समजून येईल. अशा प्रकारचा प्रयत्न सर्व पक्षांनीं गंभीरपणें केला तर आपलें राजकीय जीवन निरोगी व उत्साही होण्यास मदत होईल. भारतीय राज्य-घटनेंत पक्षीय सरकारचीं कांहीं गृहीत कृत्यें ग्रथित केलेलीं आहेत. पण दुर्दैवानें आपल्या देशांतील पक्ष-संघटना त्या दृष्टीनें विकसित झाल्या नाहींत. खरें तर त्या फारच मागासलेल्या आहेत. अशा परिस्थितींत आपल्या सामाजिक जीवनाची घडण संसदीय लोकशाहीच्या पद्धतीनें करण्यावर ज्यांची श्रद्धा आहे अशांनीं देशाच्या राजकीय जीवनांत प्रमाणभूत ठरतील अशा तत्त्वांवरच आपापल्या पक्षांच्या संघटना उभारल्या पाहिजेत. पण मला अशी भीति वाटते कीं ज्यांचे हितसंबंध

पक्षसंघटनेंत गुंतले आहेत असें कांहीं स्वार्थलोलुप राजकीय नेते पक्ष-सुधारणेच्या या कल्पना स्वप्नाळू आहेत असें म्हणून त्यांना जोरदारपणें विरोध करतील.

अर्थात् अडचणी कितीहि असल्या तरी देशांत निरोगी राजकीय जीवन निर्माण होण्याच्या दृष्टीनें पक्षीय राजकारणांतील हे दीर्घकालीन दोष व अपप्रकार दूर करण्यासाठीं डॉ. लोहियांनीं केलेल्या सूचनांशीं मीं सहमत आहे. अर्थात् याच वेळीं मी हीहि गोष्ट आपल्या नजरेस आणून देऊं इच्छितों कीं लहान-मोठे सर्वच पक्ष सध्यां आगामी निवडणुकीच्या तयारींत गुंतले असल्यानें गोलमेज परिषद् बोलावण्यासाठीं ही वेळ योग्य नव्हे. तेव्हां माझी अशी सूचना आहे कीं हा निवडणुकीचा ज्वर उतरून राजकीय पक्ष आपल्या नेहमींच्या संथ मनःस्थितींत आले म्हणजे ही परिषद् बोलवावी.

या संदर्भांत मी आणखी अशीहि सूचना करूं इच्छितों कीं संघटनेच्या पद्धति व व्यवहार यांच्याबरोबरच वेगवेगळ्या पक्षांच्या राजकीय कार्य-क्रमांचाहि संयुक्तरीत्या विचार केला जावा, म्हणजे त्यांच्या दृष्टिकोनांत व कार्यपद्धतींत कोणता मूलभूत फरक आहे तें समजून येईल. त्यामुळें मूलभूत मतभेद नसतांनाहि पक्षाचें स्वतंत्र अस्तित्व टिकाविण्यासाठीं जें वेगळेंपण मोठें करून दाखविलें जातें तें टाळतां येईल, व समान भूमिकेच्या अभावामुळें निर्माण होणाऱ्या पूर्वग्रहांच्या व गैरसमजुतींच्या भिंतीहि दूर करतां येतील.

या प्रयत्नांमुळें अनेक गट व पक्षांचें एकत्रीकरण होणें शक्य होईल, व पर्यायानें निरोनी व प्रभावशाली राष्ट्रीय संघटना बांधायला मदत होईल.

पुणें, २० डिसें. १९५६.

: ८ :

समाजवादी पक्षाचे सहचिटणीस मनकलथ यांचें स्मरणपत्र.—

विषय : आचार-संहिता बनविण्यासाठीं व सर्वांना मान्य होतील अशीं पक्षसंघटनेबाबतचीं तत्त्वें ठरविण्यासाठीं सर्व पक्षांची गोलमेज परिषद् भरविणें.

संदर्भ : या कार्यालयाचें ता. २५–११–५६ चें पत्र, त्यासोबत डॉ. लोहियांच्या निवेदनांतील कांहीं उतारे, व आपलें उत्तर.

वरील पत्रव्यवहाराकडे मीं आपलें लक्ष वेधूं इच्छितों. समाजवादी पक्षाच्या राष्ट्रीय समितीनें लखनौला झालेल्या आपल्या बैठकींत असा निर्णय घेतला आहे कीं, सर्वपक्षीय गोलमेज परिषदेचा पाठपुरावा करण्यांत यावा. आम्ही या परिषदेचें यजमानपद स्वीकारूं इच्छितो, व त्या दृष्टीनें आपण आपलीं मतें व निश्चित स्वरूपाच्या सूचना पाठवाव्यात अशी विनंति करतों.

हैद्राबाद, १३ एप्रिल १९५७

: ९ :

प्रजासमाजवादी पक्षाचे सहचिटणीस प्रेम भसीन यांचें उत्तर —

तुमचें ता. १३ एप्रिल ५७ चें पत्र मिळालें. पण ता. २५–११–५६ चें मात्र मिळालें नाहीं हें सखेद कळवूं इच्छितों. कृपया आपण त्या पत्राची नक्कल पाठवावी म्हणजे आम्हांला या परिषदेसंबंधीं कल्पना नीट समजून घेतां येईल व त्याबाबत आमचें मत बनवितां येईल.

नवी दिल्ली, १८ एप्रिल १९५७

: १० :

समाजवादी पक्षानें ता. २३ एप्रिल ५७ रोजीं वरील मागणीप्रमाणें कागदपत्र पाठविले.

: ११ :

भारतीय जनसंघाचे कार्यालय–मंत्री जगदीश प्रसाद यांचें उत्तर—

आपल्या, क्र. ३०११, ता. १३–४–५७ च्या पत्राबद्दल आभारी आहोंत. पक्षांनीं जिचें पालन केलें पाहिजे अशी सर्वसंमत आचार-संहिता बनविण्याची कल्पना आम्हांला स्वागतार्ह वाटते. जर अशी परिषद् बोलावली गेली व बहुतेक पक्ष (निदान विरोधी पक्षांपैकी तरी बहुसंख्य) त्यांत सहभागी होणार असले तर आम्हीहि आमचा प्रतिनिधि पाठवूं.

आपण या विषयावर जो मसुदा बनविला असेल तोहि पाठवावा अशी विनंति.

नवी दिल्ली, २० एप्रिल, १९५७

: १२ :

रेव्होल्युशनरी कम्युनिस्ट पार्टीचे जनरल सेक्रेटरी सुधीरकुमार दासगुप्ता यांचें पत्र : —

गोलमेज परिषदेबाबत आपण पाठविलेलें पत्र व त्यावरील आमचें उत्तर यांकडे लक्ष वेधविणारें आपलें ता. १३ एप्रिल, ५७ चें पत्र मिळालें.

याबाबत आमच्या निश्चित सूचना मांडण्यापूर्वी आम्ही हें जाणून घेऊं इच्छितों कीं या परिषदेला यायला कोणकोणत्या पक्षांनीं तयारी दाखविली आहे, व या परिषदेचा अजेंडा काय राहील. परिषदेची जागा व तारीख सर्वांच्या सोयीनें व विचारानें ठरवितां येईल.

इतर पक्षांकडून काय प्रतिसाद मिळाला व तुमची आतां निश्चित स्वरूपांत काय सूचना आह तें कृपया कळवावें अशी विनंति.

कलकत्ता, २ मे १९५७

: १३ :

काँग्रेसचे जनरल सेक्रेटरी श्रीमन्नारायण यांचें १९५८ मधील पत्रक—

भारतांतील सार्वजनिक व राजकीय जीवनाचीं नियामक तत्त्वें कोणतीं असावींत याबाबत वेगवेगळ्या पक्षांत मित्रत्वाच्या नात्यानें खुली चर्चा घडवून आणावी या सूचनेचें आम्ही स्वागत करतों. आतांपर्यंत भारतानें अहिंसा, शांतता व परस्पर–सहकार्य हीं तत्त्वें नेहमींच शिरोधार्य मानलीं आहेत. साधनें व मार्ग शुद्ध असावींत याबाबतहि त्यानें नेहमीं आग्रह धरला आहे. आपापल्या उद्दिष्टांच्या पूर्तीसाठीं शुद्ध व शांततामय मार्गांचा अवलंब करण्याचा सर्व पक्षांनीं निश्चय करण्यांत आम्हांला कोणतीच

अडचण दिसत नाहीं. उदाहरणार्थ, आपण सगळेजण असें निश्चितपणें रवूं शकतों कीं आपापले राजकीय कार्यक्रम प्रत्यक्षांत आणण्यासाठीं आम्ही हिंसेचा कधींहि अवलंब करणार नाहीं. जर एखाद्या पक्षानें हें तत्त्व पाळलें नाहीं, व त्याच्या कांहीं अनुयायांनीं एखाद्या वेळीं हिंसक मार्गांचा उपयोग केला तर त्या कृत्यांचा जाहीरपणें निषेध करणें, व त्या कार्यकर्त्यांविरुद्ध शिस्तभंगाचा इलाज करणें ही त्या पक्षाची जबाबदारी राहील. तसेंच सत्ताधारी पक्षानेंहि असें ठरविलें पाहिजे कीं न्याय्य मागण्यांसाठीं केल्या जाणाऱ्या राजकीय चळवळींना तोंड देतांना हिंसा वापरली जाणार नाहीं. जर एखाद्या प्रसंगीं गोळीबार करावा लागला तर त्याची न्यायालयीन चौकशी अपरिहार्यपणें झाली पाहिजे. सत्ताधारी व विरोधी पक्षांनीं असे चांगले संकेत निर्माण केले तर त्यामुळें स्थिर व प्रगतिशील लोकशाहीचा पाया रचण्यास मदतच होईल. इतर देशांना गांधींचीं तत्त्वें शिकविण्याआधीं इथल्या राजकीय पक्षांनीं इथलें राजकीय जीवन घडवितांना राष्ट्रपित्याच्या आदर्शाप्रमाणें वर्तन करण्याचा प्रयत्न करणें शहाणपणाचें ठरेल.

(ए. आय. सी. सी. च्या इकॉनॉमिक रिव्हयू ह्या पाक्षिकाच्या १ जुलै १९५८ च्या अंकांतील श्री. श्रीमन्नारायणांचा लेख. भारतीय वृत्तपत्रांनीं त्याला खूप प्रसिद्धि दिली होती.)

: १४ :

समाजवादी पक्षाचे अध्यक्ष मधु लिमये यांचें पत्रक—


हैद्राबाद, ३ जुलै. भारतीय सार्वजनिक जीवनाचीं नियामक तत्त्वें ठरविण्यासाठीं मित्रत्वाच्या चर्चा करण्याबाबत काँग्रेसचे जनरल सेक्रटरी श्रीमन्नारायण यांनीं केलेल्या आवाहनाचें समाजवादी पक्षाचे अध्यक्ष मधु लिमये यांनीं स्वागत केलें.

श्री. मधु लिमयेंनीं वृत्रपत्रांकडे पाठविलेल्या पत्रकांत असें म्हटलें आहे कीं, अशा प्रकारची परिषद् भरविण्याची सूचना डॉ. लोहियांनीं १९५६ मध्येंच केली होती. श्री. लिमये पुढें असें म्हणाले कीं, " ही

चर्चा केवळ शांततामय मार्ग व पोलिसी–गोळीबार यांच्यापुरतीच मर्यादित असूं नये. भारतीय राजकारणांत बळावत चाललेल्या संधिसाधु वृत्तीला आळा घालण्याच्या प्रश्नाचाहि त्या परिषदेनें विचार करावा. ''

अशा संधिसाधुपणाचीं त्यांनीं दोन उदाहरणें दिलीं. कायदेमंडळाचे सभासद पक्ष बदलतात पण पक्षाच्या तिकिटावर निवडून आलेल्या जगांचे राजिनामे मात्र देत नाहींत; आणि दुसरें म्हणजे एका पक्षानें तिकिट नाकारलें कीं कांहीं उमेदवार सरळ दुसऱ्या पक्षाचें तिकिट घेऊन निवडणूक लढवितात.

(फ्री प्रेस जर्नल, मुंबई, ४ जलै, १९५८)
(ऑगस्ट १९५८ च्या मनकाईंड मासिकावरून)



राजकीय पक्षांसाठीं आचार-संहिता

मधु लिमये

सार्वजनिक जीवनांत सर्व राजकीय पक्षांनीं कांहीं निश्चित संकेत पाळावेत व सार्वजनिक जीवनाचा प्रवाह शुद्ध ठेवण्याचा प्रयत्न करावा हा विचार कांहीं नवा नाहीं. १९५६ मध्यें त्यावेळचे समाजवादी पक्षाचे अध्यक्ष श्री. राम मनोहर लोहिया यांनीं राजकीय पक्षांची एक गोलमेज परिषद् भरवून तिच्यांत सर्वसंमतीनें एक आचारसंहिता करण्याची सूचना केली होती. या सूचनेच्या आधारें समाजवादी पक्षाच्या चिटणिसांनीं सर्व राजकीय पक्षांना एक विनंतिपत्रहि पाठविलें होतें. पण त्याला देशांतील प्रमुख राजकीय पक्षांकडून योग्य ती साद मिळाली नाहीं.

त्यानंतर दोन वर्षांनीं म्हणजे १९५८ मध्यें, त्यावेळचे कॉंग्रेसचे चिटणीस श्री. श्रीमन्नारायण यांनीं अखिल भारतीय कॉंग्रेस कमिटीच्या "इकनॉमिक रिव्ह्यू"मध्यें एक लेख लिहून या प्रश्नाचा ऊहापोह केला होता व सार्वजनिक व्यवहारासाठीं कांहीं आधारभूत तत्त्वें सर्वानुमतें निश्चित करण्यांत यावींत असें म्हटलें होतें. समाजवादी पक्षानें या सूचनेला तात्काळ पाठिंबा दिला. परंतु त्यानंतर कॉंग्रेसच्या चिटणिसाकडून कोणतीहि हालचाल झाली नाहीं. गोखले अर्थशास्त्र संस्था आणि समाज प्रबोधन संस्था यांनीं आयोजिलेला हा परिसंवाद म्हणूनच स्वागतार्ह आहे.

या परिसंवादांत पुढील प्रश्नांचा विचार व्हावा असें मला वाटतें—

१. सार्वजनिक जीवनांतील हिंसेचें व असहिष्णुतेचें वातावरण—

अ) आपल्या देशाच्या प्रगतीसाठीं व लोकशाहीच्या निकोप वाढीसाठीं सर्व राजकीय पक्षांनीं शांततामय परिवर्तनाचें तत्त्व स्वीकारणें आवश्यक आहे. ज्यांची श्रद्धा हिंसात्मक क्रांतीवर आहे ते लोक अर्थातच ही गोष्ट मान्य करणार नाहींत. पण सुदैवानें आपल्या देशांतील सर्वच प्रमुख राजकीय पक्षांनीं लोकशाही मार्गानें जाण्याचें ठरविलें असल्यामुळें याबाबतींत कांहीं संकेत सर्वसंमतीनें निश्चित करणें अशक्य नाहीं.

गेलीं १४ वर्षें देशाची सत्ता अहिंसात्मक लढ्यांतून शक्तिसंचय केलेल्या पक्षांकडे असून काँग्रेस सरकारांकडून फार मोठ्या प्रमाणांत गोळीबाराचा अवलंब करण्यांत आला ही गोष्ट नाकारतां येणार नाहीं. या सरकारी हिंसेबद्दल एक विशिष्ट दृष्टिकोन जनतेपुढें ठेवण्याचा प्रयत्न समाजवादी पक्षानें सातत्यानें केला आहे. मतपेटीप्रमाणेंच शांततामय मोर्चे, संप, सविनय प्रतिकार हें लोकशाहीचें अविभाज्य अंग आहे असें माझ्यासारख्याचें मत आहे. पण हें सर्व करीत असतां शांतताभंग होऊं नये, समाजकंटकांकडून दगडफेक, जाळपोळ इ. प्रकार होऊं नयेत यासाठीं राजकीय पक्षांनीं जागरूक राहिलें पाहिजे असें आम्हांला वाटतें. याबाबतींत राजकीय पक्षांनीं आपलें कर्तव्य पार पाडलेलें नाहीं, हें मान्य करूनहि असें म्हणणें प्राप्त आहे कीं जरा चार-दोन दगड पडले, एखादा जाळपोळीचा प्रकार झाला कीं पोलिसांचा तोल सुटावा व त्यांनीं लगेच गोळ्या झाडायला सुरुवात करावी ही गोष्ट केव्हांहि समर्थनीय नाहीं. गतवर्षी अमेरिकेचे अध्यक्ष श्री. आयझेनॉर यांचा जपानचा संकल्पित दौरा रद्द व्हावा म्हणून त्या देशांत अति प्रचंड निदर्शनें झालीं. त्यावेळीं जपानी पोलीसांनीं दाखविलेलें कौशल्य व संयम खरोखर प्रशंसनीय होता. हीं निदर्शनें अनेक दिवस चाललीं होतीं व मोठ्या संख्येनें लोक त्यांच्यांत भाग घेत होते. तरीहि तेथील पोलिसांनीं एकदांहि गोळीबाराचा अवलंब केला नाहीं. आपल्या देशांतील सरकारें जर हा आदर्श डोळ्यांपुढें ठेवतील तर हिंसेचें वातावरण निवळण्यास निश्चितपणें मदत होईल.

आ) विरोधकांच्या सभेंत जाऊन तेथें हुल्लड माजवायची, सभा चालू असतां घोषणा करायच्या, विरोधकांचें प्रचार-स्वातंत्र्य हिरावून घ्यायचें, हे प्रकार आपल्याकडे सर्रास चालूं आहेत. विरोधकांच्या सभांत स्वजनांनीं केलेल्या हुल्लडीला " जनतेनें दिलेलें उत्तर " असें नांव मिळतें व स्वतःच्या सभेंत हा प्रकार झाला तर त्याला " गुंडगिरी " म्हणून संबोधलें जातें. लोकशाहीच्या आणि नागरिक स्वातंत्र्याच्या दृष्टीनें हे निंद्य प्रकार थांबणें आवश्यक आहे. याच्या उलट सभांत प्रश्न विचारणें वगैरे गोष्टी केव्हांहि गैर मानतां येणार नाहींत.

२. निवडणुकांतील संधिसाधूपणा—

मूलभूत प्रश्नावर मतभेद असलेले पक्ष निवडणुकांच्या वेळीं मात्र एकत्र येतात त्यामुळें सार्वजनिक जीवनांत संधिसाधूपणा बळावतो आणि लोकांच्या मनांत गोंधळ माजतो, परंतु बहुतेक पक्ष हा प्रश्न धोरणाच्या क्षेत्रांत येतो म्हणून त्याची चर्चा या परिसंवादांत नको असें म्हणतील व तें योग्यहि आहे. परंतु या संबंधांत दोन-तीन मुद्यांचा निर्देश करणें अप्रस्तुत ठरणार नाहीं.

अ) सध्यां राजकीय कार्यकर्त्यांच्या निष्ठा इतक्या संशयास्पद झाल्या आहेत व स्वार्थबाजीला राजकीय पक्षांकडून इतकें उत्तेजन मिळत आहे कीं एखाद्या निवडणुकींत एखाद्या व्यक्तीला एखाद्या पक्षानें जर तिकिट दिलें नाहीं तर ती व्यक्ति लगेच दुसऱ्या राजकीय "दुकानांत" जाते व तेथें आपला सौदा पटवून त्या पक्षाचें तिकिट प्राप्त करते. कोणत्याहि व्यक्तीला अपल्या निष्ठा व आपलीं मतें बदलण्याचें अनिर्बंध स्वातंत्र्य असलें पाहिजे हें खरें. पण एका पक्षानें दरवाजा बंद केल्यामुळें लगेच दुसऱ्या पक्षाकडे तिकिटाची याचना करणाऱ्या व्यक्तीला निदान त्या निवडणुकींत तरी दुसऱ्या पक्षानें तिकिट देऊं नये. हा संकेत पाळल्यानें कोणत्याहि पक्षाचें नुकसान होणार नाहीं.

आ) एखाद्या पक्षानें एखाद्या पक्षसभासदाला जर तिकिट नाकारलें तर पक्षशिस्त गुंडाळून ठेवून तो सभासद "स्वतंत्र" म्हणून निवडणूक लढावितो व यशस्वी झाल्यास खुशाल पुनश्च पक्षांत सामील करून घ्यावें म्हणून विनंति करतो. आश्चर्याची गोष्ट अशी कीं राजकीय पक्षहि आपली संख्या फुगविण्यासाठीं मोठ्या खुशीनें त्याचें स्वागत करतात. या प्रकाराला आळा घालण्याच्या दृष्टीनें अशा लोकांना एका विशिष्ट काल-मर्यादेनंतरच परत सभासदत्व दिलें जावें.

इ) एका राजकीय पक्षाच्या कार्यक्रमावर व तिकिटावर निवडून यायचें आणि आपल्या जागांचा राजीनामा न देतां दुसऱ्या पक्षांत जायचें ही गोष्ट आजकाल अगदीं मामुली होऊन बसली आहे. पक्ष बदलणाऱ्या व्यक्तींना स्वपक्षांत घेण्यापूर्वी त्यांनीं आपल्या जागांचें त्यागपत्र दिलें

अक्षर ... 934 ... नं. वि. ...

पाहिजे, असा आग्रह जोंपर्यंत पक्षपुढारी धरत नाहींत तोंपर्यंत ही राजकीय चांचेगिरी थांबणार नाहीं.

ई) लोकसभा–विधानसभांच्या निवडणुकींत पराभूत झालेल्या उमेदवारांना राजकीय पक्षांनीं मागील दरवाजानें वरिष्ठ कायदेमंडळांत प्रवेश देऊं नये, अथवा राज्यपालादि पदावर नेमणूक करून त्यांचें सांत्वन करूं नये. जनसेवेच्या मार्गानें निवडून येण्याचाच प्रयत्न त्यांनीं करावा.

३. राजकीय पक्षांच्या निर्वाहाचीं साधनें—

लोकशाहीमध्यें पक्षपद्धतीचें महत्त्वपूर्ण स्थान आहे. समाजांतील निरनिराळ्या थरांच्या हितसंबंधांचें रक्षण करणें, लोकमताचें प्रभावीपणें प्रतिनिधित्व करणें हें जसें राजकीय पक्षांचें काम आहे, त्याचप्रमाणें त्यांच्या आशा–आकांक्षा सुस्पष्ट कार्यक्रमाच्या रूपानें व्यक्त करणें व त्यामार्गे लोकमताची शक्ति उभी करून समाजपरिवर्तनाचा मार्ग मोकळा करणें हेंहि त्यांचें कर्तव्य आहे. यासाठींच राजकीय पक्षांचे व्यवहार अंधारांत न होतां सर्वांच्या साक्षीनें होणें आवश्यक आहे. राजकीय पक्षांना आपली संघटना चालविण्यासाठीं, प्रचारासाठीं, व निवडणुका लढविण्यासाठीं पैशाची गरज असते. राजकीय पक्षांना पैसा कोठून मिळतो, हा एक महत्त्वाचा प्रश्न आहे. राजकीय पक्षाच्या उत्पन्नाची साधनें व खर्च या बाबतींतील गुप्तता फार घातक आहे. लोकशाहीची प्रक्रियाच त्यामुळें धोक्यांत येते. तीन–चार वर्षांमागें व्यापारी व औद्योगिक कंपन्यांना राजकीय निधीला मदत देण्याची परवानगी देण्यांत आली होती. तेव्हां त्यासंबंधींच्या एक खटल्यांत उच्च न्यायालयानें अशा मदतीच्या बाबतींत गुप्तता राखण्यांत येऊं नये, जो कांहीं व्यवहार करायचा तो उघडपणें करावा असें म्हटलें होतें. न्यायालयाचा हा अभिप्राय विचारांत घेण्यासारखा आहे. राजकीय पक्षांच्यां जमाखर्चावर नजर ठेवण्याची जर एखादी यंत्रणा सर्वांच्या सम्मतीनें अस्तित्वांत आली तर राजकीय जीवनांत आश्चर्यकारक सुधारणा झाल्याशिवाय राहणार नाहीं.

प्रत्येक पक्षाची सभासदसंख्या किती आहे, त्यांपैकीं वर्गणी देणारे किती व 'उधार' किती यासंबंधींची उपयुक्त माहितीहि अशा यंत्रणेमार्फत जमा करून वेळोवेळीं प्रसिद्ध करण्यांत यावी.

———

राजकीय पक्षांसाठीं आचार-संहिता-स्वरूप व मर्यादा

एस्. एम्. जोशी

भारतांत लोकशाही मूल्यें आणि लोकशाही व्यवस्था दृढमूल होऊन यशस्वी व्हावी असें आज बहुसंख्य लोकांना वाटत आहे. लोकशाहीवर विश्वास असलेले किमान दोन राजकीय पक्ष अस्तित्वांत असणें जरूरीचें आहे... याबद्दल मतभेद होऊं नये. राज्यकर्त्या पक्षाला पर्यायी पक्ष असला तरच मतदारांना निवड करण्याची संधि प्राप्त होऊं शकेल. अनेक पक्षांची आवश्यकता मान्य झाली म्हणजे पक्षोपक्षांनीं कसें वागावें आणि कोणते नीतिनियम पाळावे हा प्रश्न स्वाभाविकच निर्माण होतो. समाजांतील दोन व्यक्तींनीं परस्परांशीं कसें वागावें याबद्दल कायद्याव्यतिरिक्त अनेक सामाजिक संकेत आपण पाळीत असतों. तसें न होईल तर केवळ कायद्याच्या जोरावर समाजाची धारणा टिकाऊ स्वरूपाची होऊं शकणार नाहीं. जो नियम व्यक्तींना तोच संस्थांना लागू करणें आवश्यक ठरतें. निरनिराळ्या संस्थांमध्यें संबंध कसे असावेत याबद्दल समाजाच्या कांहीं कल्पना असतात आणि तो आचारधर्म बव्हंशानें सांभाळला जातो. त्या बाबतींत कुचराई होऊं लागली तर समाजाची कार्यक्षमता कमी होते. राजकीय पक्षांनीं एकमेकांच्या बरोबर वागतांना सर्वसंमत असें कांहीं आचार पाळावेत अशी कल्पना गेले कित्येक दिवस पुढें येत आहे. राजकीय पक्षांनीं एकत्र येऊन एखादी आचार-संहिता मंजूर करावी ही कल्पना कोणी उघडपणें नाकारूं शकत नाहीं. प्रत्येक पक्ष म्हणतो कीं सर्वांनीं मान्य केलें तर आपलीहि तयारी आहे. खराखर जर अशा प्रकारच्या आचार-संहितेची आवश्यकता आपल्याला पटली असेल तर दुसऱ्यांनीं ती मान्य करीपर्यंत आपण स्वस्थ बसावें हें समर्थनीय नाहीं. प्र. स. पक्षानें तशा अर्थाचा ठरावहि मंजूर केला. परंतु त्याची कसोशीनें अंमलबजावणी करण्याच्या बाबतींत त्या पक्षाची शक्ति अपुरी पडली आहे. हें असें कां व्हावें ?

इतर क्षेत्रांत विरोधकांबरोबर सलोख्याचे संबंध ठेवणें आणि राजकी-क्षेत्रांत विरोधी पक्षांनीं तसें वागणें यांत फार अंतर आहे. राजकीय पक्ष सत्ता हस्तगत करून आपल्या कल्पनेप्रमाणें समाजाचा कारभार चालविण्यासाठीं स्थापन झालेले असतात. पूर्वी ज्यासाठीं रक्तपात आणि लढाया होत त्या टाळून सत्तान्तराचा हा एक लोकशाही-पर्याय आहे. (Moral and democratic equivalent of wars) मतदानाच्या द्वारां बहुसंख्य जनतेचा पाठिंबा मिळविणें आणि सत्तासूत्रें हातीं घेणें हें लोकशाहीवर विश्वास असणाऱ्या राजकीय पक्षांचें उद्दिष्ट असतें. स्वाभाविकच या क्षेत्रांतील स्पर्धा तीव्र स्वरूपाची असते आणि म्हणूनच परस्परविरोधी पक्षांनीं कांहीं नीतिनियम घालून घ्यावेत. याला शाब्दिक मान्यता मिळाली तरी त्याप्रमाणें आचरण घडत नाहीं. तथापि अधिक गंभीरपणें विचार केल्यास अशा प्रकारच्या नैतिक बंधनांची आवश्यकता पटल्याशिवाय राहणार नाहीं. रक्तपाती युद्धांतहि कांहीं संकेत पाळले जातात. मग शांततामय सत्तान्तरांत त्यांचें पालन करणें अवघड आहे काय ? वैयक्तिकदृष्ट्या जे सत्ता हस्तगत करण्याचे साहसी प्रयत्न करतात त्यांच्या प्रेरणा अनेक असूं शकतील. राक्षसी महत्त्वाकांक्षा अगर सत्तालालसा यांनींहि प्रेरित होऊन लढाया आणि रक्तपात होतात. परंतु कांहीं निश्चित तत्त्वांवर आधारलेल्या लोकशाही पक्षांचे बाबतींत उघडपणें तरी तसें कोणी म्हणणार नाहीं. लोकजीवन निकोप आणि समृद्ध व्हावें यासाठीं आम्ही धडपडत आहों असेंच सर्व पक्ष म्हणणार. सारांश, लोककल्याण हाच अंतिम निकष पक्षांच्या बाबत उपयुक्त असतो. लोककल्याण ही कसोटी ठरल्यावर त्यासाठीं राजकीय पक्षांनीं कांहीं संकेत पाळण्याची आवश्यकता असेल तर ती कशी टाळतां येईल ? याच दृष्टीनें आचार-संहितेची आवश्यकता स्वयंसिद्ध आहे.

भारतासारख्या अविकसित देशांत लोकशाहीच्या संवर्धनाकरितां अशा प्रकारच्या कांहीं नियमांची आवश्यकता अधिकच वाटते. जातीयता, प्रांतीयता, इत्यादि अनिष्ट प्रवृत्ति लोकशाहीच्या विकासाच्या दृष्टीनें मारक आहेत असें प्रतिपादन सर्वच पक्ष अहमहमिकेनें करीत असतात. परंतु प्रत्यक्ष व्यवहारामध्यें कांहीं मंडळी त्याचा उघडपणें वापर करतात तर कांहीं पक्षस्वार्थासाठीं त्याकडे कानाडोळा करतात. ज्या पक्षांना लोकशाही

मूल्यांची कदर वाटते त्यांनीं तरी या बाबतींत कांहीं आचारधर्म सांभाळले पाहिजेत आणि दुसरे काय करतात त्याची पर्वा न करतां आपल्याकडून एकतर्फी निर्धारानें आणि निग्रहानें त्या धर्माचें पालन करण्याचा विडा उचलला पाहिजे.

जातीपातीवरती आधारलेली समाजरचना मोडून जातिभेदातीत सामाजिक समतेवर आधारलेली नवसमाजाची इमारत आपणांस उभारावयाची आहे. समाजांत जन्मास आलेल्या प्रत्येक व्यक्तीला आपला विकास करून आत्मसमाधान प्राप्त करून घेतां येतें आणि प्रत्येक व्यक्ति स्वयंपूर्ण आहे असें आपण मानतों. हेंच मतदानावर आधारलेल्या लोकशाहीचें अधिष्ठान आहे. परंतु व्यक्तिस्वातंत्र्य म्हणजे स्वैराचार नव्हे. समाजांत राहणाऱ्या व्यक्तीला समाजाचीं कांहीं बंधनें मान्य केलींच पाहिजेत. कारण तीं बंधनें दुसऱ्या व्यक्तीच्या स्वातंत्र्यासाठीं आवश्यक असतात. व्यक्तिस्वातंत्र्याला यामुळें आपोआपच मर्यादा पडतात. कोणत्याहि प्रगतिशील समाजांतील व्यक्ति पूर्णतया स्वतंत्र असूं शकत नाहीं. समाजाचा गाडा चालविण्यासाठीं ज्या निरनिराळ्या जाती रूढ करण्यांत आल्या त्या जातिसंस्थेचें व्यक्तिमात्रावर नियंत्रण असे. जातीच्या नियंत्रणाबाहेर जाणें व्यक्तीला जवळपास अशक्यच असे. पण जातिसंस्था नष्ट झाली म्हणजे व्यक्ति शंभर टक्के स्वतंत्र होईल असा गैरसमजहि करून घेतां उपयोगी नाहीं. जातिसंस्थेचें नियंत्रण संपलें तर अन्य कांहींतरी सामाजिक नियंत्रण निर्माण होणारच. जातिसंस्थेचें कार्य करणाऱ्या ज्या ज्या नवीन संस्था उदयास येतील त्यांचेंच तें नियंत्रण असावें हें स्वाभाविक आहे. आज आपल्या समाजांत जी थोडीफार गैरशिस्त आणि मनःपूत आचरणाची प्रवृत्ति दिसते त्याचें कारणहि व्यक्तिस्वातंत्र्यासंबंधींच्या भ्रामक कल्पना आणि सामाजिक नियंत्रण करणाऱ्या नव-संस्थांचा अभाव हेंच आहे. अशा नव-संस्था कोणत्या असाव्यात याचा विचार झाला झाला पाहिजे आणि नवसमाजाच्या निर्मितीसाठीं त्यांची आवश्यकता मान्य झाल्यावर त्यांच्या वाढीसाठीं सर्वांनीं एकदिलानें प्रयत्न करणें आवश्यक आहे. आमच्या मतें सामाजिक आणि आर्थिक समानतेवरहि आधारलेल्या नवसमाजाच्या उभारणीसाठीं ज्या कांहीं पायाभूत संस्थांची आत्यंतिक आवश्यकता आहे त्यांत सहकारी संस्था, कामगार-संघ आणि ग्रामपंचायती

यांचा समावेश करावा लागेल. या संस्थांच्या द्वाराच आपल्या आर्थिक उत्पादनाचें कार्य आणि ग्रामकुटुंबांतील सर्वांच्या समान हक्काची किमान जबाबदारी पूर्ण करतां येईल. आजची जन्मावरून उच्च-नीचतेची कल्पना जाऊन ज्याच्या त्याच्या कार्याप्रमाणें त्याला समाजांत अधिकार प्राप्त व्हावेत यासाठीं रस्ता तयार होईल. जातिधर्मातीत समाजरचना निर्माण करण्याच्या दृष्टीनें या संस्थाच जुन्या समाजांतील संस्थांचा पर्याय होऊं शकतात. कारखान्यांत काम करणारे सारे लोक जातिधर्मनिरपेक्ष कामगार-संघाचे सभासद होऊं शकतात. विशिष्ट व्यवसाय करणाऱ्या सर्व व्यक्ति सहकारी संघाचे सभासद बनतात. त्यांत जातिभेदाला जागा उरत नाहीं. लोककल्याणाच्या दृष्टीनें या संस्थांच्या द्वारां व्यक्तिजीवनावर आवश्यक तीं नियंत्रणें घालतां येतात. अशा संस्थांत तरी आपण कांहीं शिष्टाचार पाळणें आवश्यक नाहीं काय ? या संस्था समर्थ होऊं शकल्या नाहींत तर त्याचें पर्यवसान हुकुमशाहींतच झाल्याशिवाय राहणार नाहीं. अशा प्रकारच्या विकेंद्रित सामाजिक व आर्थिक संस्थांच्या द्वारां आवश्यक तीं सामाजिक नियंत्रणें घालणें आणि समाजाचा गाडा प्रगतीच्या मार्गावर वेगानें हाकीत नेणें हेंच लोकशाहीच्या दृष्टीनें अत्यंत जरूरीचें आहे. व्यक्तिजीवनाला जर असें नियंत्रण लाभलें नाहीं तर निर्नायकी होऊन सर्व सत्ता एखाद्या पक्षाच्या, गटाच्या अथवा व्यक्तीच्या हातीं केंद्रित होण्याचा फार मोठा धोका आहे.

म्हणून सर्व पक्षोपपक्षांनीं एकत्र बसून लोकशाहीवर आधारलेल्या नवसमाज-निर्मितीच्या दृष्टीनें या संस्थांचा कारभार अधिकाधिक कार्य-क्षमतेनें कसा चालेल याबद्दल विचार केला पाहिजे. सामाजिक कर्तव्याची जाणीव आणि त्याचें पालन करण्याची प्रवृत्ति समाजांत वाढली पाहिजे. या दृष्टीनें पाहतां ग्रामपंचायती, सहकारी संघ आणि कामगार-संघटना या संस्थांत तरी पक्षबाजीला स्थान मिळतां उपयोगी नाहीं. लोककल्याणाच्या दृष्टीनें धोरणें काय असावींत याबद्दल प्रामाणिक मतभेद असूं शकतात, आणि त्यासाठीं लोकशाही घटनेंत निरनिराळ्या पक्षांची आवश्यकता असते. हीं धोरणें ज्या पातळीवर ठरलीं जातात त्या पातळीपुरता पक्षा-भिनिवेश राहावा हें संयुक्तिक आहे. परंतु पायाभूत अशा आर्थिक आणि सामाजिक संघटनांना वरच्या पातळीवर ठरलेल्या धोरणाप्रमाणेंच कार्य

करावें लागतें. दुसऱ्या शब्दांत सांगावयाचें तर या संस्थांत कारभारालाच विशेष महत्त्व आहे. धोरण ठरविण्याचें काम त्यांच्याकडे जवळपास नसतेंच. कारभार चांगला आणि कार्यक्षमतेनें चालावा म्हणून जे भले लोक असतील त्यांना जनतेनें निवडून द्यावें हें श्रेयस्कर होय. पक्षाच्या तिकिटावर या संस्थांतील निवडणुका लढविल्या तर मतदारांना सांकडे घातल्या-सारखें होतें. विरोधी पक्षाचा मनुष्य कार्यक्षम असला तरी आपल्या पक्षाच्या माणसालाच मत देणें आपलें कर्तव्य आहे असें त्याला आवाहन केलें जातें आणि त्याच्या पक्षनिष्ठेवर भलताच ताण पडतो. परिणामतः सचोटीची आणि कार्यक्षम माणसें डावलली जातात. मग या संस्थांच्या कार्यक्षमतेंत न्यूनता आली तर त्यांत आश्चर्य कसलें? लोककल्याणाच्या दृष्टीनें ही गोष्ट अनिष्ट आहे. म्हणूनच ती कटाक्षानें टाळली पाहिजे. सर्व पक्षोपपक्षांनीं एकत्र येऊन जी आचार-संहिता बनवावयाची तिच्यांत या गोष्टीचा प्रामुख्यानें समावेश व्हावा अशी आग्रहाची विनंति आहे. आपल्या देशांतील कार्य आर्थिक विषमता नष्ट करण्यासाठीं उत्तरोत्तर अधिक उत्पादन करण्याचें आहे हें विसरून चालणार नाहीं, आणि ही उत्पादनवाढ लोकशाहीच्या मार्गानें करावयाची ही तर आपली मूलभूत निष्ठा आहे. भारतीय समाजापुढें ज्या समस्या आहेत त्या सोडविण्याच्या दृष्टीनें आचार-संहितेचा विचार झाला पाहिजे.

राजकीय पक्षांसाठीं आचार-संहिता तयार करण्याची गरज

दि. के. बेडेकर

(१) जेथें अनेक पक्ष असलेली संसदीय लोकशाही अस्तित्वांत आहे अशा इतर देशांप्रमाणें भारतांतहि हे सर्व पक्ष सत्तेसाठीं किंवा शासन-संस्था ताब्यांत घेण्यासाठीं झगडत आहेत असें दिसतें. याचा अर्थ असा कीं हे सर्व पक्ष एक प्रकारच्या सतत युद्धमान भूमिकेंत आहेत, फार तर त्यांच्यांत मधूनमधून तात्पुरता शस्त्रसंधि होत असतो. ही लढाई सर्वव्यापी आहे, व प्रत्येक पक्ष इतर सर्व पक्षांचा शत्रु आहे असें मानलें पाहिजे. कांहीं पक्षांच्या संयुक्त आघाड्या मधूनमधून होत असतील, पण त्या अल्पकालीन असतात; आणि दुसऱ्या एखाद्या पक्षाच्या किंवा पक्षसमुहाच्या विरुद्ध या आघाड्यांचा रोख असतो. या खेळाचे कांहीं नियम असलेच तर ते युद्धकाळांत शत्रूंशीं वागतांना सैनिकानें पाळावयाच्या नियमांसारखे होत.

राजकीय परिस्थितीकडे अशा दृष्टीनें पाहिलें तर मग आचार-संहितेची व्याप्ति फारच मर्यादित राहील. आज आंतरराष्ट्रीय क्षेत्रांतहि युद्ध-काळांत शत्रूच्या बिगर-सैनिकी नागरिकांशीं कसें वागावें, युद्धकैद्यांना कोणती वागणूक द्यावी, रेडक्रॉसच्या माणसांना कोणत्या सवलती दिल्या पाहिजेत, आणि व्यापक प्रमाणावर संहार करूं शकणारे विषारी वायु वा तत्सम अस्त्रांचा वापर करूं नये—यांसारखे कांहीं संकेत आहेत. राजकीय पक्षांसाठींच्या आचार संहितेच्या उद्देलादेखील पक्षापक्षांतील युद्ध मानवी पातळीवर टिकविण्याच्या प्रयत्नाचें स्वरूप येऊं शकेल.

(२) अर्थात् परिस्थितीकडे अगदीं वेगळ्या दृष्टिकोनांतून कां पाहूं नये असेंहि कोणी विचारील. असा दुसरा दृष्टिकोन स्वीकारार्ह किंवा विचारार्ह तरी नक्कीच आहे. या निबंधांत स्वीकारलेला हा दुसरा दृष्टिकोन असा कीं अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार असणारे सर्वच राजकीय पक्षांतले

नेते यांचा एक व्यावसायिक गट आहे असें मानावें. त्यांचें कौशल्य, ज्ञान, त्यांचें स्थान व हक्क सर्वच बाबी विशिष्ट प्रकारच्या आहेत. समाजाचा नियोजनबद्ध पद्धतीनें सर्वांगीण विकास घडवून आणण्याचें काम त्यांनीं व्यक्तिशः व गट म्हणून अंगिकारलें आहे. म्हणून सर्व समाजाच्या गरजा चांगल्या रीतीनें भागविल्या जाण्यासाठीं मनुष्यबळ व इतर साधनसामुग्रीचा चांगल्या प्रकारें उपयोग केला जातो आहे कीं नाहीं हें पाहण्याची त्यांची जबाबदारी असते. सर्व समाजाला जबाबदार असलेला अनुभवी लोकांचा एक छोटा गट अशा रीरीनें त्यांनीं काम करावें अशी लोकांची अपेक्षा असते.

अशा स्थितींत आचार-संहिता बनविणें म्हणजे कांहीं राजकीय पक्षांच्या युद्धाला मानवी पातळीवर आणण्याचा प्रश्न राहत नाहीं. त्या प्रश्नाचें स्वरूप वेगळेंच बनतें. व्यावसायिक राजकारण्याच्या गटाची एकात्मता टिकावी, त्यांच्यांत व्यावहारिक समतोल राहावा, आणि त्याचबरोबर त्या गटाच्या प्रत्येक घटकाला स्वतंत्ररीत्या क्रियाशील असण्यालाहि वाव राहावा हा आचार-संहिता बनविण्यामागचा उद्देश असला पाहिजे.

(३) अशा गटांत ज्या अडचणी अपरिहार्यपणें उद्भवतील, व ज्या दूर करणें त्या गटाचेंच काम आहे, अशा अडचणींचा विचार करण्यापूर्वी थोडेसें विषयांतर करणें आवश्यक आहे. "व्यावसायिक गटां"ची ही कल्पना सर्वच प्रकारच्या परिस्थितींत लागूं होईल व उपयुक्त ठरेल असें नाहीं. उदाहरणार्थ, भारतांत ब्रिटिश अंमल कायम होण्यापूर्वीच्या शें-सव्वाशें वर्षांत येथील राजेरजवाड्यांना आपल्या सगळ्यांवरच परकीय गुलामगिरीची पकड बसेल असें दिसत होतें. असें असूनहि आपापसांत झगडणाऱ्या मराठा सरदारांनीं ब्रिटिशांच्या विरुद्ध संयुक्त आघाडी उभारली नाहीं (म्हणजेच आपल्या व्यावसायिक गटाची एकात्मता टिकविली नाहीं). उलट एक-मेकांच्या विरुद्ध ते ब्रिटिशांना मदत करीत राहिले व त्यामुळें शेवटीं सगळ्यांचाच पराभव झाला. अशा परिस्थितींत "गट" या कल्पनेला कांहीं अर्थ उरत नाहीं. पण आजच्या लोकशाही भारतांत त्या कल्पनेला बराच अर्थ आहे. कारण आजच्या समाज-रचनेंत राजकीय सत्तेचें पूर्वीचें इतरांपासून अतिशय दूर असलेलें वेगळें स्वरूप (Isolated Character)

गळून पडलें आहे. आज समाजांतील साधनसामुग्री व सुखसोयी यांच्यावर ताबा मिळवून त्यांचा उपयोग करण्याची संधि प्रत्येक व्यक्ति, कुटुंब किंवा वर्ग यांना मिळते आहे; प्रत्येकाला याबाबत मिळणारें यश मात्र कमीजास्त आहे. राजकीय सत्ता ही आज आर्थिक सत्ता किंवा इतर तत्सम सत्तांशीं निगडित झाली आहे. किंबहुना धर्म, तत्त्वज्ञान किंवा सौंदर्यशास्त्र यांतील मूल्यांचादेखील राजकीय सत्तेशीं संबंध जोडला जातो आहे. तेव्हां समाजाचें आरोग्य टिकविण्यांचें कार्य जसें मुख्यतः डॉक्टर लोकांना करावें लागतें तशासारखेंच काम सत्ताधारी किंवा सत्ताकांक्षी लोकांच्याकडून अपेक्षित आहे. त्यामुळें समाजोपयोगी काम करणारा असा हा एक राजकारणी लोकांचा " गट " आहे असें मानणें नुसतें शक्यच नाहीं, तर आवश्यकहि आहे. ही कल्पना मान्य केली नाहीं तर मग राजकीय नेते हे नुसते चळवळे लोक आहेत, किंवा एखाद्या परकीय विरोधी देशांचे हस्तक आहेत असें मानावें लागतें. (सुशिक्षितांपैकीं वैफल्याच्या आहारीं गेलेला एक मोठा वर्ग आज अशा प्रकारची अज्ञानमूलक कल्पना स्वीकारायला तयार होतो, ही खेदजनक गोष्ट आहे. राजकीय जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन निकडीनें बदलणें किती आवश्यक आहे हें यावरून दिसून येतें.)

(४) राजकीय पक्षांच्या नेत्यांचा एक " व्यावसायिक गट " आहे ही कल्पना कामचलाऊ गृहीत कृत्य म्हणून मान्य झाली कीं मग त्या गटाच्या व्यवहाराबद्दल जास्त खोलांत शिरणें उपयुक्त ठरेल. या गटाचा समतोल कसा राहतो, किंवा तो कसा भंगतो याच्या कारणांची चर्चा करायला हरकत नाहीं. या संदर्भांतच या गटाच्या अंतर्गत काम करणाऱ्या धारक शक्ति (Integrative Forces) जास्त समर्थ कशा कराव्यात यासाठीं आचार-संहिता सुचविली पाहिजे.

आपल्या समाजरचनेंतील इतर व्यावसायिक गटांपेक्षां राजकारणी लोकांच्या गटाचीं कांहीं अगदीं वेगळीं वैशिष्ट्यें येथें नमूद केलीं पाहिजेत. उदाहरणार्थ, डॉक्टर, इंजिनिअर, वकील इत्यादींच्याबाबत अमुक इतकें प्रावीण्य त्यांच्यांत असलें पाहिजे, व त्यांना मोबदलाहि अमुक इतका मिळाला पाहिजे, याबाबतचे कांहीं आडाखे समाजाला त्यांची असलेली उपयुक्तता व समाजाचा व्यवहार यांवरून ठरलेले आहेत. त्यांच्या कामाची

क्षेत्रें व अशिल-रोग्यांशीं वागण्याची पद्धति याहि मर्यादित व विशिष्ट प्रकारच्या आहेत. राजकारणी लोकांच्याबाबत मात्र व्यवसायपूर्व शैक्षणिक पात्रतेचें बंधन नाहीं, किंवा त्यांना मोबदला किती मिळावा याहिबद्दल कांहीं निश्चिति नाहीं. त्यांचा अशिलवर्ग म्हणजे सर्व समाजच होय, त्यांत लहान मुलेंसुद्धां आलीं. राजकारणी लोकांच्या व्यवसायाचें स्वरूप असें विकीर्ण असल्यामुळेंच ते इतर व्यावसायिकांच्या क्षेत्रावर आक्रमण करतांना दिसतात. प्रत्यक्षांतहि राजकारणी माणूस इतरांच्या क्षेत्रावर आक्रमण करतो; कारण ज्या सत्तेचा त्यानें वापर करायचा ती राजकीय सत्ता म्हणजे तरी समाजांतील परस्पर-संबंधांच्या संदर्भाचें योग्य प्रकारें चलन-वलन घडवून आणणें हेंच होय. (" A mobilization of the total relational context in a society. " —Parsons Talcott चें the Social System. पृ. १२६.)

स्वातंत्र्यपूर्व कालांत या देशांतील लोक व राजकीय नेतेहि राजकीय सत्तेपासून वंचित होते; किंबहुना राजकारणी मंडळींना तर अनेक वेळा आपलें व्यक्तिस्वातंत्र्यहि गमवावें लागलें. अशा परिस्थितींत येथील राजकीय नेतृत्वाची वाढ झाली. सत्तेपासून वंचित राहावें लागलें तरी जनतेनें मात्र त्यांना राजकीय व सामाजिक बाबतींतहि आपले नेते मानले. (भारतीय नेतृत्वाचें स्वरूप भारावून टाकणारें (Charismatic) आहे असें कांहीं समाजशास्त्रज्ञ कां म्हणतात त्याचा यावरून बोध होतो.)

राजकारणी मंडळींसाठीं आवश्यक असलेल्या आचार-संहितेचा विचार करतांना या गटाचीं हीं वैशिष्ट्यें लक्षांत ठेवलीं पाहिजेत, व त्यांची इतर व्यावसायिक गटांबरोबर अगदीं सही-सही तुलना करूं नये.

(५) आधुनिक समजांत राजकीय नेते हे विवक्षित प्रदेशांत काम करतात. पण प्रत्येक वेळच्या परिस्थितीला अंतर्गत व बाह्य अशीं दोन अंगें असतात. हीं अंगें प्रवाही व गतिमान असतात, त्यांचा एकमेकांवर परिणाम होत असतो. स्वातंत्र्यपूर्व काळांत भारतांतील राजकीय परिस्थितीचें बाह्य किंवा परकीय अंग म्हणजे ब्रिटिश राज्यकर्ते, ब्रिटनमधील पार्लमेंट व तेथील राजकीय पक्ष यांच्याशीं संबंध हा भाग होता. आडून

आडून आपल्या कांहीं राजकीय नेत्यांनीं साम्राज्यवादी राष्ट्रांशीं झुंजणाऱ्या समदुःखी राष्ट्रांशीं हातमिळवणी करण्याचा प्रयत्न चालविला होता; ब्रिटिशांना विरोधी असलेल्या देशांकडून मदत घेण्याचाहि प्रयत्न झाला. या संदर्भात, सन १९२० पूर्वीच्या काळांतील नेमस्त व जहालांच्या मधील वादाचें समीक्षण करणें उपयुक्त ठरेल. त्या वादांत जहालांचा विजय होण्याचें कारण म्हणजे पूर्वीच्या उदारमतवादी धोरणाऐवजीं ब्रिटिशांनीं हळूहळू आक्रमक व कडक साम्राज्यवादी धोरण अंगिकारलें होतें. "आडून आडून" चाललेल्या प्रयत्नांचें एक ठळक उदाहरण म्हणून नेताजी सुभाषचंद्र बोस यांनीं दुसऱ्या महायुद्धाच्या काळांत संघटित केलेल्या आझाद हिंद सेनेचा उल्लेख करतां येईल.

त्या काळांत राजकारणाची अंतर्गत बाजूहि तितकीच महत्त्वाची होती. सामाजिक सुधारणा, जातीयता, अस्पृश्यता हे अंतर्गत प्रश्न होते. त्यांचा आपल्या राजकारणाच्या बाह्यांगावर प्रत्यक्षपणें व प्रभावीपणें परिणाम होत होता. बाह्यांगावर होणाऱ्या या प्रतिक्रियेमुळें आपल्या राजकीय नेत्यांची समयज्ञता व कौशल्य पणाला लागलें होतें. अंतर्गत व बाह्य समस्या सोडविण्याच्या कार्यक्रमांची सांगड कशी घालावयाची हा एक मोठा पेंच होता. एकोणिसाव्या शतकाच्या शेवटच्या दशकांतसुद्धा ही सांगड नीटपणें घालतां आली नाहीं. (अर्थात् तो आपल्या राष्ट्रीय लढ्याचा प्रारंभकाळ होता.) टिळक व रानडे या त्या वेळच्या दोन महान् विभूतींनीं ही सांगड घालण्याच्या प्रश्नावर परस्परविरुद्ध भूमिका घेतल्या होत्या. एकमेकांशीं जास्तींत जास्त सहकार्य करण्याची दोघांचीहि तळमळ होती; तरी पण शेवटीं खटका उडालाच. कारण परिस्थितीच्या या दोन अंगांची सांगड घालणें अशक्य होतें, किंवा निदान त्या वेळच्या परिस्थितींत तें जमलें नाहीं.

(६) स्वातंत्र्योत्तर काळांत आपले राजकीय पक्ष व पुढारी आपल्या परिस्थितीचा सामग्र्यानें, म्हणजे अंतरंग व बाह्यांग, दोन्हींचा सारखाच विचार करतात. या दोन अंगांची कशी काय सांगड घातली जाते यावरच प्रत्येक पक्ष-उपपक्षाचें स्वरूप ठरतें आहे. उदाहरणार्थ, पं. नेहरूंची परराष्ट्र नीति कांहीं जणांना आवडते, तर कांहींना आवडत नाहीं. कांहीं जणांना ती सोव्हिएट रशियाबाबत जरा जास्त 'सौम्य' आहे असें वाटतें, तर

कांहींना ती पश्चिमी गटाकडे झुकलेली वाटते. त्यांच्या "समाजवादी" धोरणाचीहि तीच स्थिति आहे. म्हणून पक्षापक्षांतील, किंबहुना पक्षांतर्गत गटांतील दुरावा किती तीव्र आहे हें नीट पाहिलें पाहिजे. जर हा दुरावा खूपच तीव्र असेल तर मग आचार-संहितेची चर्चा करण्यांत तथ्य नाहीं. तिचें भाकित ठरल्यासारखेंच आहे, किंवा फार तर तिच्यामुळें जुजबी मलमपट्टी केल्यासारखें होईल. लोकशाही संस्थांचा विकास व आचार-विचारांच्या संवयींत त्या दृष्टीनें आवश्यक असलेला बदल या गोष्टी मृग-जळवत् ठरतील. एखादा लोकशाहीविरोधी साहसी गट सर्व सत्ता हातीं घेऊन हा सर्व विकास सहज खुंटवूं शकेल. आशियांतील अनेक देशांच्या उदाहरणांमुळें अशा लष्करी कारस्थानाची शक्यता आपल्याकडेहि वाढूं लागली आहे.

(७) आचार-संहितेबाबतची चर्चा शहाणपणाची व आशादायक व्हायची असेल तर ती करण्यासाठीं जमलेल्यांची निष्ठा असली पाहिजे कीं अशा प्रकारचें लष्करी कारस्थान येथें होणार नाहीं व झालें तर तें आम्ही मोडून काढूं. आचार-संहितेची चर्चा करण्यासाठीं जमलेल्या सर्व पक्षांच्या मनांत अशा प्रकारचा संयुक्त निर्धार वसतो आहे असें गृहीत धरून पुढील दोन-तीन मुद्यांबाबत चर्चा करायला हरकत नाहीं—

(१) शासनसंस्थेचीं अंगोपांगें व राजकीय पक्ष यांचे संबंध. (शासन-संस्थेच्या दंडसत्तेचा किंवा निधीचा उपयोग.)

(२) लोकायत्त संस्था (उदा. ग्रामपंचायती, नगरपालिका, मजूर-संघटना इ.) व राजकीय पक्ष यांचे संबंध.

(३) परकीय सत्ता व राजकीय पक्ष यांचे संबंध.

पक्षापक्षांत किंवा पक्षांतर्गत गटांत ध्येयवादविषयक वा संघटनात्मक वाद निर्माण होतात. त्या वेळीं जे प्रश्न चर्चिले जातात, ते वरीलपैकीं कोणत्या तरी वर्गांत पडतात.

तेव्हां यांपैकीं प्रत्येक बाबतींत सर्व पक्षांना संमत होईल अशी भूमिका स्पष्टपणें मांडणें हा मुख्य प्रश्न आहे. उदाहरणार्थ, 'परकीय सत्ता व राजकीय पक्ष' यांच्याबाबत असें म्हणतां येईल कीं, भारतांतील कोणत्याहि पक्षानें परकीय सत्तेशीं वा संघटनेशीं संबंध ठेवूं नये. इथें "संबंध"चा

रोख प्रत्यक्ष मदतीवर असला पाहिजे; मात्र विचारांची देवाण-घेवाण किंवा कांहीं कल्पनांबाबत सहकार्य यांचा त्यांत अंतर्भाव होऊं नये. या दोन्हींतील सीमा रेषा अतिशय धूसर व अस्थिर आहे; पण म्हणूनच ही सीमा-रेषा ठरविण्यासाठीं सगळ्यांनीं मिळून प्रयत्न करणें जास्त आवश्यक आहे. प्रत्येक पक्षानें आपापल्या कल्पनेप्रमाणें ती ठरवायचें म्हटलें म्हणजे जो तो आपापल्या सोयीप्रमाणें ती रेषा ठरवील आणि दुटप्पी धोरण स्वीकारील.

याप्रमाणें इतरहि बाबतींत सीमारेषेचा प्रश्न येणार आहे. उदाहरणार्थ सरकारी चिन्ह व सरकारी निधि यांचा उपयोग कोणत्याहि पक्षानें करूं नये हा नियम सर्वमान्य होईल. पण जेव्हां सत्ताधारी पक्षाची प्रतिष्ठा वा सत्ता वाढविण्यासाठीं पोलीस दल किंवा सरकारी निधि वापरण्याचा प्रश्न येतो, तेव्हां प्रत्येक पक्ष उपरोक्त सर्वसंमत नियमाचा बेदिक्कतपणें भंग करतो. तर उलट मजूरसंघटना वा तत्सम संघटना यांचा पक्षीय स्वार्थासाठीं उपयोग करूं नये किंवा हितसंबंधी मंडळींकडून मदत घेऊं नये. हे सर्वसंमत नियमहि विरोधी पक्ष व क्वचित् सत्ताधरी पक्ष धाब्यावर बसवितात. आशा एवढीच आहे की या सर्व बाबतींत कांहीं सर्वसंमत संकेत असावेत असें सर्वांना वाटतें आहे. आणि जेव्हां एखाद्या पक्षाचें त्याविरुद्ध वर्तन घडतें तेव्हां लज्जित मुद्रेनें परिस्थितीची अपरिहार्यता म्हणून त्याचें समर्थन केलें जातें. जेव्हां कोणी सत्याग्रह करतो (आपल्या राष्ट्रीय लढ्यांत त्याचा वापर केला गेल्यानें त्याला एक प्रकारची प्रतिष्ठा प्राप्त झाली आहे) तेव्हां त्यालाहि असेंच सांगावें लागतें की तडजोडीचे सर्व प्रयत्न फसल्यामुळें सत्याग्रह करणें " भाग पडतें " आहे.

(८) सारांशरूपानें असें म्हणतां येईल कीं आचार-संहिता तयार करण्यासाठीं—(१) वरील तीनपैकीं प्रत्येकाबाबत सर्वसंमत भूमिका कोणती तें ठरविलें पाहिजे, व (२) ही भूमिका स्थिर करण्यासाठीं व दररोजच्या पक्षीय राजकारणांत टिकविण्यासाठीं एखादी व्यावहारिक संघटना उभारण्याचा विचार केला पाहिजे. तरच त्या आचार-संहितेला योग्य तें तात्त्विक अधिष्ठान मिळून शिवाय तिचें व्हावहारिक मूल्यहि टिकेल, आणि त्यामुळें येथें लोकशाही जीवन व परंपरा यांचा निरोगी विकास होईल व पर्यायानें राजकीय पक्षांचीहि निकोप वाढ होईल.

———

लोकशाही व्यवहाराची आचार-संहिता

सर्व-सेवा-संघाचा ठराव

आचार्य विनोबाजींच्या समवेत सर्व-सेवा-संघाची ता. २५ सप्टेंबर १९५९ रोजीं पठाणकोट येथें बैठक झाली. त्या वेळीं स्वीकारलेलें निवेदन.

अखिल भारत सर्व-सेवा-संघ

(प्रधान केंद्र)

लोकशाहींतील आचार-संहिता

देशांतील वाढत्या हिंसक आणि अत्याचारी प्रवृत्तींबाबत इतरांप्रमाणेंच सर्व-सेवासंघालाहि चिंता वाटत आहे. मानवी समाजांतील हिंसक प्रवृत्तींचा प्रश्न हा मुख्यतः या प्रवृत्तींचीं मूल कारणें, भूदान, ग्रामदानासारख्या चळवळींच्या द्वारें नाहींशी करूनच सोडविला पाहिजे, असा जरी संघाचा विश्वास असला तरी त्याचबरोबर सामाजिक अस्थिरतेच्या तात्कालिक कारणांबाबतहि उपाययोजना करण्याचा प्रयत्न केला पाहिजे असें संघास वाटतें.

आजच्या अस्थिर परिस्थितीचीं अनेक कारणें आहेत. परंतु राजकीय पक्षांतील संघर्ष, पक्षीय तेढ आणि वितुष्ट यांचाहि ही परीस्थिति निर्माण करण्यांत कांहीं लहान-सहान भाग नाहीं, हें सर्वमान्य होईल अशी संघाला आशा वाटते.

सध्यांच्या अस्थिर परिस्थितीवर उपाय म्हणून विनोबाजींच्या प्रेरणेनें आणि सल्ल्यानें संघानें देशापुढें शांति-सेना आणि सर्वोदय-पात्राचा दुहेरी कार्यक्रम ठेवला आहे. परंतु पक्षीय संघर्षांतून निर्माण होणारीं कलह-किल्मिषें दूर करण्यासाठीं राजकीय पक्षांनीं एकमेकांशीं वागण्याबाबत कांहीं किमान आचार-संहिता स्वीकारण्याचें ठरविलें तर त्यामुळें परिस्थिति सुधारण्यास बरेंच साहाय्य होईल असें संघास तीव्रतेनें वाटतें.

या संदर्भात संघास असें वाटतें कीं किमान खालील मुद्यांवर तरी राजकीय पक्षांचें एकमत झालें पाहिजे :—

(१) राजकीय पक्ष त्यांचीं उद्दिष्टें साध्य करण्यासाठीं अत्याचारी तंत्रें अवलंबणार नाहींत.

(२) पक्षांतील एखाद्या व्यक्तीनें अगर गटानें अत्याचारी मार्गाचा अवलंब केला तर संबंधित पक्ष या कृत्यांचा जाहीरपणें निषेध करील व आपल्या सभासदांना योग्य वळण लावण्याचा प्रयत्न करील.

(३) जनतेनें केलेल्या चळवळींच्या बाबतींत पोलिस वा मिलिटरी यांच्याकडून गोळीबार होऊं नये म्हणून सरकार जरूर ते सर्व प्रयत्न करील. जर एखाद्या प्रसंगीं गोळीबार करावाच लागला तर न्यायालयीन चौकशी नेहमींचा शिरस्ता म्हणूनच व्हावी.

(४) राजकीय पक्ष ग्रामपंचायतींच्या निवडणुकांसाठीं आपले उमेदवार उभे करणार नाहींत आणि आपल्या सभासदांना वैयक्तिक अगर पक्षीय कारणांसाठीं या निवडणुकींचा उपयोग करण्यापासून परावृत्त करतील.

(५) राजकीय पक्ष शैक्षणिक संस्थांचा आपलीं राजकीय उद्दिष्टें साध्य करण्यासाठीं वापर करणार नाहींत.

(६) राजकीय पक्ष विद्यार्थ्यांचा आंदोलनासाठीं वा पक्षीय हेतूंसाठीं उपयोग करून घेणार नाहींत. अथवा पक्षीय संस्था काढून विद्यार्थी-समाजांत विभक्तता निर्माण करणार नाहींत.

(७) अलिकडील कांहीं राजकीय घटना बघतां, जनता–आंदोलनांचे प्रकार आणि पद्धति यांच्या लोकशाही तत्त्वांना अनुलक्षून मर्यादा कोणत्या, याबाबतींतहि पक्षांनीं एक विचार ठरविला पाहिजे असें वाटतें.

———

भाटघर-परिसंवादाचा संक्षिप्त वृत्तान्त व सर्वसंमत निवेदन

गोखले अर्थशास्त्र संस्था, पुणें, व समाज प्रबोधन संस्था, पुणें.

वरील दोन संस्थांतर्फे **" राजकीय पक्षांसाठीं आचार-संहिता "** या विषयावर भाटघर (जि. पुणें) येथें ता. २३ व २४ मे १९६१ रोजीं परिसंवाद झाला.

परिसंवादाचें अध्यक्षस्थान श्री. ध. रा. गाडगीळ यांनीं स्वीकारलें होतें.

१. उपस्थित व्यक्ति:—

१. श्री. ध. रा. गाडगीळ, २. श्री. शंकरराव देव, ३. श्री. यशवंतराव चव्हाण (काँग्रेस), ४. श्री. स्वामी रामानंद तीर्थ (काँग्रेस) ५. श्री. लक्ष्मणशास्त्री जोशी (काँग्रेस), ६. श्री. शंकरराव मोरे (काँग्रेस), ७. श्री. एस्. एम्. जोशी (प्र. स. पक्ष), ८. श्री. राम जोशी (प्र. स. पक्ष), ९. श्री. दत्ता ताम्हणे (प्र. स. पक्ष), १०. श्री. एस्. ए. डांगे (कम्युनिस्ट), ११. श्री. श्रीनिवास सरदेसाई (कम्युनिस्ट), १२. श्री. ए. बी. पटवर्धन (कम्युनिस्ट), १३. श्री. बी. सी. कांबळे (रिपब्लिकन), १४. श्री. शंकरराव खरात (रिपब्लिकन), १५. श्री. उत्तमराव पाटील (जनसंघ), १६. श्री. मधु लिमये (समाजवादी पक्ष), १७. प्रा. अ. भि. शहा (मुंबई), १८. प्रा. र. वि. रानडे (नागपूर), १९. प्रा. गं. बा. सरदार (पुणें), २०. प्रा. दे. आ. दाभोळकर (सांगली), २१. डॉ. म. अ. चान्सरकर (नागपूर), २२. डॉ. ना. र. देशपांडे (नागपूर), २३. प्रा. व. मं. सिरसीकर (पुणें), २४. प्रा. अ. के. भागवत (कोल्हापूर), २५. श्री. दि. के. बेडेकर (पुणें), २६. डॉ. के. एम्. मुखर्जी (पुणें), २७. श्री. पन्नालाल सुराणा (स. प्र. संस्था, पुणें).

२. १. श्री. ना. ग. गोरे, २. श्री. उद्धवराव पाटील, ३. श्री. दादासाहेब गायकवाड, ४. श्री. ए. जी. पवार, ५. श्री. राजाभाऊ

खोब्रागडे, ६. श्री. गोपाळराव खेडकर, ७. श्री. वि. घ. देशपांडे, ८. श्री. ग. त्र्यं. माडखोलकर, ९. श्री. अनंतराव भालेराव, १०. श्री. राजारामबापू पाटील, ११. प्रा. गोवर्धन पाटील (मुंबई) या व्यक्तींनीं निमंत्रण स्वीकारलें होतें. पण आयत्या वेळीं कांहीं अडचणी निघाल्यानें ते येऊं शकले नाहींत. त्यांना भाटघरचें सर्वसंमत निवेदन पाठविलें होतें. तें निवेदन सर्वांना मान्य आहे. कांही जणांनीं आचार-संहितेबाबत व विशेषतः तिच्या अंमलबजावणीबाबत कांहीं सूचना केल्या आहेत.

तसेंच श्री. दत्ता देशमुख यांनाहि निमंत्रण दिलें होतें. पण त्यांनीं तें नाकारलें होतें.

३. ता. २३ व २४ ह्या दोन दिवसांत एकूण सुमारें अकरा तास चर्चा झाली. **चर्चेसाठीं पुढील विषय घेण्यांत आले होते—**

(१) राजकीय पक्षांसाठीं आचार-संहिता असावी काय, तिचें स्वरूप, मर्यादा इत्यादि.

(२) स्थानिक स्वराज्य संस्थांबाबत पक्षांचा व्यवहार.

(३) निवडणुकींबाबत पक्षांचा व्यवहार.

ता. २३ ला सुरुवातीला आचार-संहिता असावी काय, या विषयावर चर्चा झाल्यानंतर असें दिसून आलें कीं आचार-संहिता स्वीकारण्याबाबत सर्व राजकीय पक्षांच्या उपस्थित नेत्यांची तयारी आहे. मुख्य मुद्यावर एकमत झाल्यानंतर आचार-संहितेच्या तपशिलाबाबत विचारविनिमय झाला. सर्वांना संमत असलेल्या बाबींचाच आचार-संहितेंत समावेश करण्यांत यावा असें ठरलें.

४. त्याप्रमाणें एक सर्वसंमत निवेदन तयार करण्यांत आलें असून तें प्रसिद्धीस देण्यांत यावें असें ठरलें. महाराष्ट्राच्या दैनंदिन राजकारणांत या आचार-संहितेचा भंग होणार नाहीं, असा प्रयत्न करण्याचें आश्वासन उपस्थित असलेल्या सर्व राजकीय नेत्यांनीं दिलें आहे.

५. सर्वसंमत निवेदन पुढीलप्रमाणें आहे:—

भारताच्या राज्यघटनेंत ग्रथित करण्यांत आलेलीं ध्येयें व मार्गदर्शक तत्त्वें येथें जमलेल्या सर्वांना मान्य आहेत. या ध्येयांचें व तत्त्वांचें प्रत्यक्ष

व्यावहारिक स्वरूप काय असावें, याबाबत राजकीय पक्षांत एकवाक्यता नाहीं. परंतु हीं ध्येयें व तत्त्वें व्यवहारांत उतरविण्यासाठीं जें सामाजिक परिवर्तन घडवून आणावयाचें तें लोकशाहीच्या व शांततेच्या मार्गानेंच घडविलें पाहिजे हें सर्वांना मान्य आहे. म्हणून लोकशाही राज्य-पद्धति दृढमूल करण्यासाठीं व सार्वजनिक जीवनाचा प्रवाह विशुद्ध करण्यासाठीं राजकीय पक्षांनीं एक आचार-संहिता मान्य करावी असें आम्हांस वाटतें, व त्या दृष्टीनें आम्ही पुढील संकेत मान्य करीत आहोंत :

(१) राजकीय प्रचाराच्या ओघांत दुसऱ्या पक्षावर टीका करावयाची झाल्यास त्यांचीं धोरणें व कार्यक्रम एवढ्यांचा प्रामुख्यानें विचार करावा. तसेंच दुसऱ्या पक्षाच्या नेत्यांवर वा कार्यकर्त्यांवर टीका करतांना सार्वजनिक जीवनाशीं संबंध नसलेल्या त्यांच्या खाजगी चारित्र्यावर टीका करूं नये. तसेंच विरोधी पक्षांवर वा त्यांच्या कार्यकर्त्यांवर असत्य वा विपर्यस्त टीका करूं नये.

(२) ज्या योगें जातीजातींत व धर्माधर्मांत द्वेष उत्पन्न होईल किंवा त्यांच्यामधील तेढ वाढेल असें कांहींहि करूं नये.

(३) राजकीय पक्षांनीं अन्य पक्षांच्या सभा, मिरवणुका इत्यादि कार्यक्रमांत व्यत्यय आणूं नये अगर ते उधळून लावूं नयेत.

(४) कायदा व सुव्यवस्था टिकविण्यासाठीं उपाययोजना करतांना सत्ताधारी पक्षानें नागरिक हक्क अबाधित राखण्याची दक्षता बाळगावी व इतर पक्षांचे कार्यकर्ते अगर इतर पक्षांच्या हालचाली यांचा कोंडमारा होईल असे उपाय योजूं नयेत.

(५) कोणत्याहि स्तरावरील राजकीय सत्तेचा वापर आपल्या पक्षीयांच्या स्वार्थासाठीं किंवा इतर पक्षीयांचे हितसंबंध दुखविण्यासाठीं करूं नये.

(६) सहकारी संस्थांत सत्ताधारी वा प्रभावी असलेल्या पक्षांनीं त्या संस्थांतील आपल्या सत्तेचा वापर आपल्या पक्षीयांच्या स्वार्था-साठीं करूं नये व अन्य पक्षांच्या सभासदांबाबत पक्षपात करूं नये.

(७) या राज्यांतील सत्तारूढ पक्षानें स्वपक्षीयांच्या हातीं असणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्था व इतर पक्षीयांच्या हातीं असलेल्या अशा संस्था यांत सर्व बाबतींत, उदाहरणार्थ; अनुदानें देणें, योजनांना मंजुरी देणें त्या बरखास्त करणें इत्यादि, समान वागणूक द्यावी. तसेंच राज्य–सरकारशीं योग्य सहकार्य करण्याची जबाबदारी सर्वच स्थानिक स्वराज्य संस्थांवर आहे.

(८) स्थानिक स्वराज्य संस्थांचा कारभार चालविणाऱ्या कार्यकारी व इतर समित्यांत सर्व पक्षांना त्यांच्या प्रतिनिधींच्या संख्येच्या प्रमाणांत जागा द्याव्यात.

(९) स्थानिक स्वराज्य संस्थांची प्राथमिक जबाबदारी स्वतःच्या क्षेत्रांतील कारभार कार्यक्षमतेनें चालविण्याची आहे, हें ओळखून कोणत्याहि प्रश्नाबद्दल चर्चा करण्याचा त्यांना अधिकार असला तरी त्याबाबत तारतम्य बाळगावें; विशेषतः तांतडीचीं कामें वेळेवर होतील याविषयीं दक्षता द्यावी.

(१०) एका पक्षानें तिकिट नाकारलेल्या व्यक्तीस दुसऱ्या पक्षाने त्याच निवडणुकींत आपलें तिकिट देऊं नये.

(११) सन १९६२ च्या निवडणुकींनंतर एका पक्षाच्या तिकिटावर निवडून आलेल्या व्यक्तीस आपल्या जागेचा राजीनामा दिल्याशिवाय दुसऱ्या पक्षानें आपल्यांत प्रवेश देऊं नये.

६. या परिसंवादामध्यें वर्गीकृत जमातींच्या राखीव जागांबाबत चर्चा झाली आणि भारत सरकारच्या संबंधित खात्याकडे व निवडणूक-मंडळाकडे पुढील निवेदन करावें असें ठरलें:—

> महाराष्ट्रांत वर्गीकृत जमातींपैकीं अनेकांनीं १९५१ च्या शिरगणतीनंतर बौद्ध धर्माचा स्वीकार केल्यामुळें त्या शिरगणतींत नोंदलेली वर्गीकृतांची संख्या राखीव जागांबबत निश्चिति करण्यास उपयुक्त नाहीं. तरी याबाबत योग्य चौकशी करून राखीव जागांची संख्या कमी करण्यांत यावी.

७. या परिसंवादांत राजकीय चळवळींतील हिंसाचार, आणि गोळीबाराच्या साधनांचा वापर व नागरिक स्वातंत्र्य इत्यादि गोष्टींबद्दल पुष्कळ चर्चा झाली. परंतु या बाबतींत सर्वसंमत निर्णय घेण्यासाठीं या विषयाचा सांगोपांग विचार एका स्वतंत्र परिसंवादांत व्हावा असें ठरलें. गोखले अर्थशास्त्र संस्था व समाज प्रबोधन संस्था यांनीं तसा परिसंवाद येत्या नोव्हेंबर महिन्यांत पुण्यांत भराविण्याचें ठरवून त्याप्रमाणें सर्वांना निमंत्रण दिलें व सर्वांनीं तें स्वीकारलें आहे.

कांहीं प्रतिक्रिया

भाटघर-परिसंवाद घडवून आणल्याबद्दल अभिनंदन करणारीं अनेक पत्रें निमंत्रक संस्थांकडे आलीं. वृत्तपत्रें व इतर संघटनांनींहि या परिसंवादाचें स्वागत केलें. मुंबई, नागपूर, पुणें वगैरे ठिकाणच्या सर्व प्रमुख मराठी दैनिकांनीं व कांहीं इंग्रजी वृत्तपत्रांनीं त्यावर अग्रलेख लिहिले. ते सर्वच संकलित करणें जमलें नाहीं. विशेषतः मुंबईच्या कांहीं दैनिकांचे अंक उपलब्ध झाले नाहींत.

कांहीं पत्रें व कांहीं अग्रलेखांतील उतारे खालीं देत आहोंत.

'केसरी' २३ मे १९६२

"आजच्या विविध राजकीय विचारप्रणालींतील एका लोकसत्तावादांत काय ती 'सर्जनशील' अशा जीवनमूल्यांच्या रक्षणाची कांही ताकद आहे पण तीहि औद्योगिक क्रांतीच्या प्रभावानें निर्माण होणाऱ्या अंतर्विरोधांत किती टिकेल याची शंका वाटते! राजकीय क्षेत्रापुरती आचार-संहिता निर्माण करून तिचा वापर करण्याचा थोडासा जरी प्रामाणिक प्रयत्न सर्व पक्षांनीं केला तरी तें एक पाऊलहि आजच्या घसरत्या गाड्यास कांहीशी खीळ घालण्यास उपयोगी पडेल. तेव्हां ही 'आचार-संहिता' केवळ एक सुसंवाद किंवा ऐतिहासिक कागद ठरूं नये! भाटघरला जन्म पावून भाटघरच्याच धरणांत या संहितेला जलसमाधि मिळूं नये, तर ही गाथा तरावी व ती साऱ्या राजकीय कार्यकर्त्यांनीं मस्तकीं धरून तिचा आदर करावा!"

◎ ◎

'टाईम्स ऑफ इंडिया,' मुंबई.

२७ मे १९६१. (अग्रलेखाचा गोषवारा)

'मद्रास व केरळ राज्यांत राजकीय आचार-संहिता बनविण्याचे प्रयत्न यापूर्वी झाले असले तरी त्यांना सर्वव्यापक स्वरूप नव्हतें. म्हणून महाराष्ट्रांतील दोन अपक्ष सार्वजनिक संस्थांनीं याबाबत जो भाटघर परिसंवाद

अनुक्रमांक 32607 दि: निवेदन
(७१) क्रमांक ...936... नों: दि: 8/9/61

घडवून आणला तो विशेष उत्तेजक व उल्लेखनीय आहे. आजकाल संधि-साधूपणा अतिशय बोकाळला आहे. कायदे-मंडळाचे सभासद बिनदिक्कतपणें पक्ष बदलत असतात. याबाबत भाटघर संहितेंतील संकेत महत्त्वाचा आहे, पण हा नियम प्रामाणिकपणें कसा पाळला जाईल हा प्रश्न महत्त्वाचा आहे. महाराष्ट्र काँग्रेसनें याबाबत पुढाकार घेऊन योग्य तो पायंडा पाडला पाहिजे. गेल्या कांहीं महिन्यांत अनेक जण काँग्रेसमध्यें भरती झाले आहेत. येत्या निवडणुकींत तिकिट मिळविण्याचा त्यांचा उद्देश स्पष्ट आहे. तेव्हां महाराष्ट्र काँग्रेसनें खंबीर भूमिका घेऊन निदान या निवडणुकींत तरी त्या मंडळींना तिकिट देऊं नये. आचार-संहितेंतील वैयक्तिक चिखलफेंकीबाबतचा नियमहि महत्त्वाचा आहे.'

◎ ◎

'फ्री प्रेस' मुंबई,

दि. १ जून १९६१ (अग्रलेखाचा गोषवारा)

"भाटघर-परिसंवाद उपयुक्त होता हें मान्य केलें पाहिजे. पण केवळ परिसंवाद भरवून व सुबकशी आचार-संहिता तयार करून प्रश्न सुटणार नाहीं. ती कितपत पाळली जाईल, हा खरा महत्त्वाचा प्रश्न आहे. ती जबाबदारी ज्या त्या पक्षाचीच आहे. त्यामुळें आचार-संहितेचा भंग होणार नाहीं अशी खात्री देतां येत नाहीं. शेवटीं एवढेंच म्हणतां येईल कीं, प्रत्येकानें पुरेसा संयम दाखविणें हीच आचार-संहिता पाळली जाण्याची खरी हमी होय."

◎ ◎

'हिंदुस्थान स्टँडर्ड' नवी दिल्ली,

४-६-६१ (अग्रलेखाचा गोषवारा)

"भाटघर येथें जी आचार-संहिता मंजूर करण्यांत आली त्यांत दोन महत्त्वाच्या मुद्द्यांबाबत कांहीं निर्णय झालेला नाहीं असें दिसतें. ते म्हणजे (१) जनतेचीं गाऱ्हाणीं व्यक्त करीत असतांना हिंसाचार न करणें वा तसें करण्याला प्रोत्साहन न देणें. (२) पोलिसांनीं प्राणहानि होईल अशा

प्रकारचा गोळीबार करूं नये. त्यामुळें ह्या संहितेचें मूल्य खूपच कमी ठरतें. दुसरें म्हणजे या परिसंवादाला फक्त प्रादेशिक पक्षपुढारी उपस्थित होते. आपले बहुतेक पक्ष अखिल भारतीय असल्यानें जोंपर्यंत राष्ट्रीय पातळीवर आचार-संहिता ठरत नाहीं तोंपर्यंत प्रादेशिक आचार-संहितांनीं राजकारण कितपत सुधारूं शकेल याबाबत शंका वाटते. जी आचार-संहिता ठरली तिचें तरी कितपत पालन होईल याबद्दल शंका आहे. सगळ्यांत जुना असलेला व स्वातंत्र्यपूर्वकालीन उज्ज्वल परंपरा पाठीशीं असलेला कॉंग्रेस पक्षदेखील आपली नैतिक पातळी टिकवूं शकलेला नाहीं. अर्थात् आजपर्यंत तें जमलें नसलें तरी यापुढें सर्वच पक्षांनीं आपापलें वर्तन सुधारण्याचा प्रयत्न अवश्य केला पाहिजे. त्यासाठीं त्यांनीं आपलें कार्यक्षेत्र संसदीय क्षेत्रापुरतें मर्यादित ठेवण्याचा निर्णय घेतला पाहिजे. ''

◎ ◎

'' भाटघर येथील आचार-संहितेसंबंधीं झालेल्या सर्वपक्षीय अधिवेशनाचा परिणाम गुजराथच्या राजकीय जीवनावर झाल्याचें स्पष्ट चिन्ह दिसत आहे. गुजरात प्रजासमाजवादी पक्षाचे सरचिटणीस श्री. सनत मेहता ह्यांनीं एक निवेदन प्रसिद्ध करून गुजराथचे मुख्यमंत्री श्री. जीवराज मेहता यांना भावी निवडणुकीसाठीं सर्व पक्षांसाठीं '' आचार-संहिता '' तयार करण्यासाठीं एक परिषद् बोलविण्याची विनंति केली आहे. सरकारतर्फे अशी परिषद् बोलविण्यांत आली नाहीं तर गुजराथ प्रजासमाजवादी पक्षानें ह्याबाबत पुढाकार घेण्याची तयारी दर्शविली आहे. ह्यासंबंधीं श्री. सनत मेहता यांनीं डॉ. जीवराज मेहता यांची समक्ष भेट घेऊन त्यांच्याशीं ह्या प्रश्नाबाबत बोलणीं केलीं होतीं. महाराष्ट्राच्या राजकीय चळवळींचा गुजराथवर कसा परिणाम होतो हें ह्यावरून लक्षांत येईल. येथील गुजराथी दैनिक '' लोकसत्ता '' नें तर भाटघर परिषदेवर एक अग्रलेख लिहून अशा प्रकारची चळवळ गुजराथमध्येंसुद्धां करण्यांत यावी, अशी सूचना केली आहे.''

'**लोकमित्र**'—मुंबई.
दि. ७ जून १९६१
'गुजराथचें बातमीपत्र'मधून

◎ ◎

प्रिय डॉ. गाडगीळ,

राजकीय व्यवहाराबाबत सर्वसंमत आचार-संहिता बनविण्याच्या उद्देशानें महाराष्ट्रांतील राजकीय पक्षांच्या नेत्यांना एकत्र जमविण्याच्या आपल्या प्रयत्नांबद्दलचा वृत्तपत्रांतील वृत्तान्त वाचला. आपला उपक्रम फार चांगला वाटला. भाटघर परिसंवादाचा सविस्तर वृत्तान्त पाठवावा, अशी विनंति. या भागांतल्या राजकीय नेत्यांना आपल्या प्रयत्नांची योग्य प्रकारें माहिती करून देण्याचा मी प्रयत्न करीन.....या समयोचित उपक्रमाबद्दल आपलें हार्दिक अभिनंदन !

आपला,

कलकत्ता,
ता. ९।६।६१

के. के. सिन्हा
डायरेक्टर, इन्स्टिट्यूट ऑफ पोलिटिकल ॲण्ड सोशल स्टडीज्.

◎ ◎

उत्तर प्रदेश विधानसभेचे स्पीकर श्री. ए. जी. खेर यांचें निवेदन (१६ - ६ - ६१).

" पुणें जिल्ह्यांतील भाटघर येथें मे महिन्यांतील शेवटच्या आठवड्यांत एक अतिशय उपयुक्त व महत्त्वपूर्ण परिसंवाद घडवून आणल्याबद्दल गोखले अर्थशास्त्र संस्था व समाज प्रबोधन संस्था यांचें हार्दिक अभिनंदन केलें पाहिजे. माझी अशी इच्छा आहे कीं, निवडणुकींच्या वेळीं व अन्य वेळींहि आपला राजकीय प्रचार व व्यवहार यांबाबत सर्व पक्षांनीं पाळावेत असे संकेत ठरविण्यासाठीं भारतीय पातळीवर एक परिसंवाद शक्य तितक्या लवकर घेण्यांत यावा. अशा प्रकारच्या आचार-संहितेची किती निकड आहे, हें मी नव्यानें सांगण्याची गरज नाहीं. आपली संसदीय लोकशाही ही इंग्लडचें उदाहरण डोळ्यांसमोर ठेवून बनविण्यांत आलेली आहे. इंग्लिश लोकांना प्रिय असलेल्या लोकशाहीची उभारणी कोणत्या पायाभूत व उपकारक संकेतांवर झालेली आहे, हें आपल्या राजकीय पक्षांना माहीत आहेच. सध्यांच आपण जातिभेद, धार्मिक वैमनस्य इत्यादींमुळें त्रस्त आहोंत. अलीकडे त्यांत भाषावाद व प्रांतवादाची भर

पडली आहे. शैक्षणिकदृष्ट्या आपले लोक मागासलेले आहेत. जात, संप्रदाय, मागासलेपण, भाषा इत्यादि मुद्यांवर केल्या जाणाऱ्या भ्रममूलक आवाहनांनीं जनतेची दिशाभूल करणें फार सोपें आहे. असें असूनहि परंपरागत चालत आलेली आपली सहिष्णुवृत्ति व विविधतेंतहि एकता पाहण्याची धडपड यामुळें आपण आपलें राष्ट्र-ऐक्य थोडें तरी टिकवूं शकलों आहोंत. सत्य व अहिंसा या तत्त्वांच्या राष्ट्रपित्यानें दिलेल्या शिकवणुकीचें बळ आपल्या पाठीशीं उभें आहे. विनोबांनीं चालविलेल्या सामाजिक सुधारणेच्या व शुद्धीकरणाच्या देशव्यापी चळवळीमुळेंहि वातावरण कमींतकमी विषारी ठेवण्यास मदत होत आहे. महात्मा गांधी व आचार्य विनोबा यांच्याबद्दल सर्वच पक्षांना आदर असल्यामुळें आचार-संहितेबाबत त्यांचें एकमत होणें सुलभ आहे. जर आपले पक्ष वेळींच जागृत झाले आणि सुस्थिर लोकशाही जीवन टिकविण्यासाठीं आवश्यक असलेली आचार-संहिता बनवून तिचा अंमल करूं लागले तर आपल्या समोर उभ्या असलेल्या सर्व प्रश्नांना तोंड देऊन लोकशाही मार्गानेंच राष्ट्रीय ऐक्य व समाज-परिवर्तन घडवून आणण्यांत आपण यशस्वी होऊं शकूं, याबद्दल माझी खात्री आहे. ''

◎ ◎

(२१–८–६१)

'' नॅशनल हेरल्ड '', लखनौ

लखनौ, रविवार ता. २०।८।६१:—राजकीय पक्षांसाठीं आचार-संहिता बनविण्यासाठीं भरविण्यांत आलेल्या परिसंवादांत भाग घेतलेल्या सर्व राजकीय पक्षांनीं भारतीय राज्यघटनेचें ध्येय व मार्गदर्शक तत्त्वें यांवरील आपली निष्ठा प्रकट केली. या ध्येयांचें व तत्त्वांचें प्रत्यक्ष व्यावहारिक स्वरूप काय असावें याबाबत राजकीय पक्षांत एकवाक्यता नाहीं. पण ही ध्येयें व तत्त्वें व्यवहारांत उतरविण्यासाठीं जें सामाजिक (यांत आर्थिक व राजकीय आलें) परिवर्तन घडवून आणावयाचें तें लोकशाहीच्या व शांततेच्याच मार्गानेंच घडविलें पाहिजे हें सर्वांना मान्य आहे. म्हणून लोकशाही राज्यपद्धति दृढमूल करण्यासाठीं व सार्वजनिक जीवनाचा प्रवाह

विशुद्ध करण्यासाठीं राजकीय पक्षांनीं एक आचार-संहिता मान्य करावी असें आम्हांस वाटतें.

पुढीस संकेत सर्वसंमतीनें मंजूर झाले.

(१) राजकीय प्रचाराच्या ओघांत दुसऱ्या पक्षावर टीका करावयाची झाल्यास त्यांचीं धोरणें व कार्यक्रम एवढ्यांचा प्रामुख्यानें विचार करावा. तसेंच दुसऱ्या पक्षाच्या नेत्यांवर वा कार्यकर्त्यांवर टीका करतांना सार्वजनिक जीवनाशीं संबंध नसलेल्या त्यांच्या खाजगी चारित्र्यावर टीका करूं नये. तसेंच विरोधी पक्षांवर वा त्यांच्या कार्यकर्त्यांवर असत्य वा विपर्यस्त टीका करूं नये.

(२) ज्या योगें जातीजातींत व धर्माधर्मांत द्वेष उत्पन्न होईल किंवा त्यांच्यामधील तेढ वाढेल असें कांहींहि करूं नये.

(३) राजकीय पक्षांनीं अन्य पक्षांच्या सभा, मिरवणुका इत्यादि कार्यक्रमांत व्यत्यय आणूं नये अगर ते उधळून लावूं नयेत.

(४) कोणत्याहि स्तरावरील राजकीय सत्तेचा वापर आपले पक्षीयांच्या स्वार्थासाठीं किंवा इतर पक्षीयांचे हितसंबंध दुखविण्यासाठीं करूं नये.

(५) सहकारी संस्थांत सत्ताधारी वा प्रभावी असलेल्या पक्षांनीं त्या संस्थांतील आपल्या सत्तेचा वापर आपल्या पक्षीयांच्या स्वार्थासाठीं करूं नये व अन्य पक्षांच्या सभासदांबाबत पक्षपात करूं नये.

(६) या राज्यांतील सत्तारूढ पक्षानें स्वपक्षीयांच्या हातीं असणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्था व इतर पक्षीयांच्या हातीं असलेल्या अशा संस्थायांत सर्व बाबतींत, उदाहरणार्थ, अनुदानें देणें, योजनांना मंजुरी देणें, त्या बरखास्त करणें इत्यादि, समान वागणूक द्यावी. तसेंच राज्य-सरकारशीं योग्य सहकार्य करण्याची जबाबदारी सर्वच स्थानिक स्वराज्य संस्थांवर आहे.

(७) एका पक्षानें तिकिट नाकारलेल्या व्यक्तीस दुसऱ्या पक्षानें त्याच निवडणुकींत आपलें तिकिट देऊं नये.

या निवेदनावर खालील व्यक्तींनीं सह्या केल्या.

(१) श्री. त्रिलोकीसिंग (प्र. स. पक्ष)
(२) श्री. ए. पी. जैन (काँग्रेस.)
(३) श्री. पीतांबरदास (जनसंघ.)
(४) श्री. वासुदेवसिंग (समाजवादी.)
(५) श्री. कालिशंकर शुक्ल (कम्युनिस्ट.)
(६) श्री. वहिदूर रहमान (स्वतंत्र.)
(७) श्री. शंकरराव देव
(८) श्री. राजनारायण
(९) श्री. गुरुनारायण
(१०) श्री. सी. बी. गुप्ता (मुख्य मंत्री)
(११) श्री. बी. डी. बाजपाय.
(१२) श्री. ए. के. करण
(१३) श्री. खलिलुल रहमान.

परिसंवादाचें अध्यक्षस्थान श्री. ए. जी. खेर यांनीं स्वीकारलें होतें.

◎ ◎

" आमचे मतें हा विषय मुख्यतः आचारणाचा आहे. गेल्या ५० वर्षांचे इतिहास पाहतां नवे नियम करावयाचे आहेत असें नाहीं. पण ज्या अनिष्ट प्रथा आज सर्वांना परिचित आहेत, त्यांचा वापर प्रत्येकानें कटाक्षानें टाळावा व हीं सार्वजनिक पथ्यें पाळावीं हेंच उचित व यानेंच या पुढलें सार्वजनिक जीवन विशुद्ध व आल्हादकारक होईल, व नवसमाज-निर्मितीच्या पवित्र कार्यास उत्साह येईल. "

" कुलाबा समाचार "
(ठाणें पुरवणी–पेण)
ता. ७-६-६१

◎ ◎

' गोखले अर्थशास्त्र संस्था ' आणि ' समाज प्रबोधन संस्था ' यांनीं सर्व पक्षीय नेत्यांना एका बैठकीवर आणून या महत्त्वाच्या प्रश्नावर चर्चा घडवून आणली याबद्दल त्यांना आम्ही धन्यवाद देतों. कोणीतरी हा उपक्रम करणें आवश्यकच होतें. लोकशाही व्यवस्थेमध्यें, राजकारभार कोणाच्या हातीं असावा हें ठरविण्याचा जनतेला अधिकार असतो. त्यासाठीं देशांत निरनिराळे राजकीय पक्ष पुढें येतात. संसदीय लोकशाहीमध्यें तर अशा पक्षांची आवश्यकता असतेच. एक विशिष्ट विचार सरणी, धोरण आणि कार्यक्रम यांवर पक्षांची उभारणी केली जाते, आणि प्रत्येक पक्ष राज्यसत्ता हातीं यावी म्हणून प्रयत्न करीत असतो. त्यांत वावगें असें कांहींच नाहीं. कारण प्रत्येक पक्ष आपापल्या परीनें लोकांचें भलें व्हावें म्हणूनच झटत असतो, असें गृहीत धरून चाललें पाहिजे. या निरनिराळ्या पक्षांनीं परस्परांशीं कसें वागावें, निवडणुकीच्या वेळीं कोणते शिष्टाचार पाळावेत याबद्दल कांहींतरी संकेत सर्वांनीं मान्य करणें लोकशाहीच्या दृष्टीनें अत्यावश्यक आहे. निवडणुका म्हणजे कांहीं मामुली गोष्ट नाहीं. शांततेच्या मार्गानें राज्यसत्ता जिंकण्याचा तो लोकशाही पर्याय आहे. लढा शांततेचा आणि लोकशाही पद्धतीचा असला तरी तो सत्तेसाठीं असतो. त्यामुळें त्यांत उग्रता निर्माण व्हावी हें स्वाभाविकच आहे. उग्रतेमुळें आणि लढ्याचें दरम्यान परस्परांवर केलेल्या हल्ल्यामुळें वैमनस्याची भावना जन्मास येते. आणि सारें वातावरण बिघडून जातें. तसें होऊं नये आणि वातावरण निर्मळ राहून मानवी जीवनांतील सौहार्द कायम राहावें अशीच सर्वांची मनोमन इच्छा असते आणि असली पाहिजे. या दृष्टीनें पाहतां ' सर्व पक्षांच्या पुढाऱ्यांना एका बैठकीवर आणण्याचें कामहि फार महत्त्वाचें आहे. समोरासमोर बसून चर्चा केली म्हणजे निष्कारण झालेले गैरसमज दूर होतात. निदान वाढीस लागत नाहींत. एकत्र जेवण-खाण आणि गप्पा-गोष्टी केल्यानें वैमनस्याची भावना कमी होते, समंजसपणा येतो आणि मानवी स्नेहाचे झरे जिवंत राहतात. म्हणूनच ज्या दोन संस्थांनीं हा उपक्रम केला त्यांचा गौरव केला पाहिजे. ".....'' लोकांना जर हे नियम मंजूर नसतील तर राजकीय पक्ष आपण होऊन त्यांचें पालन करतील ही शक्यता नाहीं. आज राजकीय पक्षांना या नियमांना मान्यता

द्यावी लागली ही घटना देखील सूचक आहे. म्हणजे लोकांचें मत या नियमांच्या बाजूचें आहे असें पुढाऱ्यांना वाटतें असा त्याचा अर्थ आहे. तसें जर नसतें तर सर्वच पुढाऱ्यांनीं या संकेतांना मान्यता दिलीच असती असें नाहीं. म्हणून या संकेतांचें पालन काटेकोरपणानें होईल अशी आज जरी हमी देतां आली नाहीं तरी तशा प्रकारचें लोकमत तयार करण्यास या निर्णयाचा उपयोग होईल असें आम्हांस वाटतें. प्रत्यक्ष कृति घडत नसली तरी " काशीस जावें नित्य वदावें. " हें श्रेयस्कर होय. "

" ... आचार-संहितेचा भंग करणाऱ्यांना शासन करण्यासाठीं एखादी कार्यक्षम यंत्रणा आजच्या आज निर्माण होऊं शकेल अशी आशा करणें केवळ भाबडेपणाचें होईल. तथापि एक गोष्ट निश्चित होऊं शकेल. ज्या पक्षाच्या नेत्यांनीं ही संहिता मान्य केली आहे त्या पक्षांपैकीं कोणाकडूनहि संहितेविरुद्ध वर्तन घडल्यास त्याची निदानपक्षी चौकशी तरी झाली पाहिजे. त्यासाठीं एखाद्या सर्वपक्षीय मंडळाची योजना करणें आजच्या परिस्थितींतहि अशक्य नाहीं. आपल्या वर्तनाची सर्वपक्षीय मंडळीकडून चौकशी होईल ही जाणीव देखील एक प्रकारचा अंकुशच आहे. त्याचा परिणाम झाल्यावांचून राहणार नाहीं. नोव्हेंबर महिन्यांत दुसरा परिसंवाद होईल त्या वेळीं या दृष्टीनें कांहीं योजना आंखली गेल्यास जनतेमध्यें आचार-संहितेबाबत आस्था निर्माण होईल. इतकेंच नव्हे तर राजकीय पक्षांना देखील त्याची कदर करावी लागेल. लोकजागृतीच्या दृष्टीनें महाराष्ट्र राज्याचा नंबर वरचा आहे; असा आम्ही अभिमान बाळगतों. सामाजिक आणि आर्थिक अन्यायाविरुद्ध या विभागांत फार मोठीं आंदोलनें झालेलीं आहेत आणि होत आहेत. आमची परंपरा थोर आहे असा आमचा दावा आहे. संयुक्त महाराष्ट्राची मागणी करतांना देखील आम्ही लोकशाहीच्या भूमिकेवरूनच केली. ती मागणी लोकशाहीच्या आणि शांततेच्या मार्गानें मान्य करून घेण्याचा आम्ही निर्धार केला होता. आज ती मागणी बहुतांशांनीं मंजूर झालेली आहे. हा महाराष्ट्रांतील लोकमताचा फार मोठा विजय आहे. भाटघरला मंजूर झालेल्या संहितेबाबत जर दुमत नसेल तर त्या संहितेचा भंग होणार नाहीं इतकें प्रभावी लोकमत महाराष्ट्रांत निर्माण करून विजयाची ही परंपरा टिकविली पाहिजे. "

" **लोकमित्र** " (मुंबई) ३१मे १९६१.

" युद्ध जिंकावयाचें झाल्यास साधनांची नैतिकदृष्ट्या छाननी करणें बरोबर नाहीं अशा अर्थाचा एक वाक्प्रचार इंग्रजींत रूढ आहे. कांहीं मंडळी या तत्त्वांचा निवडणुकींतहि अंगीकार करावयास हरकत नाहीं अशा मताचीं आहेत. या सर्व विचारांची छाननी करीत बसण्यापासून फारसा उपयोग होईल असें आम्हांस वाटत नाहीं. काँग्रेस व्यक्तिरिक्त इतर पक्षीयांना कमी लेखण्याचा आमचा मुळींच मानस नाहीं. काँग्रेस पक्षाचे किंवा काँग्रेसजनांचें चुकलेलें नाहीं किंवा चुकत नाहीं असेंहि आम्हीं म्हणणार नाहीं. त्याचबरोबर संयुक्त महाराष्ट्र निर्मितीच्या दृष्टीनें जें आंदोलन झालें, नाग-विदर्भ आंदोलनाच्या वेळीं जे प्रकार घडले, ते उगाळीत बसून कोणाचा फायदा होईल किंवा विशेषतः काँग्रेस पक्षाचा फायदा होईल असें आम्हांस वाटत नाहीं. काँग्रेस व्यतिरिक्त इतर राजकीय पक्ष भाटघर येथें तयार करण्यांत आलेली राजकीय आचार-संहिता पाळतात किंवा नाहीं हा आमचे पुढें प्रश्न नाहीं. इतर पक्ष कांहींहि करोत, काँग्रेसनें भाटघर येथें घेण्यांत आलेले निर्णय पाळावेत अशा मताचे आम्ही आहोंत.

काँग्रेस पक्ष हा आज सत्तारूढ पक्ष आहे. तो सर्वांत जुना राजकीय पक्ष आहे हें लक्षांत ठेवून काँग्रेस पक्षानें आणि काँग्रेस कार्यकर्त्यांनीं आचार-संहितेंत नमूद केलेलीं तत्त्वें पथ्य म्हणून पाळलीं पाहिजेत असें आमचें आग्रहपूर्वक सांगणें आहे...."

" ...भाटघर येथें तयार करण्यांत आलेली राजकीय आचार-संहिता पुढें ठेवून काँग्रेस पक्षाची जबाबदारी या दृष्टीनें आम्ही आपले विचार वाचकांपुढें ठेवले आहेत. जबाबदार काँग्रेस कार्यकर्ते आमच्या सूचनांचा सहानुभूतीनें विचार करतील अशी आशा आहे."

'विशाल सह्याद्रि' पुणें
२ जून १९६१

◎ ◎

" आगामी निवडणुकीच्या काळांत निवडणुका लढविणारांनीं कोण-कोणतीं पथ्यें पाळावीं, याबाबत मागच्या आठवड्यांत भाटघर येथें एक विविध पक्षांच्या नेत्यांची बैठक होऊन, तींत एक आचार-संहिता तयार झाल्याची

बातमी आहे. निवडणूक लढविण्यामागचा मुख्य उद्देश सत्तासंपादन हा जोंवर असणार आहे, तोंवर या अशा हजार संहिता तयार झाल्या तरी त्याचा काय उपयोग होणार आहे, हें केवळ विचार-सृष्टींत रमणारांखेरीज इतरांना बहुधा समजूं शकणारें नाहीं. तेव्हां मग या संहितेचा आचार कोण करणार ? असा प्रश्न सामान्य माणसासमोर उभा राहतो व त्याला त्याचें उत्तर शोधूनहि मिळत नाहीं. " ज्याच्या हातीं ससा तो पारधी " हा आजचा व्यावहारिक न्याय आहे. ज्याला बहुमत मिळालें, तो लोकप्रिय मानला जातो. मग हें लोकमत त्याला कसें मिळालें वा त्यानें कसें मिळविलें याचा शोध करण्याच्या भानगडींत कोणीं पडत नाहीं. कारण एक तर त्याचा उपयोग नसतो व दुसरी गोष्ट अशी कीं, तें सिद्ध करणें जवळजवळ अशक्य असतें. तेव्हां मुख्य प्रश्न हा कीं, या संहितेचा आचार कोण करणार व कां करणार ?

केवळ विचार-प्रसार हा कांहीं निवडणूक लढविण्यामागचा हेतु नसतो. निवडणूक जिंकण्यासाठीं प्रचार उपयुक्त ठरत असतो व प्रचारासाठीं विचार हा हवा असतो म्हणून तो केला जात असतो. कोणी मानो वा न मानो, आपला विचार आपण सांगत राहावयाचा असा ज्याचा निर्धार असतो, तो निवडणूक लढवीत नसतो. कारण प्रचार हा निवडणुकीच्या वेळीं व निमित्तानेंच करतां येतो अशांतला कांहीं भाग नाहीं. सारांश, सत्तासंपादन निवडणूक जिंकणें हा मुख्य उद्देश जोंवर असणार, तोंवर हितकर असे मार्ग अनुसरले जाणें अपरिहार्य मानावें लागतें.

याबाबत एके ठिकाणीं चर्चा चालूं असतां, एकजण म्हणाला कीं, निवडणुकीच्या अगोदर एक महिना या प्रचार-व्यवहाराला सार्वजनिक स्वरूप देण्यासच मनाई करावी. या व्यक्ति वा पक्षानें खरोखर तत्पूर्वी लोकहिताचीं कामें केलेलीं असतील, त्याला तीं लोकांना सांगण्याची आवश्यकता नसली पाहिजे. त्या त्या उमेदवार व पक्षांची कामगिरी लोकांसमोर असणारच. सारांश, स्वाभाविक असें मतदान जर व्हावयाचें असेल, तर तत्संबंधींचा प्रचार हा फक्त चोवीस तास बंद करणें पुरेसें नाहीं. तो चांगला महिनाभर अगोदर बंद होणें जरूर होय. तसें झालें, तर भावनोद्दीपन करून मतें मिळविण्याला बराच आळा बसूं शकेल.

तात्पुरत वा कृत्रिम भावनोद्दीपन फार काळ सहज टिकत नसतें. त्याला कांहीं भरीव कामगिरीचा आधार असला तर तें टिकत असतें. साहजिक ज्या व्यक्तींनीं वा पक्षांनीं लोकहिताचीं कामें केलेलीं असतील व लोकप्रियता संपादन केलेली असेल, त्यांना मतें दिलीं जातील. परीक्षेचा निकाल देतांना जशी वर्षभराच्या कामगिरीची नोंद घेतात, तशी ही नोंद घेतली गेली, तर अनिष्ट प्रचाराला थोडासा आळा बसेल.

" मराठवाडा " (औरंगाबाद)
११ जून, १९६१

◎ ◎

" भाटघर येथें दि. २३ व २४ मे रोजीं महाराष्ट्रांतील बहुतेक सर्व प्रमुख राजकीय पक्षांचे नेते एकत्र जमले होते व त्यांनीं प्रदीर्घ चर्चेनंतर एक सर्वसंमत निवेदन प्रसिद्धीस दिलें आहे. तें निवेदन वाचकांना आजच्याच अंकांत अन्यत्र वाचावयास मिळेल. राजकीय पक्षांनीं आपलें सामर्थ्य वाढवितांना किंवा निवडणुकींत प्रचार करतांना कोणते किमान संकेत पाळावे यासंबंधीं जें अकरा मुद्दे या निवेदनांत समाविष्ट आहेत, त्यांचें महत्त्व कोणालाच कमी लेखतां येणार नाहीं.....संहितेंत स्थान लाभो अथवा न लाभो, पण पैसा व बाटली यांचा प्रभाव निवडणुकींतून नाहींसा करण्यासाठीं चिकाटीनें प्रयत्न होणें जरूर आहे. मतें मिळविण्याच्या इर्ष्येनें आणि हाताशीं साधनें असल्यामुळें, अनिष्ट प्रलोभनांचा वापर करण्याचा मोह काँग्रेससारख्या पक्षाला किंवा उमेदवारांना होतो. मतदारांतील जागृति, विरोधी पक्षांची जागरुकता आणि खुद्द काँग्रेस पक्षांतील विवेकी लोकांचा प्रयत्न यांच्या बळावरच या अनिष्ट प्रवृत्तीला आळा घालणें शक्य होईल. भाटघरच्या परिसंवादांत या बाबतींत चर्चा झाली, पण प्रत्यक्ष नियम कांहीं घालून देण्यांत आला नाहीं, याचें आश्चर्य वाटतें.

आचार-संहितेंतील आणखी एका गोष्टीचा मुद्दाम उल्लेख करणें जरूर आहे. ती गोष्ट ही कीं, सार्वजनिक जीवन व खाजगी जीवन असा जो फरक आचार-संहितेच्या पहिल्याच कलमांत केलेला आहे, त्याचें तारतम्य प्रत्यक्ष

व्यवहारांत कसें ठेवावयाचें ? निवडणूक लढविणारा उमेदवार किंवा एखाद्या राजकीय पक्षाचा नेता यांच्या जीवनाचें खाजगी व सार्वजनिक असे दोन सर्वस्वी अलग कप्पे पाडतां येतील काय ? लोकप्रतिनिधीमध्यें 'चारित्र्य' (Character) असावें अशी किमान अपेक्षा मतदारांची असते. विशेषतः आपल्या भारतीय जीवनांत तरी अशी परंपरा पडलेली आहे कीं, ज्याचें व्यक्तिगत जीवन शुद्ध नाहीं, त्याचें जीवनांतील स्थान भक्कम राहत नाहीं. तेव्हां "व्यक्तिगत व खासगी" अशा दुहेरी जीवनाच्या कल्पनेला उत्तेजन मिळतां उपयोगी नाहीं. कारण असें उत्तेजन मिळाल्यास दांभिकता आणि भ्रष्टाचार याचें अधिक भयाकारी पीक देशांत येण्याचा संभव आहे. ज्यांचें व्यक्तिगत व सार्वजनिक जीवन एकाच नाण्याच्या दोन्हीं बाजूंप्रमाणें निर्दोष असतील तोंच नैतिक प्रभाव गाजवूं शकेल आणि सर्वपक्षीय जनतेच्या विश्वासाला पात्र ठरूं शकेल. पक्षाच्या ध्येयधोरणांचें वाहन नेता आणि कार्यकर्ता हा असतो. त्याचे शब्द आणि त्याचें जीवन यांतील संगति लोकांना दिसली पाहिजे. जर विसंगति असेल, तर ती लोकांच्या दृष्टोत्पत्तीला आणणें हें अनेकदां अपरिहार्य ठरेल.

भाटघरला मान्य झालेल्या आचार-संहितेंतील अकरा कलमांविषयीं पुष्कळच लिहितां येण्यासारखें आहे. त्यांतील अनेक उणीवाहि दाखवितां येण्यासारख्या आहेत. उदाहरणार्थ, एखाद्या लोकप्रतिनिधीला पक्ष बदलावयाचा असल्यास त्यानें आपल्या जागेचा राजीनामा दिला पाहिजे, या कलमाची अंमलबजावणी १९६२ च्या निवडणुकीनंतर करण्याचें ठरलें आहे. गेल्या एका वर्षांत विरोधी पक्षांतील कितीतरी लोकप्रतिनिधि काँग्रेस पक्षांत गेले. त्यांच्या बाबतींत फार 'उदार' धोरण काँग्रेस पक्षानें स्वीकारलेलें आहे. काँग्रेस पक्षानें विरोधकांना आपल्याकडे ओढण्याचा हा जो पद्धतशीर व संघटित प्रयत्न गेल्या एका वर्षांत केला, त्यावर अनेकदां आक्षेप घेतले, लोकशाहीच्या दृष्टीनें ही पद्धति मारक असल्याचें मत व्यक्त केलें. पण याबाबत मुख्य मंत्र्यांचें मत असें कीं, महाराष्ट्रांत या वर्षीं 'असामान्य' परिस्थिति होती ! १९६२ च्या निवडणुकीनंतर 'सामान्य' परिस्थिति राहील असें त्यांचें म्हणणें आहे.

परंतु गेल्या एका वर्षांत घडलेल्या घटना संसदीय लोकशाहीला पोषक ठरल्या, असें म्हणतां येत नाहीं. १९६२ नंतर तरी पक्षबदल करणाऱ्या प्रवृत्तीला कितीसा लगाम बसतो, याची शंकाच आहे. कारण, पक्ष बदलणारे लोक तत्त्वासाठीं पक्ष बदलत नाहींत तर व्यक्तिगत स्वार्थाचा हेतु त्यांत प्रमुख असतो, हें न सांगतांहि कळण्यासारखें आहे. 'असामान्य परिस्थितीच्या नांवाखालीं गेल्या एक वर्षांतील पक्षबदल व पक्ष बदललेल्या लोकांना मिळालेलीं पारितोषिकें, यासंबंधींची वस्तुस्थिति झांकून कशी राहील ?

आचार-संहितेच्या संबंधांत सर्वांत महत्त्वाचा प्रश्न अर्थातच तिचें पालन करवून घेण्याचा मार्ग कोणता (Sanctions) हा आहे. " महाराष्ट्राच्या दैनंदिन राजकारणांत या आचार-संहितेचा भंग होणार नाहीं, असा प्रयत्न करण्याचें आश्वासन उपस्थित असलेल्या सर्व राजकीय नेत्यांनीं दिलें आहे", एवढ्यानेंच प्रश्न सुटत नाहीं. असें कळतें कीं, या संहितेच्या पालना-संबंधींचे प्रश्न सोडविण्यासाठीं एक राजकीय मंडळ (Political tribunal) असावें, अशी योजना सुचविण्यांत आली होती, व ती जवळजवळ मान्यहि करण्यांत आली होती. पण ऐनवेळीं या योजनेला फांटा देण्यांत आला व राजकीय पक्षांच्या सद्बुद्धीचा कांहीं महिने पडताळा घ्यावा, असें ठरविण्यांत आलें. येणाऱ्या या अनुभवाचें स्वरूप काय आहे, याची तपासणी बहुधा येत्या नोव्हेंबर महिन्यांत भरणाऱ्या आणखी एका परिसंवादांत करण्यांत येईल. ' पोलिटिकल ट्रायब्यूनल 'ची घटना व त्याचें कार्य यांच्या संबंधांत अनेक गुंतागुंतीचे प्रश्न उद्भवतात हें खरें आहे. पण आचार-संहिता पाळली जाते किंवा नाहीं, आणि जर पाळली जात नसेल तर तिचा भंग करणारांची कोणत्या प्रकारें दखल घेतली जाईल, यासंबंधीं कांहीं तरी योजना असणें आवश्यक आहे. राजकीय पक्षांनीं कशाप्रकारें व्यवहार करावा याची ढोबळ सूत्रें तूर्त लोकांच्या दृष्टीपुढें आलेलीं आहेत आणि त्यानुसार प्रत्यक्ष व्यवहार पारखण्याची संधि आतां लोकांना मिळेल, एवढा एक लाभ भाटघर येथील परिसंवादांतून अवश्य निष्पन्न झाला आहे. लोकांच्या व निरनिराळ्या पक्षांतील चांगल्या कार्यकर्त्यांच्या दडपणामुळें

राजकीय पक्षांच्या व्यवहाराला कांहीं पातळी जर प्राप्त झाली, तर गोखले अर्थशास्त्र संस्था व समाज प्रबोधन संस्था यांनीं केलेल्या खटाटोपांचें चीज झालें, असें म्हणतां येईल.

'तरुण-भारत' (नागपूर-पुणें) ३० मे ६१

◎ ◎

"... पण एक गोष्ट येथें आर्जवून सांगावीशीं वाटते. राजकारणांत ही जी आचार-भ्रष्टता आढळून येते, ती कांहीं व्यक्तीमुळें निर्माण झालेली नाहीं. सैतानानें भुरळ घालून आदिमायेला नको तें फळ खायला लावलें आणि मग सारी मानवजात पापांत बुडाली असा प्रकार येथें घडलेला नाहीं. या आचार-भ्रष्टतेचा उगम विचारभ्रष्टतेंत शोधला पाहिजे. कारण विचारांतून आचार निर्माण होत असतात. फौंटनपेनमध्यें शाई नसेल आणि लिहिणारा हात पाठीशीं नसेल तर त्या पेनमधून एकहि अक्षर बाहेर पडावयाचें नाहीं. तद्वत् विचाराशिवाय आचार होऊंच शकत नाहीं. आणि यासाठीं सर्व राजकीय पक्षांच्या विचारांची तपासणीहि झाली पाहिजे. आचार-संहिता निर्माण करण्यामागची भूमिका काय आहे ? वेगवेगळ्या राजकीय पक्षांत मतभेद कितीहि असले तरी सार्वजनिक जीवनांत त्यांनीं कांहीं किमान मर्यादा पाळल्या पाहिजेत. याचा दुसरा अर्थ असा कीं मतभेद हा मतभेद राहिला पाहिजे, त्याचें शोषभेदांत रूपांतर होतां कामा नये. थोडक्यांत आपण सहिष्णुतेची अपेक्षा बाळगीत आहोंत. पण प्रश्न असा येतो कीं, सध्यांच्या राजकीय पक्षांच्या विचारप्रणालींत सहिष्णुतेला कांहीं स्थान आहे काय ? या यक्षप्रश्नाचें सर्व पक्षाच्या नेत्यांनीं प्रामाणिक उत्तर शोधण्याचा प्रयत्न केला पाहिजे. कारण ही असहिष्णुतेची परंपरा आजची किंवा गेल्या दहा-पंधरावर्षांतली नाहीं. कै. विष्णुशास्त्री चिपळूणकरांपर्यंत तिचा उगम शोधावा लागेल. शास्त्रीबोवांनीं आपल्या निबंधमालेंत लोक-हितवादी, स्वामी दयानंद सरस्वती, महात्मा ज्योतिबा फुले, इत्यादि व्यक्तींवर जी टीका केली, ती खमंग टीका म्हणून तत्कालीन लोकांनीं चविष्टपणानें वाचली असली व त्याचें कौतुक केलें असलें तरी, सामान्य लोकांनीं या

व्यक्तींची टिंगलटवाळी करण्यांत त्याचा परिणाम झाला, या गोष्टीकडे कानाडोळा करून कसें चालेल ? ' चोराच्या उलट्या बोंबा ' ह्या लोकमान्यांच्या अग्रलेखानें ना. गोखले यांचा बळी घेतला ही गोष्ट ना. गोखल्यांचे अनुयायी कित्येक वर्षें उगाळीत बसलेच होते ना ? सुरतेची काँग्रेस उधळली गेली ही घटना आजकालच्या घटनांपेक्षां कांहीं वेगळ्या स्वरूपाची होती काय ? आंतडी पिळवटून कै. आगरकरांना ' महाराष्ट्रीयांना अनावृत पत्र ' लिहिण्याचा प्रसंग आला, त्याच्या बुडाशीं हीच असहिष्णुता होती कीं नाहीं..."

" **लोकसत्ता** " (मुंबई)
२४ एप्रिल १९६१

◎ ◎

" ...१९५६ सालीं जें होऊं शकलें नाहीं तें १९६१ सालीं घडलें हीहि कांहीं कमी अभिनंदनीय घटना नाहीं. संयुक्त महाराष्ट्र समितीची सद्दी होती आणि तिच्या पक्षोपपक्षांत कलहाचें बीज नुकतेंच रूजत होतें त्या वेळीं समितीसाठीं एक ' आचार-संहिता ' बनविण्याची खटपट चालली होती. पण पुढच्या एकूण अनाचारांत ही आचार-संहितेची कल्पना बारगळून गेली. आतां काँग्रेससह सर्व पक्षांचे प्रतिनिधि एकत्र येऊन आपल्या सार्वजनिक आचाराचे कांहीं नियम ठरवीत आहेत. आणि याचा फायदाहि होईल. वस्तुतः सार्वजनिक किंवा वैयक्तिक आचरण कसें असावें हें मनोमन सर्वांना कळतच असतें. पण प्रत्येकाला मनोमन समजलें तरी ' तेरी भी चूप और मेरी भी चूप ' असा प्रकार होऊं शकतो. आणि प्रत्येकानें स्वतःचा फायदा असेल त्यावेळीं हवें तसें वागावें, आणि आपल्या फायद्याच्या आड दुसऱ्याचें वागणें आलें म्हणजे ' धर्म ' आठवून त्याचा उद्धार करावा, असा प्रकार घडतो. सार्वजनिक आचार कसा असावा याबद्दल एकमत करून सर्वांनीं त्याचा एकदम उच्चार केला म्हणजे पक्षोपपक्षांचें सार्वजनिक वर्तन एकदम धुतलेल्या तांदुळासारखें होईल, अशी अपेक्षा करण्याचें कारण नाहीं. तसें कधींहि घडत नाहीं. निरनिराळ्या स्मृतिकारांनीं आचाराचे नियम घातले. पण ते नियम समाजांत जेवढे

पाळले गेले तेवढेच मोडलेहि गेले. सरकारी कायद्यांचाहि प्रकार तसाच असतो. पण म्हणून कायदेच असूं नयेत, असें कोणी म्हणत नाहीं. 'आचार–संहिता' ही आचार मोजण्याची एक मोजपट्टी असते. ती मोजपट्टी तयार असली म्हणजे कोणाचा आचार किती कमी पडला हें ठरवितां येतें. आचार–संहिता सर्वांच्या संमतीनें तयार होत असल्यामुळें जो त्या संहितेचा भंग करील तो आपोआपच वचनभंगामुळें सार्वजनिक उपहासाला पात्र होतो. अशा वेळीं मनाची नाहीं तरी जनाची थोडी लाज बाळगावी, असें दडपण राजकीय पक्षांवर येऊं शकतें. मानव-समाजाचा इतिहास असाच घडत आलेला आहे. 'आचार–संहिता' हा त्यांतलाच एक प्रयोग आहे."

"नवशक्ति" (मुंबई)
२९ मे १९६१

◎ ◎

"...निवडणुकीचा अर्थ कोणत्याहि मल्याबुऱ्या मार्गानें कोणी अधिकार-पदावर निवडून येणें असा घेण्याचें कारण नाहीं. निवडणुकींत लोक-शिक्षणाला प्राधान्य मिळालें पाहिजे, काँग्रेसचा आजवर निवडणुकींत विजय झाला पण काँग्रेसला मतें देणाऱ्यांनाहि अजून तिच्या ध्येय–धोरणाची व कार्याची माहिती असावी तितकी पूर्ण नाहीं, असें यापुढें होतां कामा नये. काँग्रेसनें वयांत आलेल्या सर्वच स्त्री-पुरुषांना मताधिकार दिला आहे व दर पांच वर्षांनीं निवडणुकींच्या रंगणांत देखील तो धोका पत्करून उतरत आहे, अशा स्थितींत शांततेच्या व लोकशाहीच्या मार्गानें काँग्रेसच्या कार्याची महति लोकांना वर्णन करून सांगणें हें प्रत्येक काँग्रेसजनाचें कार्य आहे. विरोधी पक्षांचे लोक प्रचार करतांना पुष्कळ वेळीं तमाशांचे फड वगैरे आणून लोकांची दिशाभूल करीत असतात आणि निवडणुकींचें पावित्र्य बिघडवीत असतात. या देशांतील लोकांपैकीं बरेच लोक केवळ साक्षर असल्यानें प्रचारांत पत्रकें, पुस्तकें वगैरेंपेक्षां सभा–मिरवणुकी-सारख्या कार्यांना अधिक महत्त्व द्यावें लागतें; तरीदेखील निवडणुकींतील राजकीय पक्षांची लढत ही दोन वैऱ्यांतील अटीतटीची लढाई नसून प्रेमाचें

भांडण आहे. या दृष्टीनें तिकडे पाहिलें पाहिजे व त्यासाठीं निरनिराळ्या कार्यकर्त्यांनीं निवडणुकी, त्याचें महत्त्व, त्याचें पावित्र्य, वगैरेंची माहिती देऊन व आचार-संहिता काय आहे, हें सांगून, लोकांना त्यांचें शिक्षण दिलें पाहिजे. तसेंच निवडणुकींच्या आखाड्यांत उतरलेल्या पक्षांच्या पुढाऱ्यांत राजकीय आचार-संहिता व तिचें आचरण, याविषयीं वारंवार चर्चा झाली व या संहितेचें पालन जो पक्ष किंवा ज्या व्यक्ति करणार नाहींत त्यांना शिस्तभंगाचें शासन झालें व लोकांच्या मर्जीतून ते उतरण्याचा धोका असला तरी देखील आचार-संहिता अंमलांत येऊं शकेल. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री श्री. यशवंतराव चव्हाण या राजकीय आचार-संहितेच्या घडणीच्या वेळीं हजर होते, व काँग्रेस पक्ष या आचार-संहितेचें मनःपूर्वक पालन करणार असल्याची आमची माहिती आहे. इतर पक्षांनीं देखील त्याचप्रमाणें आचरण केलें तर निकोप लोकशाहीच्या वाढीच्या दृष्टीनें महाराष्ट्रानें एक आदर्श घालून दिल्यासारखें होईल, आणि त्याच दृष्टीनें या आचार-संहितेच्या कल्पनेचें स्वागत केलें पाहिजे. "

" अजिंठा " (औरंगाबाद)
४ जून १९६१

◎ ◎

"...महाराष्ट्रांतील राजकीय पक्ष आपल्या अ. भा. संघटनांना स्पष्टपणें सांगूं शकतील कीं, महाराष्ट्रांत आपल्या पक्षाची प्रतिष्ठा कायम राखण्यासाठीं संहितेचें पालन आम्हांला केलेंच पाहिजे व आम्हीं तें करणार. एवढे स्पष्ट बजावण्यांत आलें तर अखिल भारतीय पक्ष आचार-संहितेच्या विरोधी असा आदेश देणार नाहींत. राजकीय पक्षांच्या आचार-संहितेंत एक कलम प्रथमच टाकणें आवश्यक आहे. तें असें कीं, पक्ष-आदेशापेक्षां सर्वमान्य झालेल्या आचार-संहितेचें आम्हीं प्रामाणिकपणें पालन करूं. सर्वमान्य अशी आचार-संहिता तयार करण्यास एकत्र बसणाऱ्या पक्षांनीं निकोप लोकशाहीसाठीं पक्षाच्या आदेशापेक्षां सर्वमान्य झालेल्या आचार-संहितेला प्राधान्य देण्याचें ठरविलें तर त्यांत कोणत्याहि पक्षाचें नुकसान

नाहीं. पक्षाचें अखिल भारतीय धोरण कोणतेंहि असो; महाराष्ट्रांत काम करतांना प्रथम आचार-संहितेचें पालन करून पक्ष कार्य करावयाचें असें महाराष्ट्रांतील सर्व पक्षांनीं ठरविलें तर अखिल भारतीय पातळीवर आचार-संहिता करण्याची बुद्धि व आवश्यकता सर्वच पक्षांना जाणवूं लागेल. पण आजच आचार-संहितेला अखिल भारतीय पक्षांची मान्यता हवी, असें म्हणून बसण्याचें कारण नाहीं. ''

'गांवकरी'' (नासिक)
६ जून १९६१

◎ ◎

''...देशांतील सत्तारूढ व विरोधी राजकीय पक्षांनीं अधाशीं वृत्तीनें सत्तेची आकांक्षा न धरतां आणि सत्ता हस्तगत करण्याचा 'येनकेन प्रकारेण' प्रयत्न न करतां आपल्या सार्वजनिक आचाराची कांहीं एक संहिता ठरवावी, असा आचार्य विनोबा, श्री. जयप्रकाश आदि सर्वोदयी नेत्यांचा फार आग्रह आहे. परंतु अखिल भारतीय पातळीवर यांपैकीं कांहींहि होऊं शकलें नाहीं. असें असलें तरी महाराष्ट्रांतील प्रमुख राजकीय पक्षांनीं व राजकीय विचारवंतांनीं एक राजकीय आचार–संहिता तयार करण्यांत यश मिळविलें आहे. या प्रकरणीं गोखले अर्थशास्त्र संस्था व समाज प्रबोधन संस्था यांनीं पुढाकार घेण्यांत मोठेंच औचित्य दाखविलें, यांत शंका नाहीं. आणि या प्रयत्नांना सक्रिय पाठिंबा देण्यांत महाराष्ट्रांतील राजकीय पक्षांच्या प्रमुख नेत्यांनींहि असाधारण जागृति दाखविली असें म्हटलें पाहिजे...''

''सोलापूर समाचार'' (सोलापूर)
३० मे १९६१

◎ ◎

''... अमेरिकेच्या अध्यक्षांच्या परवां झालेल्या निवडणुकींमध्यें रिपब्लिक पक्षाचे उमेदवार श्री. निक्सन यांनीं आपल्या पायाखालची बरीच वाळू वाहून गेली असें वाटताच शेवटीं कोणतें तंत्र स्वीकारलें होतें ?

'व्हाईट हाऊसमध्यें अजाण घेंडाला आणून बसाविणें हें कितपत योग्य होईल?' असा सरळ सवाल ते मतदारांना टाकीत होते. ब्रिटनमध्येंहि परवा झालेल्या सार्वात्रिक निवडणुकांमध्यें अधिकारारूढ हुजूरपक्ष आणि विरोधी मजूरपक्ष यांची रस्सीखेंच कशी झाली? लोकशाहीचा आदर्श म्हणवून घेणाऱ्या या राष्ट्रांतील दोन विरोधी पक्षांच्या नेत्यांनीं एकमेकांना मवाल्याच्या तोंडीहि न शोभणाऱ्या शिव्या दिल्या. तेव्हां ज्या दृष्टिकोनांतून प्रामुख्यानें ही आचार-संहिता तयार करण्याचा विचार करण्यांत येत आहे, तो दृष्टिकोन कितपत साध्य होऊं शकेल? असा प्रयत्न यशस्वी होणें कठीण म्हणून तो करूंच नये असें म्हणणेंहि बरोबर नाहीं. आणि शंभरांतला एखादा टक्काहि जरी हाताला लागला तरी तें अंशतः विधायक कार्य होणार असल्यानें आचार-संहितेचा प्रयत्न अनाठायीं आहे. असें म्हणतां यावयाचें नाहीं."

"पुढारी" (कोल्हापूर)
२७ मे १९६१.

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम 37609 वि: 7/9/64
क्रमांक 9236 नों: दि: 21.11.61

REFBK-0012308

मराठा ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 9230C
संग्रह शाखा स्थळ प्रत